CMYK

सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, दि. १३ मार्च २०२६ | वर्ष – ३ रे | अंक ३३३ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# युद्धामुळे महागाईची झळ मध्यमवर्गीयांना बसणार

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई , दि. १२ मार्च :** पश्चिम आशियात सुरू असलेल्या इराण युद्धाचा परिणाम आता भारतातील बाटलीबंद पाण्याच्या उद्योगावर होत आहे. रॉयटर्सच्या मते, सुमारे ५ अब्ज डॉलर्सच्या भारतीय पॅकेज्ड पाण्याच्या बाजारपेठेत वाढत्या किमतींमुळे देशातील उन्हाळी हंगाम सुरू होत असतानाच कंपन्या किमती वाढवण्यास प्रवृत्त होत आहेत.

अहवालानुसार, उद्योग संघटनांचे म्हणणे आहे की युद्धामुळे पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे, ज्यामुळे प्लास्टिकच्या बाटल्या, लेबल्स आणि कार्डबोर्ड बॉक्स यासारख्या पॅकेजिंग साहित्याच्या किमतींमध्ये मोठी वाढ झाली आहे. याचा थेट परिणाम बाटलीबंद पाणी कंपन्यांच्या किमतीवर होत आहे.

## पिण्याच्या पाण्याचे दर वाढणार

ऑल इंडिया पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनच्या मते, सुमारे २००० लहान उत्पादकांनी त्यांच्या वितरकांना प्रति बाटली अंदाजे १ (सुमारे ५%) ने किंमती वाढवल्या आहेत. येत्या काही दिवसांत किमती आणखी १०% वाढू शकतात असा उद्योगाचा अंदाज आहे. सध्या, किरकोळ किमतींमध्ये फारसा बदल झालेला नाही, कारण मोठ्या कंपन्या काही वाढलेले खर्च सहन करत आहेत. साधारणपणे, भारतात १ लिटर बाटलीबंद पाण्याची किंमत २० पेक्षा कमी आहे.

उद्योग प्रतिनिधींचे म्हणणे आहे की कच्च्या तेलाच्या किमती वाढल्याने प्लास्टिकच्या बाटल्या बनवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या मुख्य कच्च्या मालाच्या पॉलिमरच्या किमतीत वाढ झाली आहे. प्लास्टिकच्या बाटल्या बनवण्याच्या साहित्याची किंमत सुमारे ५०% ने वाढून प्रति किलोग्राम १७० रुपये झाली आहे. बाटलीच्या टोप्यांची किंमत देखील दुप्पट झाली आहे आणि ती अंदाजे ०.४५ रुपये प्रति तुकडा झाली आहे.

याव्यतिरिक्त, नालीदार बॉक्स, लेबल्स आणि चिकट टेपच्या किमतीही झपाट्याने वाढल्या आहेत, ज्यामुळे उत्पादन खर्च आणखी वाढला आहे. भारतासारख्या देशात, जिथे सुमारे ७०% भूजल प्रदूषित असल्याचे नोंदवले जाते, स्वच्छ पाण्याची उपलब्धता हे एक मोठे आव्हान आहे आणि बाटलीबंद पाण्यावरील अवलंबित्व वाढत आहे. बिस्लेरी, कोका-कोलाची किन्ले,



पेप्सीची ॲक्वाफिना, रिलायन्स आणि टाटा यासारख्या प्रमुख कंपन्या या बाजारात सक्रिय आहेत.

**प्रीमियम पाणी देखील महाग**

बाटलीबंद पाण्याच्या बाजारपेठेतील नैसर्गिक खनिज पाण्याचा विभाग देखील वेगाने वाढत आहे. भारतात, हा अंदाजे ४०० दशलक्ष किमतीचा व्यवसाय बनला आहे. गेल्या वर्षी, एकूण बाजारपेठेत प्रीमियम पाण्याचा वाटा ८% होता, तर २०२१मध्ये तो फक्त १% होता. अरावली टेकड्यांवरून मिळवलेले मिनरल वॉटर विकणारी कंपनी 'आवा' ने तिच्या पुनर्विक्रेत्यांसाठी बाटल्यांच्या किमतीत अंदाजे १८% वाढ केली आहे. उद्योग तज्ञांचे म्हणणे आहे की अनेक कंपन्या अजूनही ग्राहक गमावू नयेत म्हणून अतिरिक्त खर्चाच्या ४०-५०% स्वतःहून घेत आहेत. जर कच्च्या मालाच्या किमती या दराने वाढत राहिल्या, तर येत्या उन्हाळी हंगामात बाटलीबंद पाण्याच्या किमतीत वाढ ग्राहकांना स्पष्टपणे दिसून येईल.

# जम्मू काश्मीरचे माजी मुख्यमंत्री फारुख अब्दुल्लांच्या हत्येचा प्रयत्न

**जम्मू/वृत्तसंस्था :** नॅशनल कॉन्फरन्सचे अध्यक्ष आणि जम्मू-काश्मीरचे माजी मुख्यमंत्री फारुख अब्दुल्ला यांच्यावर बुधवारी रात्री एका व्यक्तीने गोळीबार करण्याचा प्रयत्न केला. पण सुरक्षारक्षकांच्या सतर्कतेमुळे हल्लेखोर लगेच पकडला गेला. फारुख अब्दुल्ला सुरक्षित आहे. त्यांना काहीही इजा झाली नाही.

जम्मूत एका लग्न सोहळ्याला फारुख अब्दुल्ला उपस्थित होते. त्यांच्यासोबत राज्याचे उपमुख्यमंत्री सुरिंदर चौधरी देखील होते. नेमका त्याचवेळी हल्ला झाला. या हल्ल्यात सुरिंदर चौधरी किरकोळ जखमी झाले. घटनेचे सीसीटीव्ही फूटेज



समोर आले आहे.

समोर आलेल्या सीसीटीव्ही फूटेजमध्ये हल्लेखोर कमल सिंग जामवाल मागून येत फारुख अब्दुल्ला यांच्या डोक्यावर बंदूक रोखताना दिसत आहे. सुरक्षा कर्मचाऱ्यांनी ताबडतोब हल्लेखोराला पकडले. त्यावेळी हल्लेखोराने स्वतःची सुटका करून घेण्याचा प्रयत्न करण्यासाठी तसेच दहशत पसरवण्यासाठी हवेत गोळीबार करण्याचा प्रयत्न केला. पण सुरक्षा रक्षकांनी त्याची डाळ शिजू दिली नाही. फारुख अब्दुल्ला यांना सुरक्षित ठिकाणी नेण्यात आले. हल्लेखोराला अटक करण्यात आली. या प्रकरणी तपास सुरू आहे. राज्याचे मुख्यमंत्री आणि फारुख अब्दुल्लांचे पुत्र ओमर अब्दुल्ला यांनी हल्ल्याचा प्रयत्न झाल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे.

# आमच्या 'या' तीन अटी मान्य करा युद्ध थांबवतो... इराणच्या राष्ट्राध्यक्षांनी केलं ट्विट

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** इराणने अखेर दोन आठवड्यांपासून सुरू असलेला इस्त्रायल आणि अमेरिकेसोबतचा लष्करी संघर्ष संपवण्याची तयारी दर्शवली आहे. यापूर्वी इराणने आम्ही अमेरिकेसोबत १० वर्षे लढू असे सांगितलं होतं. दरम्यान, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी देखील युद्ध लवकरच संपेल असे संकेत दिले होते. आता इराणचे राष्ट्रपती मसूद पेझेस्कीन यांनी ट्विट करून आमच्या तीन मागण्या मान्य झाल्या तर इराण हा संघर्ष थांबवू शकतो असं सांगितलं आहे.

**काय म्हणाले इराणचे राष्ट्रपती?**

इराणचे लाष्ट्रपती मसूद यांनी ट्विट केलं की, 'मी रशिया आणि पाकिस्तानच्या नेत्यांशी बोललो. मी इराण या भागात शांतता प्रस्थापित व्हावी यासाठी प्रतिबद्ध आहे हे पुन्हा एकदा सांगितलं. हे युद्ध थांबवण्याचा एकमेव मार्ग आहे. तो म्हणजे, ज्यांना झायोनिस्ट सत्तेनं आणि अमेरिकेनं हे युद्ध सुरू केलं आहे. त्यांनी इराणचे कायदेशीर हक्क मान्य करावेत. आम्हाला नुकसान भरपाई द्यावी आणि यापुढे असा हल्ला करणार नाही याची आंतरराष्ट्रीय



स्तरावरील ठोस शाश्र्वती द्यावी.'

**इराणच्या प्रवक्त्यांची धमकी**

इराणचे प्रवक्ते अबोलफझल शेकराची यांनी जर वॉशिंग्टननं इराणच्या बंदरांवर हल्ला केला तर पर्शियन गल्फमधील कोणतेही बंदर, आर्थिक केंद्र किंवा कोणतेही लोकेशन आमच्या रडावर असेल असं वक्तव्य केलं होतं. त्यानंतर इराणच्या राष्ट्रपतींचा हा युद्ध थांबवण्याचा प्रस्ताव ठेवला आहे.

अबोलफझल यांनी जर आमचे पोर्ट आणि डॉक रडावर असतील तर या भागातील सर्व बंदरे आणि डॉक आमच्या टार्गेटवर असतील. आम्ही आतापर्यंत जे काही केलं आहे त्यापेक्षाही जास्त तीव्रतेची हल्ले आम्ही करू अशी धमकी देखील त्यांनी दिली होती.

**इस्त्रायललाही उपरती?**

रायटर्सनं दिलेल्या वृत्तानुसार इस्त्रायली अधिकारी यांनी बंद दाराआड चर्चा केली आहे. त्यात त्यांनी इराणसोबत सुरु असलेलं युद्ध असंच सुरू ठेवून इराणचे सध्याचे सरकार पाडता येईल याची कोणतीही शाश्र्वती नाही. कारण इतका बॉम्बवर्षाव करून देखील इराणमध्ये सरकारविरूद्ध अजून तरी कोणताही रोष किंवा उठाव दिसत नाहीये.

दुसरीकडं जरी युएस-चे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युद्ध लवकर संपेल असं वक्तव्य केलं असलं तरी इस्त्रायलच्या मते अमेरिका लष्करी संघर्ष संपवण्याचे निर्देश देण्याच्या जवळपास देखील नाही. रॉयटर्सने हे वृत्त इस्त्रायलच्या दोन अधिकाऱ्यांच्या हवाल्यानं दिलं आहे.

# आंबा-काजू बागायतदार आक्रमक, राजू शेट्टींचा सरकारला इशारा

## मागण्यांवर निर्णय न झाल्यास मुंबई-गोवा महामार्ग रोखणार

**तभा वृत्तसेवा**

**सिंधुदुर्ग, दि. १२ मार्च :** निसर्गाच्या लहरीपणामुळे संकटात सापडलेल्या कोकणातील आंबा आणि काजू बागायतदारांनी आता आक्रमक पवित्रा घेतला आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली सिंधुदुर्ग जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला. शासनाने येत्या १० दिवसांत शेतकऱ्यांच्या मागण्यांवर ठोस निर्णय न घेतल्यास, २३ मार्च रोजी सकाळी १० वाजेपासून 'मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग' बेमुदत रोखून धरण्याचा इशारा देण्यात आला आहे.

शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी आणि पालकमंत्र्यांकडे आपल्या मागण्यांचे निवेदन सोपवले आहे. यामध्ये प्रामुख्याने आंबा कलमाला ५,००० रुपये प्रति किंवा हेक्टरी ५ लाख रुपये नुकसान भरपाई मिळावी असं सांगण्यात आलं आहे. तर काजू पीकाला हेक्टरी ३ लाख रुपये मदत मिळावी अशी मागणी करण्यात आली आहे. पीक विम्याची मुदत ३० मे पर्यंत वाढवण्यात यावी आणि कर्जमाफीबद्दल ज्या बागायतदारांचे नुकसान झाले आहे, त्यांचे चालू कर्जही (थकीत नसले तरी) पूर्णपणे माफ करावे. ही कर्जमाफी एनडीआरएफ निकषांच्या मदतीप्रमाणे २०१९ च्या महापुराप्रमाणे चौपट मदत मिळावी, अशा स्वरुपाची मागणीही यामध्ये करण्यात आली आहे, अशी माहिती राजू शेट्टींनी दिली आहे. सध्या राज्याचे



विधीमंडळ अधिवेशन सुरू असल्याने धोरणात्मक निर्णय सभागृहाबाहेर घेता येत नाहीत, असे पालकमंत्र्यांनी शिष्टमंडळाला सांगितले आहे. मुख्यमंत्र्यांनी या मागण्यांबाबत सकारात्मकता दाखवल्याची माहितीही त्यांनी दिली. या पार्श्र्वभूमीवर राजू शेट्टी म्हणाले, आम्ही संयमाची भूमिका घेत २३ मार्चपर्यंत सरकारची वाट पाहणार आहोत. मात्र, या काळात ठोस शासन निर्णय न आल्यास ही लढाई आरपारची असेल. आर्थिक नुकसानीसोबतच बाजारात निकृष्ट दर्जाची कीटकनाशके आणि औषधे विकली जात असल्याचा गंभीर आरोपही यावेळी त्यांनी केला आहे. कृषी विभागाने बोगस कंपन्यांवर तात्काळ कारवाई करावी, अन्यथा शेतकऱ्यांना कायदा हातात घेऊन त्यांचा बंदोबस्त करावा लागेल, असा सज्जड दमही आंदोलकांनी दिला आहे.

# उन्हाळी सुट्ट्यांसाठी १ हजार ४८४ विशेष गाड्या धावणार; मध्य रेल्वेची घोषणा

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई , दि. १२ मार्च :** उन्हाळी सुट्ट्यांच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेने १४८४ उन्हाळी विशेष गाड्या चालवण्याची घोषणा केली आहे. या विशेष गाड्यांमध्ये ७४९ आरक्षित तर ७३५ अनारक्षित गाड्यांचा समावेश करण्यात आला आहे.

प्रवाशांना सुट्ट्यांमध्ये आपल्या कुटुंबीय व नातेवाईकांसोबत वेळ घालवण्यासाठी सुलभ प्रवास करता यावा, यासाठी ही व्यवस्था करण्यात आली आहे. या उन्हाळी विशेष गाड्यांमध्ये मागणीनुसार आधीपासून सुरू असलेल्या काही गाड्यांसोबतच अतिरिक्त विशेष गाड्यांचाही समावेश करण्यात आला आहे.

महाराष्ट्रातील प्रवाशांसाठी मुंबई/दौंड-सोलापूर, पुणे-कोल्हापूर, नाशिक रोड-बडनेरा तसेच हडपसर-हरंगुळ या मार्गांवर विशेष रेल्वे सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच महाराष्ट्राबाहेरील प्रवासासाठी मुंबई-बलिया, मुंबई-गोरखपूर, दौंड-कलबुरगी तसेच सोलापूर-कलबुरगी/ अनकापल्ली या मार्गांवरही विशेष गाड्या धावणार आहेत.

या विशेष गाड्यांमुळे प्रवाशांना आपल्या प्रवासाचे नियोजन अधिक सोयीस्करपणे करता येणार आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी मध्य रेल्वेने प्रवासी सुविधांमध्ये वाढ केली असून नेटवर्कमध्ये विविध उपाययोजना राबवण्यात येत आहेत. या विशेष गाड्यांच्या वेळापत्रक व थांब्यांची सविस्तर माहिती मध्य रेल्वेकडून लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

# रोहित पवार राहुल गांधींच्या भेटीला, विरोधी पक्षनेत्यांचा अजित पवार अपघात प्रकरणात मोलाची मदत करण्याचा शब्द

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था:** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी आज दिल्लीत जावून काँग्रेस नेते तथा लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची भेट घेतली. यावेळी रोहित पवार यांनी राहुल गांधी यांच्याकडे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या घटनेबाबत माहिती दिली. राहुल गांधींच्या भेटीनंतर त्यांच्यासोबत काय चर्चा झाली? याबाबत रोहित पवारांनी सविस्तर माहिती दिली. राहुल गांधी यांच्यासोबत अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत चर्चा केली. मी ऋखठ बद्दल सांगितलं, अजित पवार यांच्या अपघात प्रकरणात दुर्दैवाने ऋखठ घेतला जात नाही, त्यात ते थोडेसे आश्र्चर्यचकीत झाले. त्याचं कारण म्हणजे या देशामध्ये प्रत्येक व्यक्तीचा ऋखठ होणं हा हक्क आहे, असं रोहित पवार म्हणाले.

महाराष्ट्रामध्ये एवढा मोठा नेता म्हणजेच अजित पवार यांचा ऋखठ घेतला जात नाही याचं राहुल गांधी यांचा आश्र्चर्य वाटलं. त्याचबरोबर सीबीआयकडे प्रस्ताव पाठवला आहे. पण तो पोहोचलाय का? पोहचला असेल तर तो स्वीकारला का जात नाही? असा प्रश्र्न केल्यानंतर ते म्हणाले त्याबाबतीत आपल्याला पाठपुरावा करावा लागेल. तेलगू देसम पार्टी, तडठ आणि वी के सिंग यांचं आर्थिक आणि वैयक्तिगत जे नातं आहे, त्याबद्दलची माहिती त्यांना सांगितली. सगळ्या गोष्टी बघितल्यानंतर त्यांनी मला शब्द दिलाय की, काँग्रेस पक्षाकडून किंवा त्यांच्याकडून जी काही ताकद लागेल किंवा मदत लागेल ती पूर्णपणे आम्ही करु. त्यांनी मला पुढच्या दोन दिवसांत काय करु याबाबत एक शब्द दिला आहे. पण मी दोन दिवसांत तुम्हाला याबाबतची माहिती आपल्याला देईन. राहुल गांधी यांच्याकडून अतिशय महत्त्वाची मदत होईल, असं आम्हाला वाटतं. दोन दिवसांत ती काय गोष्ट होती आणि काय मदत झाली, याबाबत मी नक्की सांगेन, अशी माहिती रोहित पवार यांनी दिली.



ऊऋछ- च्या अंतर्गत जेव्हा --खइ तपास करते तेव्हा कलम ११ आणि १२ च्या अंतर्गत तपास केला जातो. कलम ११ च्या अंतर्गत जो तपास होतो त्यामध्ये जे अधिकारी असतात ते त्याच विभागाचे असतात. त्यामुळे ते खूप खोलात जावून आणि पारदर्शकतेने तपास करतील, असं नाही. कलम १२ अंतर्गत आपल्याला एक वेगळी कम्युनिटी निर्माण करता येते. त्यामध्ये डजझ म्हणजे देशाचे जे विरोधी पक्षनेता आहेत त्यांना विनंती करता येते की, त्याचं अध्यक्षपद घेता येतं. याबद्दल राहुल गांधी यांना माहिती दिली. त्याबद्दल सुद्धा आपल्याला खोलात जावून विषय समजून घ्यावा लागेल, असं रोहित पवार म्हणाले.

## थोडक्यात...

### मोदींविरोधात काँग्रेस आक्रमक

**छत्रपती संभाजीनगर :** छ . संभाजीनगर शहरात मोदी सरकारच्या धोरणांविरोधात काँग्रेस पक्ष आक्रमक झाल्याचे पाहायला मिळत आहे. गॅस सिलिंडरच्या वाढत्या दरांविरोधात आज काँग्रेसच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात आले. या आंदोलनादरम्यान काँग्रेसच्या महिला पदाधिकाऱ्यांनी प्रतिकात्मक स्वरूपात चूल पेटवत केंद्र सरकारच्या धोरणांचा निषेध केला. वाढत्या महागाईमुळे सर्वसामान्य महिलांचे घरगुती बजेट कोलमडल्याचा आरोप करत आंदोलकांनी भाजप आणि मोदी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी गॅस दरवाढ तात्काळ मागे घ्यावी, अशी मागणी करत जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदनही सादर केले.

### इंडक्शन स्टोव्हच्या किंमतीत वाढ

**मुंबई :** एलपीजी गॅस सिलिंडरचा तुटवडा निर्माण झालेला असताना इंडक्शन स्टोव्हची मागणी वाढली आहे. ही संधी लक्षात घेऊन अनेक इंडक्शन स्टोव्ह उत्पादक कंपन्यांनी त्यांच्या इंडक्शन स्टोव्हच्या किमतीत ५ ते १० टक्क्यांची वाढ केली आहे. आता गॅस सिलिंडर आणि इंडक्शनपैकी कोणता पर्याय स्वस्तात जेवण बनवण्यासाठी योग्य आहे, याचा विचार केला तर एक सिलिंडर जवळ-जवळ महिनाभर टिकतो. एकंदर इंडक्शन किंवा सिलिंडरवर स्वयंपाक करण्याचा खर्च जवळजवळ समान आहे. तथापि, काही अतिरिक्त कारणे आहेत ज्यामुळे इंडक्शन स्टोव्ह एलपीजी सिलिंडरपेक्षा थोडा स्वस्त असू शकतो.

### सुनेत्रा पवार माळेगाव कारखान्याच्या अध्यक्षा

**बारामती:** राज्याच्या राजकीय आणि सहकार क्षेत्राचे लक्ष लागून राहिलेल्या माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्षपदाचा पेच अखेर सुटला आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची आज कारखान्याच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. माळेगाव कारखान्याच्या अध्यक्षपदासाठी आज, १२ मार्च रोजी विशेष निवडणूक प्रक्रिया पार पडली. बारामतीचे प्रांताधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी वैभव नावडकर यांनी या निवडीची अधिकृत घोषणा केली. दुपारी कारखान्याच्या मुख्य कार्यालयात संचालक मंडळाची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत अध्यक्षपदासाठी सुनेत्रा पवार यांचा एकमेव अर्ज दाखल झाला. इतर कोणताही उमेदवारी अर्ज न आल्याने ही निवड बिनविरोध झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी जाहीर केले.

### पाकमध्ये गॅस पाईपलाईनच उडवली

**इस्लामाबाद :** जगभरात इंधनाची कमतरता जाणवत असतानाच, पाकिस्तानला एक मोठा धक्का बसला आहे. गॅस च्या वाढत्या किंमतींच्या पार्श्र्वभूमीवर पाकिस्तानच्या एका महत्त्वाच्या गॅस पाइपलाइनचं नुकसान करण्यात आले आहे. बलुचिस्तानच्या सुई गॅस फील्डमधून कराचीपर्यंत इंधन नेणारी एक मोठी गॅस पाइपलाइन तोडण्यात आली आहे. स्थानिक मीडियाने दिलेल्या माहितीनुसार, बलुच रिपब्लिकन गार्ड्स या संघटनेने याची जबाबदारी स्वीकारली आहे. इठऋ च्या प्रवक्ताने दोस्तैन बलुच यांनी एका पत्रकात म्हटले की, संघटनेच्या सदस्यांनी बुधवारी ११ मार्च सायंकाळी पाकिस्तानच्या सिंध प्रांतातील काशमोर भागात ३६-इंच डायमीटरच्या गॅस पाइपलाइनवर विस्फोटकांचा वापर केला.

### जय पवार पत्रपरिषद घेणार

**मुंबई :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे धाकटे पुत्र जय पवार यांनी आज अजित पवार यांच्यासोबत विमान अपघातात निधन झालेल्या पिंकी माळी हिच्या कुटुंबियांची भेट घेतली. यानंतर त्यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. जय पवार यांची पत्रकार परिषद पुढे ढकलण्यात आली आहे. याबाबत त्यांनी महत्त्वाची माहिती दिली. मी पुढच्या आठवड्यात पत्रकार परिषद घेईन. त्या पत्रकार परिषदेत मला जी काही माहिती मिळाली आहे त्याबद्दल सर्व माहिती देईन, असं जय पवार यांनी सांगितलं.

### आता एसी लोकल येणार

**मुंबई:** मुंबईकरांचा उपनगरी रेल्वेवरील प्रवास आरामदायी करण्यासाठी प्रस्तावित केलेल्या वातानुकूलित 'वंदे मेट्रो' लोकलच्या खरेदीप्रक्रियेला मुदतवाढ देण्यात आली आहे. मुंबई रेल्वे विकास महामंडळाने (एमआरव्हीसी) २,८५६ एसी 'वंदे मेट्रो' डब्यांच्या खरेदीसाठी काढलेल्या निविदा आता १५ मे रोजी उघडल्या जाणार आहेत. बोलीदारांकडून उपस्थित करण्यात आलेल्या शंकांमुळे हा बदल करण्यात आला. यापूर्वी एप्रिलमध्ये निविदा उघडण्याचे नियोजन होते. लोकल प्रवासी क्षमतावाढीसह 'वंदे मेट्रो'च्या धर्तीवरील नव्या वैशिष्ट्यांनी सुसज्ज असलेली एसी लोकल धावती करण्यासाठी एमआरव्हीसीकडून बांधणी करण्यात येत आहे.

# स्त्री भ्रूणहत्या रोखताना संतुलित अंमलबजावणीची गरज - डॉ. अनुपम टाकळकर

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १२ मार्च :** महाराष्ट्रात PCPNDT कायद्याच्या अंमलबजावणीला अधिक कठोर स्वरूप देण्याबाबत चर्चा सुरू असून काही प्रकरणांमध्ये MCOCA अंतर्गत गुन्हे दाखल करण्याचा विचार होत असल्याच्या पार्श्वभूमीवर वैद्यकीय क्षेत्रात चिंता व्यक्त होत असल्याचे इंडियन मेडिकल असोसिएशनचे छत्रपती संभाजीनगर अध्यक्ष व केंद्रीय कार्यकारिणी सदस्य डॉ. अनुपम टाकळकर यांनी सांगितले.

स्त्री भ्रूणहत्या ही गंभीर सामाजिक समस्या असून मुलगी वाचवणे आणि लिंग गुणोत्तर संतुलित ठेवणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. PCPNDT कायद्याच्या




उद्दिष्टांना आयएमएचा नेहमीच पाठिंबा राहिला असून मुलगी वाचवा, मुलगी शिकवा यासारख्या उपक्रमांमध्ये डॉक्टरांचा सक्रिय सहभाग असल्याचे त्यांनी नमूद केले. जाणीवपूर्वक बेकायदेशीर लिंग निर्धारण करणाऱ्या रॅकेट्सवर कठोर कारवाई व्हावी, याबाबत वैद्यकीय क्षेत्रात कोणतेही मतभेद नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तथापि, PCPNDT अंतर्गत आढळणाऱ्या सर्व त्रुटींना संघटित गुन्हेगारीच्या कक्षेत ठेवणे योग्य ठरणार नाही. अनेक प्रकरणांमध्ये त्री ऋमधील लिपिकीय किंवा प्रक्रियात्मक त्रुटी आढळतात. अशा चुका संघटित गुन्हेगारीशी जोडणे प्रमाणबद्धतेच्या तत्त्वाशी सुसंगत नसल्याचे त्यांनी सांगितले. किरकोळ कागदपत्रीय त्रुटींवर सोनोग्राफी मशीन सील करणे किंवा नोंदणी निलंबित करणे यामुळे प्रामाणिक डॉक्टरांमध्ये अस्वस्थता निर्माण होते.

अत्यंत कठोर कारवाईमुळे काही डॉक्टर प्रसूतीपूर्व सोनोग्राफी सेवा देणे टाळू शकतात, ज्याचा परिणाम विशेषतः ग्रामीण भागातील गर्भवती महिलांवर होऊ शकतो. त्यामुळे शासन आणि वैद्यकीय क्षेत्रात विश्र्वास व सहकार्य आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

जाणीवपूर्वक लिंग निर्धारण करणाऱ्या रॅकेट्सवर लक्ष केंद्रित करून डमी रुग्णांच्या माध्यमातून तपास मोहीम राबविणे, तसेच Form F नोंदींसाठी सुलभ डिजिटल प्रणाली विकसित करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सुचविले. समाज, शासन आणि वैद्यकीय क्षेत्राने एकत्रितपणे प्रयत्न केल्यास स्त्री भ्रूणहत्येसारख्या गंभीर समस्येवर प्रभावी उपाय शक्य होतील, असे डॉ. टाकळकर यांनी नमूद केले.

## थोडक्यात...

### कॅनकिड्स आणि सलाम बॉम्बे येथील विशेष फॅन गटाचे स्वागत

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर - एण्ड टीव्हीवरील लोकप्रिय विनोदी मालिका 'भाबीजी घर पर है २.०'मधील अंगूरी भाबीची भूमिका साकारणारी अभिनेत्री शिल्पा शिंदे हिने लखनौ भेटीदरम्यान चाहत्यांशी मनमोकळा संवाद साधत आनंदाचे क्षण अनुभवले. उत्साही स्वभावासाठी ओळखल्या जाणाऱ्या शिंदे यांनी १०० हून अधिक चाहत्यांसोबत सेल्फी घेतल्या. आपल्या आवडत्या कलाकारासोबत फोटो काढताना चाहत्यांमध्ये प्रचंड उत्साह दिसून आला. चाहत्यांशी भेट आणि संवाद हा खास अनुभव असल्याचे सांगत शिंदे यांनी प्रेक्षकांनी मालिकेवर केलेल्या प्रेमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. 'भाबीजी घर पर है २.०' ही मालिका सोमवार ते शुक्रवार रात्री १०.३० वाजता एण्ड टीव्हीवर प्रसारित होते.

### शिल्पा शिंदे लखनौला दिलेल्या भेटीदरम्यान बनल्या सेल्फी क्वीन!

**छत्रपती संभाजीनगर :** एण्ड टीव्हीवरील लोकप्रिय विनोदी मालिका 'भाबीजी घर पर है २.०'मधील अंगूरी भाबीची भूमिका साकारणारी अभिनेत्री शिल्पा शिंदे हिने लखनौ भेटीदरम्यान चाहत्यांशी मनमोकळा संवाद साधत आनंदाचे क्षण अनुभवले. उत्साही स्वभावासाठी ओळखल्या जाणाऱ्या शिंदे यांनी १०० हून अधिक चाहत्यांसोबत सेल्फी घेतल्या. आपल्या आवडत्या कलाकारासोबत फोटो काढताना चाहत्यांमध्ये प्रचंड उत्साह दिसून आला. चाहत्यांशी भेट आणि संवाद हा खास अनुभव असल्याचे सांगत शिंदे यांनी प्रेक्षकांनी मालिकेवर केलेल्या प्रेमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. 'भाबीजी घर पर है २.०' ही मालिका सोमवार ते शुक्रवार रात्री १०.३० वाजता एण्ड टीव्हीवर प्रसारित होते.

### आयकू झेड ११ एक्स भारतात लॉन्च

**मुंबई :** आयकू ने भारतीय बाजारात नवीन स्मार्टफोन आयकू झेड११एक्स लॉन्च केला आहे. विशेषतः कॉलेज विद्यार्थ्यांना लक्षात घेऊन तयार करण्यात आलेला हा स्मार्टफोन दमदार परफॉर्मन्स, मोठी बॅटरी आणि प्रगत एआय फीचर्ससह सादर करण्यात आला आहे. कंपनीच्या मते, हा आपल्या सेगमेंटमधील सर्वात वेगवान स्मार्टफोनपैकी एक असून तो मीडियाटेक डायमेन्सिटी ७४०० टर्बो प्रोसेसरवर चालतो. या प्रोसेसरला १ मिलियनपेक्षा जास्त -पर्ढीर्ढी बेंचमार्क स्कोअर मिळतो, ज्यामुळे स्मूथ मल्टीटास्किंग आणि गेमिंगचा उत्तम अनुभव मिळतो.

### वीवो वाई ५१ प्रो ५जी लॉन्च

**मुंबई :** वीवो इंडियाने आपल्या वाई सिरीजमध्ये नवीन स्मार्टफोन वीवो वाई५१ प्रो ५जी लॉन्च केला आहे. हा स्मार्टफोन अशा युजर्ससाठी डिझाइन करण्यात आला आहे जे स्मूथ आणि विश्र्वासार्ह परफॉर्मन्ससोबत इमर्सिव्ह एंटरटेनमेंटचा अनुभव घेऊ इच्छितात. हा फोन दैनंदिन वेगवान आणि बदलत्या जीवनशैलीशी जुळवून घेणारा अनुभव देतो. दीर्घकाळ टिकणारी परफॉर्मन्स, स्मूथ मल्टीटास्किंग आणि रोजच्या वापरासाठी सोयीस्कर अनुभव यावर विशेष लक्ष देत हा डिव्हाइस तयार करण्यात आला आहे.

### दीपक गर्ग यांना सीआयआय महाराष्ट्राचे अध्यक्ष, आरती कुचिभतला यांना उपाध्यक्ष पदावर निवड

**मुंबई :** कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री (सीआयआय) महाराष्ट्र राज्य कौन्सिल ने श्री दीपक गर्ग, व्हाईस चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर, सॅनी हेवी इंडस्ट्री इंडिया यांना सीआयआय महाराष्ट्राचे अध्यक्ष म्हणून आणि सुश्री आरती कुचिभतला, मॅनेजिंग डायरेक्टर आणि इंडिया लीड - गव्हर्नमेंट अॅडव्हायझरी स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप्स, अॅक्सेंचर यांना उपाध्यक्ष म्हणून निवडले आहे.

नवीन अध्यक्ष श्री दीपक गर्ग यांनी सांगितले की, उद्योग राज्याच्या 'विकसित महाराष्ट्र' या दृष्टिकोनाला पुढे नेण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल. यात उत्पादन वृद्धी, गुंतवणूक, पायाभूत सुविधा विकास आणि लघु व मध्यम उद्योग संबंध मजबूत करण्यावर विशेष लक्ष दिले जाईल.

# घरगुती एलपीजीचा पुरेसा साठा उपलब्ध; अफवांवर विश्वास ठेवू नका - प्रशासनाचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १२ मार्च :** आंतरराष्ट्रीय स्तरावरील काही भू-राजकीय परिस्थितीमुळे इंधन पुरवठ्याबाबत विविध प्रकारच्या बातम्या प्रसारित होत असल्या तरी नागरिकांनी कोणताही गैरसमज करून घेऊ नये. छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्व जिल्ह्यांमध्ये घरगुती एलपीजी सिलिंडरचा पुरेसा साठा उपलब्ध असून वितरण व्यवस्था नियमितपणे सुरू असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

केंद्र सरकारच्या पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाने दि. ९ मार्च २०२६ रोजी जारी केलेल्या आदेशानुसार देशात घरगुती एलपीजी उत्पादनाला प्राधान्य देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार देशातील तेल शुद्धीकरण कंपन्यांना प्रोपेन व ब्यूटेन यांसारख्या घटकांचा वापर प्राधान्याने एलपीजी उत्पादनासाठी करून तो सार्वजनिक क्षेत्रातील तेल विपणन कंपन्यांना - इंडियन ऑईल, भारत पेट्रोलियम व हिंदुस्तान पेट्रोलियम - उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या एलपीजीचा पुरवठा प्रामुख्याने घरगुती ग्राहकांसाठी करण्यात येणार आहे.

तेल विपणन कंपन्यांनीही स्पष्ट केले आहे की घरगुती ग्राहकांना एलपीजीचा पुरवठा सुरळीतपणे सुरू राहील. तसेच रुग्णालये, शैक्षणिक संस्था यांसारख्या अत्यावश्यक गैर-घरगुती क्षेत्रांनाही आवश्यकतेनुसार एलपीजी पुरवठा करण्यात येणार आहे. इतर गैर-घरगुती क्षेत्रांच्या मागण्यांचे परीक्षण करून प्राधान्यक्रम ठरवण्यासाठी तेल विपणन कंपन्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची समितीही स्थापन करण्यात आली आहे.

विभागातील सर्व जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना घरगुती एलपीजी गॅसच्या सुरळीत वितरणासाठी तसेच घरगुती गॅसचा अवैध वापर रोखण्यासाठी जिल्हास्तरावर दक्षता फिरते पथक स्थापन करून तपासण्या करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. तसेच घरगुती गॅसचे वितरण नियमित ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यासही सांगितले आहे.

# एमजीएममध्ये 'नॅटकॉन २०२६' राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १२ मार्च :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंटतर्फे 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) इनोव्हेशन्स : द फ्यूचर ऑफ हॉस्पिटॅलिटी' या संकल्पनेवर आधारित 'नॅटकॉन २०२६' या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेचे उद्घाटन शुक्रवार, दिनांक १३ मार्च २०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता एमजीएम विद्यापीठातील विनोबा भावे सभागृहात मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

उद्घाटन कार्यक्रमास एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, संचालक डॉ.कपिलेश मंगल, सुप्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

ही राष्ट्रीय परिषद शुक्रवार, दिनांक १३ मार्च २०२६ आणि शनिवार, दिनांक १४ मार्च २०२६ असे दोन दिवस चालणार असून आतिथ्य सेवा क्षेत्रातील विद्यार्थी, अभ्यासक, संशोधक आणि उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ यांचा यात सहभाग असणार आहे. तंत्रज्ञान आणि शाश्र्वततेच्या माध्यमातून आतिथ्य सेवा क्षेत्राला नवीन दिशा देणे आणि उद्योग व शिक्षण क्षेत्रातील दरी कमी करणे हा या परिषदेचा मुख्य उद्देश आहे.

परिषदेच्या प्रमुख पाहुण्या म्हणून महाराष्ट्र राज्य इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी, पुणेच्या प्राचार्या डॉ.सीमा झगडे उपस्थित राहणार आहेत. तसेच शैक्षणिक आणि औद्योगिक क्षेत्रातील तज्ज्ञ विविध सत्रांमध्ये मार्गदर्शन करणार आहेत. यामध्ये सिम्बायोसिस स्कूल ऑफ कलिनरी आर्ट्स अँड न्यूट्रिशनल सायन्सेसचे संस्थापक संचालक प्रा. शेफ अतुल ए. गोखले, 'महा चाय'चे संस्थापक व सीईओ प्रदीप कुलकर्णी, बनारसीदास चांदीवाला आयएचएमसीटी, नवी दिल्लीचे असोसिएट प्रोफेसर डॉ.अरविंद कुमार सरस्वती आणि सुप्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर यांचा समावेश आहे.

या परिषदेत एआय-आधारित ग्राहक अनुभव, स्मार्ट हॉस्पिटॅलिटी तंत्रज्ञान, हॉटेल व्यवस्थापनातील ऑटोमेशन तसेच हॉस्पिटॅलिटी, एव्हिएशन आणि पर्यटन क्षेत्रातील नवकल्पना या विषयांवर संशोधन सादरीकरणे होणार आहेत. संशोधक आणि प्राध्यापकांनी सादर केलेल्या उत्कृष्ट संशोधनासाठी 'बेस्ट रिसर्च पेपर अवॉर्ड' देऊन गौरविण्यात येणार आहे.

या राष्ट्रीय परिषदेचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी आणि संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले असून परिषदेत सहभागी होण्यासाठी पूर्वनोंदणी आवश्यक आहे.

# पैठणला नवीन बसस्थानकाचा अनेकांना चकवा



**तभा वृत्तसेवा**

**पैठण, दि. १२ मार्च :** श्री-क्षेत्र पैठणला काही अपवाद वगळता नाथषष्टी यात्रा नुकतीच सुरळीत पार पडत आहे. परंतु राज्य परिवहन मार्ग महामंडळाच्या वतीने नाथभक्तांसाठी नवीन जागेवर तयार करण्यात आलेल्या तात्पुरत्या बसस्थानकामुळे हजारो भाविकांना चकवा बसला असून शहराकडे येण्यास निघालेले भाविक पाचोड आणि शेवगाव रोडच्या दिशेने जातांना दिसले.

लाखो भाविकांची उपस्थिती असणाऱ्या राज्यातील दुसऱ्या क्रमांकाची मोठी यात्रा नाथषष्टीची नुकतीच काल्याने सांगता झाली. सांगता झाली असली तरी नववर्ष गुडीपाडवा पर्यंत ही यात्रा चालते. नाथ दर्शनासाठी यंदा लाखो भक्तांनी पैठण नगरीत आपली हजेरी लावली. भक्तांच्या सुविधेत कोणतेही कमी पडू नये म्हणून प्रशासनाच्या वतीने खबरदारी घेण्यात आली. यात येणाऱ्या भाविकांची संख्या पाहता राज्य परिवहन मार्ग महामंडळाला प्रतीवर्षी प्रमाणे यावर्षी ही तात्पुरते नवीन बसस्थानक करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या.

आधी डॉ बाबर यांच्या दवाखाण्या शेजारील जाग्यावर हे बस्थानक थाटले जायचे परंतु यंदा काही करणास्तव हे बसस्थानक पैठण गोलनाका महावीर चौक चैतन्य टॉवर शेजारील जागेवर तात्पुरता स्वरूपात तयार करण्यात आले. श्री संत एकनाथ महाराज दर्शनासाठी दरवर्षी येणाऱ्या भाविकांना बसस्थानकाच्या नवीन जागेचा बोथ नसल्याने तसेच आताची जागा पूर्वीच्या जागेप्रमाणे दिसत असल्याने त्यांचा चांगलाच गोंधळ उडाला. अबाल वृद्ध नागरिकांना याबाबत कुणी सूचना देत नसल्याने शहरात न जाता ते थेट पायी शहागड फाटा तसेच पाचोड फाटा रोडकडे जात होते. याबाबत बस स्थानक प्रशासनाने जागोजागी सूचना फलक आणि माहिती देणारी व्यक्ती नेमण्याची गरज होती. परंतु असे झाले नाही यामुळे अनेक भाविक भक्तांना चकवा बसला त्यामुळे काही रिक्षा चालकांचे चांगलेच फावले.

# त्या नराधमाला फाशीची शिक्षा झालीच पाहिजे

## सकल हिंदू समाजाच्या व बंजारा समाजाच्या भावना तीव्र

**तभा वृत्तसेवा**

**सोयगाव, दि. १२ मार्च :** तालुक्यातील एका गावातील त्या घटनेच्या निषेधार्थ गुरुवारी (दि.१२)सकल हिंदू समाज व बंजारा ब्रिगेडच्या वतीने सोयगाव शहरात भव्य आक्रोश मोर्चा काढण्यात आला होता.दरम्यान त्या नराधमाच्या ८० वर्षाच्या वृद्ध महिलेवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनेचा समाज बांधवांनी तीव्र शब्दात निषेध केला.

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातून महिला व पुरुषांच्या भव्य मोर्चाला सकाळी अकरा वाजता प्रारंभ झाला शहरातील काही भागातून मोर्चा बसस्थानक मार्गाने दुपारी एक वाजता तहसील वर धडकला.

या ठिकाणी मोर्चाचे भव्य सभेत रूपांतर झाले बंजारा ब्रिगेडच्या राष्ट्रीय अध्यक्ष रविकांत राठोड,ह.भ.प.कन्हैया महाराज,राहुल राठोड यांनी तीव्र शब्दात भावना व्यक्त केल्या होत्या अत्याचार घटनेचा आरोपी रमजान शेख यास फ़ाशीची शिक्षा द्या अशी प्रमुख मागणी मोर्चेकारांची होती व या आरोपीला मदत करणाऱ्या व्यक्तीला अटक करा या मागण्याच्या घोषणा बाजी मोर्चेकरी देत होते.



मोर्चातील मागण्या -या आक्रोश मोर्चात दिलेल्या निवेदनात या अत्याचाराच्या घटनेची सखोल चौकशी करून आरोपीला मदत करणाऱ्या व्यक्तीला सह आरोपी करा हे प्रकरण अति जलद न्यायालयात चालवा पीडित महिलेला पोलीस संरक्षण देऊन वीस लक्ष रु शासकीय मदत द्या यासह विविध मागण्यांचे निवेदन तहसीलदार मनीषा मेने यांना महिलांनी दिले.सोयगाव शहरात फर्दापूर,अजिंठा,सिल्लोड आदी ठिकाणावरून अतिरिक्त पोलीस बंदोबस्त मागविण्यात आला होता.सोयगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल,फर्दापूरचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रफुल्ल साबळे,पोलीस उपनिरीक्षक गजानन आरेकर आदींसह पोलीसांनी मोर्चा दरम्यान बंदोबस्त ठेवला होता.

# हरभरा खरेदीसाठी ऑनलाईन नोंदणी; ९ खरेदी केंद्रांना मंजुरी

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १२ मार्च :** महाराष्ट्र राज्य सहकारी पाणन महासंघ, मुंबई तसेच राष्ट्रीय सहकारी ग्राहक महासंघ (छउउऋ) यांच्या संयुक्त विद्यमाने हंगाम २०२५-२६ साठी केंद्र शासनाने निश्रि्चत केलेल्या आधारभूत दरानुसार हरभरा खरेदी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या अंतर्गत शेतकऱ्यांची ऑनलाइन नोंदणी व खरेदी प्रक्रिया दि. १ मार्च २०२६ पासून सुरू झाली आहे.

या योजनेअंतर्गत हरभऱ्याचा हमीभाव ५८७५रुपये प्रति क्विंटल निश्रि्चत करण्यात आला आहे. शेतकऱ्यांनी हरभरा विक्रीसाठी दि. १ मार्च ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणी झालेल्या शेतकऱ्यांकडून प्रत्यक्ष खरेदी दि. १ मार्च ते २९ एप्रिल २०२६ या कालावधीत करण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या सोयीसाठी छउउऋ कार्यालयाने ९ खरेदी केंद्रांना मंजुरी दिली आहे. त्यामध्ये छत्रपती संभाजीनगर, गंगापूर, वैजापूर, खुलताबाद, कन्नड, सोयगाव, सिल्लोड, फुलंब्री आणि पैठण या तालुक्यांचा समावेश आहे.

हरभरा उत्पादक शेतकऱ्यांनी निर्धारित कालावधीत ऑनलाइन नोंदणी करून हमीभावाने खरेदी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा पणन अधिकारी व्ही.यु. राठोड यांनी केले आहे.

# जगप्रसिद्ध अजिंठा लेणी मध्ये चार वाजता आग्या मोहोळ यांनी चावा घेतला

**तभा वृत्तसेवा**

**फर्दापूर, दि. १२ मार्च :** जगप्रसिद्ध अजिंठा लेणी मध्ये दुपारी चार वाजता पर्यटकांना आगे मोहोळाच्या मधमाशांनी चावा घेतला मंगळवारी दुपारी चार वाजेच्या दरम्यान लेणीतील बस पार्किंग समोर येथे पर्यटकांना आग्या मोहोळाच्या मधमाशांनीचावा घेतला यामध्ये देशी विदेशी पर्यटकांना चार वाजेच्या दरम्यान लेणी पाहून येणाऱ्या पर्यटकांना व लेणी पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांना हि मधमाशांनी चावा घेतला तसेच येणाऱ्या पर्यटकांची बस पर्यटक न उतरता तशीच बस वळवून बाहेर नेण्यात आल्या मुळे या पर्यटकांना कुठल्याही प्रकारची इजा झाली नाही मधमाशांनी चावा घेतलेल्या पर्यटक यामध्ये फॉरेनर दहा तसेच श्रीलंका ग्रुपमध्ये ऐंशी व जबलपूर मध्य प्रदेश येथील १० तर फर्दापूर येथील स्थानिक नागरिक यांना हि या मधमाशांनी चावा घेतला यात सर्वात लहान मुलगी वय सात जबलपूर या मुलीच्या चेहऱ्यावर मधमाशांनी चावा घेतल्यामुळे पूर्ण चेहरा सुजलेला आहे तसेच तिच्या आईच्या हाताला ही मधमाशांनी चावा घेतला आहे यामुळे लेणीत तब्बल १०० ते १२० जणांना मधमाशांनी जावा घेतला आहे काही पर्यटक स्वतःच्या गाडीने तर काही पर्यटक बसने खाजगी दवाखान्यात तर काही पर्यटक अजिंठा ग्रामीण रुग्णालयात उपचार घेण्यासाठी रवाना झाले असून हि घटना सर्वात मोठी घटना झाली आहे



# जैन गुरुकुल वेरूळ येथे नूतन मंदिर हॉलचे भूमिपूजन संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १२ मार्च :** जैन गुरुकुल वेरूळ येथे गुरुकुलातील विद्यार्थ्यांसाठी व श्रावक-भक्तांसाठी बांधण्यात येणाऱ्या नूतन मंदिर हॉलचे भूमिपूजन मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

आचार्य श्री १०८ विद्यासागरजी महामुनीराज व आचार्य श्री १०८ समयसागरजी महाराज यांचे परम प्रभावक शिष्य निर्यापक श्रमण मुनी श्री १०८ नियमसागरजी महाराज तसेच मुनी श्री १०८ सुपार्श्र्वसागरजी महाराज यांच्या आशीर्वाद व मंगल सान्निध्यात हा कार्यक्रम पार पडला. सर्वार्थसिद्धी या मंगल मुहूर्तावर सकाळी ७:५१ वाजता भूमिपूजन विधी संपन्न झाला.

श्री पार्श्र्वनाथ ब्रह्मचर्य आश्रम, जैन गुरुकुल वेरूळ येथे आयोजित या भूमिपूजन सोहळ्याचे विधी बालब्रह्मचारी महावीर भांगे अण्णा, संस्थेचे अध्यक्ष मा. श्री दिनेशजी गंगवाल व महामंत्री डॉ. प्रेमचंदजी पाटणी यांच्या हस्ते पार पडले. यावेळी प्रतिष्ठाचार्य बालब्रह्मचारी मनीष भैया यांचे सान्निध्य लाभले.



या प्रसंगी राष्ट्रपती पुरस्कार विजेते श्री निर्मलकुमारजी ठोले सर, जयचंदजी पाटणी, आदित्यजी सोनी, मदनलालजी अजमेरा, रमणलालजी पाटणी, सचिन अजमेरा, प्रदीप जैन, दीपक-निवेदिता जैन (सुरत) तसेच वेरूळ गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गुरुकुलातील विद्यार्थ्यांच्या आध्यात्मिक व सांस्कृतिक उपक्रमांसाठी तसेच श्रावक-भक्तांच्या सोयीसाठी हा नूतन मंदिर हॉल उभारण्यात येत असून, या उपक्रमाबद्दल उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.अशी माहिती प्रचार प्रसार सयोजक नरेंद्र अजमेरा पियुष कासलीवाल यानी दिली

## जाहीर प्रगटन

अर्जदार : श्री.राहुल भिमराव जाधव
रा. मेहुन पुरनवाडी ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर
विरुध्द
गैरअर्जदार : उपनिबंधक, जन्ममृत्यू नोंदणी विभाग,
महानगर पालिका, छत्रपती संभाजीनगर

विषय : जन्म मृत्यु अधिनियम १९६९ सुधारीत अधिनियम २०२३ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

संदर्भ : श्री.राहुल भिमराव जाधव, रा. मेहुन पुरनवाडी ता.कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर यांचा अर्ज दि. २०.०२.२०२६

विषयांकीत प्रकरणी अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम १९६९ चे सुधारीत अधिनियम २०२३ चे कलम १३ (३) अन्वये अर्जदार यांचे मुलगी नामे, प्रगती राहुल जाधव यांचा दिनांक २५.११.२०२४ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथे जन्म झालेला असून, जन्म/मृत्यु नोंद नोंदवहीत घेण्यासाठी या न्यायालयाचे आदेश मिळण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे.

अर्जदार श्री.राहुल भिमराव जाधव यांचे मुलगी नामे, प्रगती राहुल जाधव यांची जन्म नोंद नसल्याबाबत उपनिबंधक, जन्ममृत्यू नोंदणी विभाग, महानगर पालिका, छत्रपती संभाजीनगर

उपनिबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर यांचा दाखला सादर केलेला आहे.

सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व गैरअर्जदार व जनतेस सुचित करण्यात येते की, अर्जदाराचे सिया मुलगी नामे. प्रगती राहुल जाधव यांचा दिनांक २५.११.२०२४ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथे जन्म झाला असून, सदर प्रमाणपत्र जारी करण्यास जर कुणाचा काही उजर/आक्षेप/हरकत / तक्रार असेल तर त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत आपला उजर/आक्षेप/हरकत/तक्रार मुळ कागदपत्रांसह उपविभागीय दंडाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कार्यालय, आलमगीर कॉलनी, जिल्हाधिकारी कार्यालय परीसर, छत्रपती संभाजीनगर येथे नांव, संपूर्ण पत्ता व संपर्क क्रमांक स्पष्ट नमुद करुन लेखी स्वरुपात नोंदवावा. मुदतीनंतर आलेला उजर / आक्षेप /हरकत/तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही तसेच अर्जदारांचे प्रमाणपत्रासाठीचा आदेश नियमाप्रमाणे देण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

सदर जाहीर प्रगटन माझ्या सही व शिक्क्यानिशी दि.०५/०३/२०२६ रोजी देण्यात आले.

दिनांक : १२/०३/२०२६
ठिकाण : छत्रपती संभाजीनगर.

उप विभागीय अधिकारी
तथा उपविभागीय दंडाधिकारी,
छत्रपती संभाजीनगर करीता

## जाहीर प्रगटन/सायटेशन

मा. दिवाणी न्यायाधिश साहेब,
क. स्तर न्यायालय गंगापुर
ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

सिव्हिल एम.ए. क्र.१४६/२०२६
अर्जदार:-१) पार्वताबाई भ्र. गोरखनाथ गायके वय ७५ वर्ष, धंदा शेती, रा. घाणेगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) योगेश गोरखनाथ गायके वय ३८ वर्षे, धंदा शेती, रा. घाणेगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) सतिष गोरखनाथ गायके वय ३६ वर्ष, धंदा शेती, रा. घाणेगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) शारदा अ. संतोष कांबळे, वय ४३ वर्षे धंदा घरकाम रा. ताडपिंपळगाव पो. देवगाव रंगारी ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर
विरुध्द
गैरअर्जदार :- निरंक
प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ अॅड. श्री. अमोल पी. ठाकुर यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.२ व ३. हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ असुन अर्जदार क्र.४ ही त्यांची बहिण आहे व अर्जदार क्र.१ ही अर्जदार क.२ ते ४ यांची आई आहे. अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र. २ ते ४ यांचे वडील नामे गोरखनाथ शंकर गायके हे मौजे घाणेगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथील रहिवाशी होते ते दिनांक ०२/०८/२०१८ रोजी मोजे घाणेगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. मयत गोरखनाथ शंकर गायके यांना अर्जदार क्र.१ ते ४ हे कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वासरदारनसल्याचे नमुद करुन शासकीय-निमशासकीय व इतर कार्यालयीन कामासाठी वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्दतीनंतर आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ०९/०३/२०२६ रोजी दिले, प्रकरणात पुढील तारीख दिनांक २४/०४/२०२६ रोजीची ठेवण्यात आलेली आहे.

वरीष्ठ / कनिष्ठ लिपीक.
सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय क स्तर गंगापुर

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# जिल्ह्यातील अधिकाऱ्यांची रिक्त पदे तात्काळ भरा : आ. पाटील यांची विधानसभेत मागणी

परभणी ,/प्रतिनिधी- जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत. अनेक चांगल्या अधिकाऱ्यांची ४ ते ६ महिन्यांत बदली केली जात असल्याने प्रशासनातील कामकाजावर परिणाम होत आहे. रिक्त पदांमुळे नागरिकांची कामे मोठ्या प्रमाणात रखडत असून पाच-सहा दिवसांत होणाऱ्या कामासाठी नागरिकांना वर्षभर शासकीय कार्यालयांचे खेटे मारावे लागत आहेत. त्यामुळे दप्तर दिरंगाई कायद्याची कठोर अंमलबजावणी करावी व अधिकाऱ्यांची रिक्त पदे तात्काळ भरावीत, अशी मागणी आमदार डॉ. राहुल पाटील यांनी केली.

**नवीन क्रीडा संकुलासाठी जागा व निधीची मागणी**

**परभणी शहर व जिल्ह्यातील खेळाडूंसाठी नवीन क्रीडा संकुल उभारण्याचा प्रस्ताव वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या १५ एकर जागेसाठी पाठविण्यात आला आहे. मात्र तीन वर्षांपासून या प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतलेला नाही. या क्रीडा संकुलासाठी १५ कोटी रुपयांचा निधी मंजूर असून आतापर्यंत केवळ ८ कोटी रुपये मिळाले आहेत. त्यामुळे उर्वरित निधी व जागा तातडीने उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी आ. डॉ. राहुल पाटील यांनी केली.**




आमदार पाटील यांनी परभणी जिल्ह्यातील विविध प्रलंबित प्रश्नांवरून महाराष्ट्र विधानसभेत आक्रमक भूमिका घेत अधिकाऱ्यांची रिक्त पदे तात्काळ भरणे, दप्तर दिरंगाई कायद्याची कठोर अंमलबजावणी करणे तसेच जिल्हा परिषद शाळांच्या इमारतींसाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली. जिल्ह्यातील अनेक जिल्हा परिषद शाळांच्या इमारती निजामकालीन असून त्या सध्या मोडकळीस आल्या आहेत. या शाळांच्या इमारतींसाठी निधी जाहीर करण्याची मागणी तत्कालीन शिक्षण मंत्री विनोद तावडे यांच्याकडे केली होती; मात्र अद्याप निधी मंजूर झालेला नाही. त्यामुळे धोकादायक इमारतींमध्ये भरत असलेल्या शाळांसाठी नवीन इमारती उभारण्यासाठी शासनाने तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी आ. पाटील यांनी केली.

तसेच परभणी शहराचा वाढता विस्तार आणि लोकसंख्या लक्षात घेऊन अपर तहसील कार्यालय मंजूर करण्यात आले असले तरी ते अद्याप स्थापन झालेले नाही. त्यामुळे अप्पर तहसील कार्यालय सुरू करून शहरात किमान सहा तलाठी कार्यालये निर्माण करावीत, अशी मागणीही त्यांनी केली. ग्रामीण भागातील शेत, पानंद रस्ते व गावांना जोडणाऱ्या पुलांसाठी विशेष निधी देण्याची मागणीही त्यांनी सभागृहात मांडली.

## संक्षिप्त वृत्त...

### डॉ. हरिहर कौसडीकर यांची भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या जनरल बॉडीवर शास्त्रज्ञ सदस्य म्हणून नियुक्ती

**परभणी,दि.१२(प्रतिनिधी) :** नवी दिल्ली येथील भारतीय कृषी संशोधन परिषद या देशातील सर्वोच्च कृषी संशोधन संस्थेच्या जनरल बॉडीवर वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील मृद विज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. हरिहर कृष्णराव कौसडीकर यांची शास्त्रज्ञ सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली असून त्यांचा कार्यकाळ ९ मार्च २०२६ ते ८ मार्च २०२९ असा तीन वर्षांचा राहणार आहे.

भारतीय कृषी संशोधन परिषद सोसायटीची जनरल बॉडी ही परिषदेची सर्वोच्च संस्था असून तिचे अध्यक्ष केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्री असतात. या संस्थेमध्ये उच्चपदस्थ सरकारी अधिकारी, नामवंत शास्त्रज्ञ तसेच शेतकरी प्रतिनिधी यांचा समावेश असतो. देशातील कृषी शिक्षण, संशोधन आणि धोरणात्मक नियोजनाला दिशा देणे, प्रगतीचा आढावा घेणे तसेच भावी धोरणे निश्चित करणे ही या संस्थेची प्रमुख जबाबदारी आहे.

या निवडीबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी डॉ. कौसडीकर यांचे अभिनंदन केले. तसेच शिक्षण संचालक डॉ. भगवान आसेवार, संशोधन संचालक डॉ. खिजर बेग आणि विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश आहिरे यांनीही त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

डॉ. हरिहर कौसडीकर हे वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठात उपसंचालक (संशोधन) तसेच मृद विज्ञान विभागात प्राध्यापक व विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. कृषी शिक्षण, संशोधन, नियोजन, व्यवस्थापन तसेच कृषी विस्तार क्षेत्रातील त्यांच्या दीर्घ अनुभवाची दखल घेऊन भारत सरकारने देशातील ७४ कृषी विद्यापीठांमधून त्यांची या महत्त्वपूर्ण समितीवर निवड केली आहे. कृषी परिषद, पुणे येथे कृषी शिक्षण, संशोधन व विस्तार शिक्षण विभागाच्या संचालक पदांचा अनुभव तसेच मृदविज्ञान विषयातील त्यांच्या संशोधन कार्याचा देशातील कृषी शिक्षण व संशोधनाच्या विकासासाठी उपयोग होणार असल्याचे मानले जात आहे.

डॉ. कौसडीकर यांची ही निवड महाराष्ट्र राज्य आणि वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठासाठी अभिमानाची बाब असल्याची भावना विद्यापीठातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे. तसेच विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांनीही त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### नटराज रंगमंदिर तातडीने सुरू करा; परभणी जिल्हा कल्चरल असोसिएशनची महापौर व उपमहापौरांकडे मागणी

**परभणी,दि.१२(प्रतिनिधी) :** जिल्ह्याच्या कलाक्षेत्राचे वैभव मानले जाणारे नटराज रंगमंदिर मागील अनेक वर्षांपासून बंद असून ते तातडीने सुरू करण्यात यावे तसेच जिल्हा क्रीडा संकुलासमोरील नवीन नाट्यगृहाचे काम लवकर पूर्ण करून तेही कलावंतांसाठी खुले करावे, अशी मागणी परभणी जिल्हा कल्चरल असोसिएशनच्या वतीने नवनिर्वाचित महापौर सय्यद इकबाल व उपमहापौर गणेश देशमुख यांच्याकडे करण्यात आली.

११ मार्च रोजी परभणी महानगरपालिकेच्या कार्यालयात असोसिएशनच्या वतीने नवनिर्वाचित महापौर व उपमहापौर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. सुनील तुरुकमाने यांनी नटराज रंगमंदिराची सद्यस्थिती मांडत ते तातडीने सुरू करण्याची मागणी केली. यावेळी बोलताना डॉ. तुरुकमाने म्हणाले की, नटराज रंगमंदिर या मंचाच्या माध्यमातून अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे कलावंत घडले आहेत. परभणी ही सांस्कृतिक रंगभूमी म्हणून ओळखली जाते. नृत्य, नाट्य, अभिनय, गायन व वादन अशा विविध कलाप्रकारांसाठी नटराज रंगमंदिर हे एक महत्त्वाचे व्यासपीठ होते. मात्र सध्या या रंगमंदिराची दुर्दशा झाली असून ते अनेक वर्षांपासून बंद असल्याने स्थानिक कलावंतांना आपल्या कलेचे सादरीकरण करण्यासाठी योग्य मंच उपलब्ध होत नाही. त्यामुळे राज्यस्तरीय व राष्ट्रीय सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करणेही कठीण झाले असल्याचे त्यांनी नमूद केले.

तसेच जिल्हा क्रीडा संकुलासमोरील नव्याने उभारण्यात येत असलेल्या नाट्यगृहाचे बांधकामही अद्याप अपूर्ण अवस्थेत असल्याने तेही तातडीने पूर्ण करून सुरू करण्यात यावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक असोसिएशनचे सचिव राहुल वहीवाळ यांनी केले. यप्रसंगी डॉ. राहुल टेंगसे, अमर गालफाडे, प्रकाश बारबिंड, अंगद सोंगे, परवेज शेख आदी उपस्थित होते.

### राज्यस्तरीय बालनाट्य स्पर्धेत मराठवाडा हायस्कूलचा ठसा; सई चिटणीस हिला रौप्यपदक

**परभणी,दि.१२(प्रतिनिधी) :** मुंबई येथे १० मार्च रोजी पार पडलेल्या राज्यस्तरीय बालनाट्य स्पर्धेच्या अंतिम फेरीत परभणीच्या मराठवाडा हायस्कूलने उल्लेखनीय कामगिरी करत आपला ठसा उमटवला. इयत्ता आठवी 'ब' वर्गातील कु. सई आशिष चिटणीस हिने उत्कृष्ट अभिनय सादर करत वैयक्तिक मुली गटात रौप्य पदक पटकावले.

या स्पर्धेत राज्यभरातून एकूण ४२ नाटकांचे सादरीकरण करण्यात आले होते. त्यामध्ये मराठवाडा हायस्कूलने सादर केलेल्या 'मोतीचूर' या नाटकाने प्रभावी सादरीकरण करत तृतीय क्रमांक मिळवला. या यशाबरोबरच संघाला ८० हजार रुपयांचे रोख पारितोषिकही मिळाले. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शाळेचा लौकिक राज्यस्तरावर अधिक उंचावला आहे. या नाटकात कु. सई चिटणीस, सर्वेश चिटणीस, स्वरा कुलकर्णी, साईराज गायकवाड आणि शौर्य गायकवाड यांनी आपल्या भूमिका प्रभावीपणे साकारत प्रेक्षकांची मने जिंकली. त्यांच्या अभिनयाचे परीक्षकांनीही कौतुक केले. कु. सई चिटणीस हिने साकारलेली भूमिका विशेष गाजली आणि तिच्या दमदार अभिनयामुळे तिला वैयक्तिक गटात रौप्य पदक प्राप्त झाले.

या उल्लेखनीय यशाबद्दल कु. सई चिटणीस व त्यांच्या पालकांचे अभिनंदन करण्यात आले. तसेच सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे मनापासून कौतुक करण्यात आले. नूतन विद्या समितीचे अध्यक्ष विजय जोशी, उपाध्यक्ष अनिल अष्टूरकर, उपाध्यक्ष दिलीप कुलकर्णी, सचिव संतोष धारासुरकर, सहसचिव व मुख्याध्यापक अनंत पांडे, कोषाध्यक्ष श्रीनिवास मुंदडा, संचालक वेंकटेश तोरंबेकर, वर्गशिक्षिका सौ. विद्या सोनुने आणि सर्व शिक्षक बंधू-भगिनी यांनी सई चिटणीस हिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### शिवसेना जिल्हा परिषद गटनेतेपदी सुमनबाई उगले

**परभणी,दि.११(प्रतिनिधी) :** शिवसेना (शिंदे गट) पक्षाच्या जिल्हा परिषद गटनेतेपदी सुमनबाई उगले यांची तर उपनेतापदी कौशल्याबाई शिंदे यांची निवड करण्यात आली.

या निवडीबाबतचे अधिकृत प्रमाणपत्र आज बुधवार ११ मार्च रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख आनंद भरोसे, महानगर प्रमुख माणिक पौढे यांच्यासह पक्षाचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## कौसडी येथे हजरत ख्वाजा कमालोद्दीन दर्गाहचा संदल उत्साहात संपन्न

**जिंतूर,/प्रतिनिधी:** जिंतूर तालुक्यातील कौसडी येथील हजरत ख्वाजा कमालोद्दीन दर्गाहचा संदल शनिवार, ७ मार्च रोजी मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही या संदल कार्यक्रमासाठी परिसरातील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती.

संदल सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर दोन दिवसांपूर्वीच दर्गाहची रंगरंगोटी करण्यात आली होती तसेच संपूर्ण दर्गाह परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. ७ मार्च रोजी तरावीह नमाजानंतर ठराविक ठिकाणाहून घोड्यावर हजरत ख्वाजा कमालोद्दीन दर्गाहचे संदल काढण्यात आले. गावातील ठराविक मार्गाने ढोल-ताशांच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली. तसेच ''हजरत ख्वाजा कमालोद्दीन'' यांच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. मिरवणूक दर्गाहवर पोहोचल्यानंतर संदल चढविण्यात आले. त्यानंतर उपस्थित भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. पुढे कव्वाली समाचा कार्यक्रमही आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला भाविकांनी मोठ्या उत्साहात प्रतिसाद दिला.

हा संदल कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी शेख बिलालोद्दीन, शेख अली, शेख चांदपाशा, शेख इब्राहिम, शेख सलाउद्दीन, शेख ऐनोद्दीन, शेख नसीर, शेख जमाल, शेख सबदर, शेख जाकेर शेख, शेख एजाज, शेख रियासोद्दीन, शेख फजिल, शेख हुजूर, शेख महेबूब, शेख हसन, शेख असलम, शेख सुभान, शेख मैनोद्दीन मिया, शेख सलाउद्दीन वहाब तसेच मॅनेजमेंट कमिटी व सर्व इनामदार (मुजावर) यांनी विशेष परिश्रम घेतले.

दरम्यान, बोरी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक एस. एम. थोरवे यांनी कार्यक्रमाला भेट दिली.

## ज्ञानेश्वर माऊलींच्या गजराने दुमदुमली, सेलू नगरी भव्य ग्रंथदिंडीने निर्माण केला भक्तीचा महासागर

**सेलू,/प्रतिनिधी:** शहरातील सातोना रस्त्यावरील मयुरी पार्क परिसरातील अलंकापुरी नगरी येथे १२ ते १९ मार्च दरम्यान होणाऱ्या फिरता ज्ञानेश्वरी पारायण सांगता सोहळ्याच्या निमित्ताने बुधवारी (दि.११) ग्रामदैवत श्री केशवराज बाबासाहेब महाराज मंदिरापासून भव्य ग्रंथदिंडी काढण्यात आली.

''ज्ञानेश्वर माऊलींच्या'' जयघोषाने संपूर्ण सेलू नगरी दुमदुमून गेली आणि परिसर भक्तिमय वातावरणाने न्हाऊन निघाला. ग्रंथदिंडीत माऊलींचा रथ, तुकाराम महाराजांचे अश्व, सुमारे ७५० वारकरी पताका, फेटेवाले नागरिक, तुळशीधारी व वृक्षधारी वारकरी, कलशधारी महिला, टाळकरी-वीणेकरी यांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. विशेष म्हणजे ज्ञानेश्वरी, ज्ञानेश्वर आणि ज्ञानदेव नाव असलेल्या व्यक्तींनीही दिंडीत सहभागी होत भक्तीची अनोखी परंपरा जपली.



नूतन कन्या प्रशाला व श्री केशवराज बाबासाहेब विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे लेझीम पथक, यशवंत विद्यालय, नूतन प्राथमिक विद्यालय, शारदा विद्यालय आणि कस्तुरबा गांधी विद्यालयातील विद्यार्थ्यांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला. परभणी, जालना, बीड, वाशिम, पुणे तसेच परिसरातील विविध जिल्ह्यांमधून आलेल्या सुमारे दहा हजारांहून अधिक वारकऱ्यांनी ग्रंथदिंडीत सहभाग घेतला. दिंडीचा समारोप सामूहिक पसायदानाने करण्यात आला. या प्रसंगी ह.भ.प. पंडित महाराज डाके, अच्युत महाराज दत्तापुरकर, कृष्णा महाराज रासवे, १००८ मनीषानंद महाराज पुरी, ह.भ.प. शिवाजी महाराज खवणे व शंतनू पाठक यांची प्रमुख उपस्थिती होती.

रांगोळ्यांनी सजले मार्ग, जागोजागी पुष्पवृष्टी ग्रंथदिंडी मार्गावर श्री केशवराज बाबासाहेब महाराज मंदिर ते अलंकापुरी नगरी पारायण स्थळापर्यंत नगरपालिकेच्या वतीने स्वच्छता व सडासंमार्जन करण्यात आले होते. रस्त्याच्या दुतर्फा तसेच चौकाचौकांत आकर्षक रांगोळ्या काढून स्वागत करण्यात आले. दिंडी मार्गावर ठिकठिकाणी पुष्पवृष्टी करून वारकऱ्यांचे स्वागत करण्यात आले. ग्रंथदिंडीत सहभागी भाविकांसाठी फराळ, केळी, पाणी, झुणका-भाकरी व शरबताचे वाटप सोपारा, फुलवाडी वस्ती, ब्राह्मणवाडी, आष्टी, हिस्सी, माव पाटोदा, पाथरी, नरसिंग नागनाथ संस्थान, बोरगव्हाण व मानवत येथील ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले.

## अन्नसुरक्षेबाबत शून्य तडजोड; नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई;अन्न व औषध प्रशासनाच्या जिल्हा सल्लागार समितीच्या बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

**सेलू,/प्रतिनिधी:** परभणी जिल्ह्यात नागरिकांना सुरक्षित, शुद्ध आणि दर्जेदार अन्न उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी असून अन्नसुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या अन्न व्यावसायिकांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी दिले.



परभणी येथे जिल्हाधिकारी कार्यालयात १० मार्च २०२६ रोजी अन्न व औषध प्रशासनाच्या जिल्हा सल्लागार समितीची बैठक पार पडली. या बैठकीत अन्नसुरक्षा व मानके अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी, अन्न नमुना तपासणीची प्रक्रिया, पोषणविषयक जनजागृती आणि विविध शासकीय विभागांमधील समन्वय याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.यावेळी बोलताना जिल्हाधिकारी चव्हाण म्हणाले की, जिल्ह्यातील सर्व अन्न व्यावसायिकांनी अन्नसुरक्षा व मानके अधिनियमाचे नियम काटेकोरपणे पाळले पाहिजेत. नागरिकांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही. अन्न व औषध प्रशासनाने नियमित तपासण्या करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी तसेच नागरिकांमध्ये अन्नसुरक्षेबाबत जनजागृती वाढवावी. बैठकीस जिल्हा पुरवठा अधिकारी विलास मुसळे, जिल्हा महिला व बालकल्याण कार्यालयाच्या श्रीमती मोनिका रंधवे, जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयाच्या प्रतिनिधी डॉ. रेवती स. महाजन, जिल्हा कृषि विकास अधिकारी दिपक समले, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) श्रीमती चैताली कोकुलवार तसेच अन्न विज्ञान व पोषण विभाग, सामुदायिक विज्ञान महाविद्यालय, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या श्रीमती विजया पवार, अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे देवगिरी प्रांताध्यक्ष डॉ. विलास मोरे, सोपान टोले यांची उपस्थिती होती. उपस्थित सदस्यांनी अन्नसुरक्षा कायद्यांच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत तसेच ग्राहक जनजागृती वाढविण्याबाबत आपली मते मांडली. तसेच केटरर व अन्न व्यावसायिक प्रतिनिधी दीपक तलरेजा यांनी अन्न व्यावसायिकांच्या अडचणी व सूचना समितीसमोर मांडल्या. बैठकीचे समन्वयन अ. ए. चौधरी, सहायक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, परभणी यांनी केले. या बैठकीत जिल्ह्यात अन्नसुरक्षा व्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

## स्त्रियांनी आपली क्षमता ओळखून पुढे जाण्यासाठी प्रयत्न करावा : प्राचार्य डॉ. बबन पवार

**परभणी,/प्रतिनिधी:** स्त्रियांनी आपली क्षमता ओळखून पुढे जाण्यासाठी प्रयत्न करावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. बबन पवार यांनी केले.

येथील शारदा महाविद्यालयात अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या वतीने जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पवार अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. तसेच प्रमुख पाहुण्या म्हणून जिजाऊ ब्रिगेडच्या माजी अध्यक्षा व किरण ट्रॅव्हल्स वर्ल्ड टूरच्या अध्यक्षा सौ. किरण विलास काळे या उपस्थित होत्या. या प्रसंगी उपप्राचार्य डॉ. श्यामसुंदर वाघमारे व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. संतोष नाकाडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना सौ. किरण काळे म्हणाल्या की, महिलांनी ठरवले तर त्या कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होऊ शकतात हे सांगताना त्यांनी आपल्या आयुष्यातील अनुभवांचे कथन केले. यप्रसंगी कु. वैष्णवी डहाळे हिने तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे विमोचन करण्यात आले. यावेळी अनेक विद्यार्थिनींनी स्वरचित कविता सादर केल्या तर कु. राधा साबळे हिने आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी बोलताना सौ. किरण काळे म्हणाल्या की, महिलांनी ठरवले तर त्या कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होऊ शकतात हे सांगताना त्यांनी आपल्या आयुष्यातील अनुभवांचे कथन केले.

## पत्रकार भवनात दावत-ए-इफ्तार : जिंतूरमध्ये सामाजिक सलोख्याचा सुंदर संदेश

**जिंतूर,/प्रतिनिधी:** पत्रकार भवनात दावत-ए-इफ्तार : जिंतूरमध्ये सामाजिक सलोख्याचा सुंदर संदेश जिंतूर, प्रतिनिधी : पवित्र रमजान महिन्याच्या निमित्ताने जिंतूर तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही दावत-ए-इफ्तार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शहरातील भाजी मंडी परिसरातील पत्रकार भवन येथे आयोजित या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवर, पत्रकार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून सामाजिक एकोपा व बंधुभावाचा संदेश दिला. रमजानच्या पवित्र महिन्यात रोजा सोडल्यानंतर आयोजित करण्यात आलेल्या या दावत-ए-इफ्तार कार्यक्रमात सर्व धर्मीय मान्यवरांनी एकत्रितपणे सहभागी होत सौहार्दाचे वातावरण निर्माण केले. यावेळी सेलू येथील उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी, नायब तहसीलदार प्रशांत राखे, पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे, जिंतूर नगराध्यक्ष प्रताप देशमुख, ॲड. मनोज सारडा, नगरसेवक इस्माईल पहलवान, डॉ. दुर्गादास कान्हडकर, प्रदीप चौधरी, ॲड. गोपाळ रोकडे, डॉ. इरफान पटेल, डॉ. जुनेद, टिका खान, जेष्ठ पत्रकार एम. ए. माजिद, निहाल अहमद, शेख शकील, प्रभाकर लिखे,



माजी सैनिक बालाजी शिंदे, बाळासाहेब काजळे यांच्यासह तालुक्यातील अनेक पत्रकार व मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन जिंतूर तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष बालाजी शिंदे सोसकर, सचिव महेश देशमुख आणि कार्याध्यक्ष शिराज सिद्दिकी यांच्या पुढाकारातून करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी एकत्रितपणे इफ्तार करत परस्पर संवाद साधला आणि समाजात बंधुभाव, शांतता व ऐक्य टिकवण्याचा संदेश दिला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी पत्रकार संघाच्या या उपक्रमाचे कौतुक करत अशा सामाजिक एकात्मता वाढविणाऱ्या कार्यक्रमांमुळे समाजात सकारात्मक वातावरण निर्माण होत असल्याचे मत व्यक्त केले. रमजानच्या पवित्र महिन्यात आयोजित करण्यात आलेल्या या दावत-ए-इफ्तार कार्यक्रमामुळे जिंतूर शहरात सामाजिक सलोखा व एकतेचे वातावरण अधिक दृढ झाल्याचेही उपस्थितांनी नमूद केले.

## अग्रलेख...

# सारे भेदभाव संपुष्टात यावेत...

१९३७ च्या शरीयत कायद्यातील तरतुदी या मुस्लिम महिलांसोबत भेदभाव करणाऱ्या असल्याचे सांगून, त्या रद्द कराव्या यासाठी दाखल याचिकेवर सुनावणी करताना, आता समान नागरी कायदा लागू करण्याची योग्य वेळ आली आहे, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण मंगळवारी सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले. भारतासारख्या वैविध्यपूर्ण देशात, जिथे लग्न, घटस्फोट, वारसाहक्क आणि दत्तक विधान यासारखे विषय धर्माधारित 'पर्सनल लॉ'नुसार चालतात, तिथे 'एक देश, एक कायदा' ही संकल्पना या निर्देशामुळे पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आली आहे. समान नागरी कायदा लागू करण्यासंदर्भात संसदेने लक्ष द्यावे, असेही न्यायालयाने म्हटले आहे. त्यामुळे आता चेंडू कायदेमंडळाच्या 'कोर्टा'त पोहोचला आहे.

सर्व नागरिकांसाठी समान न्याय असावा याबाबत मतभेद असण्याचे काही कारण नाही. मात्र, तसा कायदा करताना सामाजिक, सांस्कृतिक रीतिभातींसह चांगल्या परंपरांचा विचार होणेही गरजेचे आहे. विद्यमान सरकार हाच भाव ठेवून समान नागरी कायदा अर्थात 'यूसीसी' आणण्याचा विचार करीत आहे. शाळेतील विद्यार्थी ठरावीक गणवेश घालतात. त्यामुळे ते एकसारखे भासतात. त्यांच्यात गरिबी-श्रीमंतीचा भेद दिसत नाही. सर्व विद्यार्थ्यांना एकसारखे बनविणे हा त्यामागचा उद्देश नसतो. प्रत्येक विद्यार्थी आपले वेगळेपण राखूनही समूहात एकरूप होतो. समान नागरी कायद्याचा उद्देश असाच काहीसा आहे.

सध्या भारतात हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन आणि पारशी समुदायांसाठी वेगवेगळे कायदे आहेत. सध्या न्यायालयात दाखल होणाऱ्या याचिका बघता, देशातील सर्व नागरिकांसाठी, मग त्यांचा धर्म, जात किंवा पंथ कोणताही असो, विवाह, घटस्फोट, वारसाहक्क, पोटगी आणि दत्तक प्रक्रिया यासाठी समान कायदा असावा, अशी चर्चा हाणे स्वाभाविक आहे. १८३५ मध्ये सर्वांत आधी या कायद्याबाबत विचार झाला होता. मात्र, आधीच हात पोळले असल्याने ब्रिटिशांनी तेव्हा धार्मिक बाबतीत हस्तक्षेप न करण्याचे धोरण अवलंबिले. स्वातंत्र्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी, समान नागरी कायद्याचा जोरदार पुरस्कार केला. पण तत्कालीन परिस्थिती पाहता आणि मुस्लिम समुदायाचा विरोध लक्षात घेऊन, हा विषय कलम ४४ अंतर्गत 'मार्गदर्शक तत्त्वांमध्ये' समाविष्ट करण्यात आला. याचा दुसरा अर्थ, भविष्यात अनुकूल वेळ आल्यावर सरकारने हा कायदा लागू करावा, असा होता. जगातल्या बहुतांश विकसित देशांत समान नागरी कायदा आहे. जर्मनी, फ्रान्स या देशात हा कायदा राबविला जातो. अमेरिकेत थोड्या वेगळ्या अर्थाने तो लागू आहे. पोर्तुगाल, रशिया, चीन आदींमध्येही तो स्वीकारला गेला आहे.

भारतात समान नागरी कायद्याची मागणी केवळ राजकीय नसून, ती मानवाधिकार आणि महिलांच्या हक्कांशीही जोडली आहे. ७३ वर्षीय शहाबानो यांना त्यांच्या पतीने घटस्फोट दिला होता. सर्वोच्च न्यायालयाने त्यांना पोटगी देण्याचा आदेश दिला. मात्र, कट्टरपंथीयांच्या दबावाखाली तत्कालीन सरकारने कायदा बदलून न्यायालयाचा निर्णय फिरवला. ही १९८५ मधील घटना स्मरणात ठेवली पाहिजे. त्यानंतरच्या काही खटल्यांतही न्यायालयांनी समान नागरी कायद्याचा विचार व्हावा, असे सुतोवाच केले होते. मात्र, पुढे २१ वा विधि आयोग आला. या आयोगाचे अध्यक्ष न्या. बलबीर सिंह चौहान होते. या आयोगाने, सध्या हा कायदा लागू करणे घाईचे होईल, असे मत त्यावेळी मांडले. त्याचा आधार या कायद्याचे विरोधक आजही घेतात. मात्र, याच आयोगाने, धर्मांच्या 'पर्सनल लॉ'मधल्या अनिष्ट प्रथा दूर करण्याची शिफारस केली होती. बहुपत्नीत्व रद्द करणे आणि निकाहनाम्यात बदलाच्या तरतुदी सांगितल्या होत्या, याकडे हे ऊरबडवे दुर्लक्ष करतात.

भारतात केवळ गोवा हे असे राज्य आहे, जिथे पोर्तुगीज काळापासून समान नागरी कायदा अस्तित्वात आहे. कारण तेव्हा हा कायदा पोर्तुगालमध्ये आला होता आणि गोवा त्यांच्याकडे असल्याने तो तेथेही तसाच लागू झाला. नंतरच्या काळात पोर्तुगालमध्ये थोडाफार बदल करून नवा कायदा आला. मात्र, १९६१ मध्ये गोवा मुक्त झाल्यानंतरही तेथे १८६७ चाच कायदा आजतागायत कायम आहे. हिंदू, मुस्लिम किंवा ख्रिश्चन या सर्वांना तिकडे या एकाच कायद्याने बांधले आहे. गोव्यात लग्नाची अधिकृत नोंदणी अनिवार्य आहे. घटस्फोटाचे नियम सर्वांसाठी सारखे आहेत. संपत्तीत पती-पत्नीचा वाटा समान आहे आणि पालकांच्या मालमत्तेत मुला-मुलींनाही समान हक्क मिळतो. तेथे मुस्लिम पुरुषाला बहुपत्नीत्वाची परवानगी नाही, जे देशाच्या इतर भागात शरीयत कायद्यानुसार शक्य आहे. गोव्याचा हा कायदा प्रगतिशील मानला जात असला, तरी त्यात एक जुनी आणि वादग्रस्त तरतूद आहे. ती आहे विशिष्ट काळात पत्नीला अपत्य न झाल्यास दुसरे लग्न करण्याची काही समुदायांतील पुरुषांना असलेली मुभा. प्रत्यक्षात आता तसे घडत नसले, तरी समान नागरी कायदा लागू करताना अशा विसंगती दूर करण्याचे आव्हान भारत सरकारसमोर असणार आहे. अलिकडेच उत्तराखंडातही स्वत:चा समान नागरी कायदा पारित झाला आहे. यात 'लिव्ह-इन रिलेशनशिप'ची नोंदणी अनिवार्य करण्यासारख्या नवीन तरतुदी आहेत. तशी नोंदणी केली नाही, तर ३ ते ६ महिन्यांपर्यंतचा कारावास होऊ शकतो. ही बाब वैयक्तिक स्वातंत्र्यावर गदा आहे की, सामाजिक सुरक्षेसाठी उचललेले पाऊल यावर सध्या कायदेतज्ज्ञांमध्ये जुंपली आहे. गुजरात आणि आसाम राज्यांनीही समान नागरी कायदा लागू करण्यासाठी समित्या स्थापन केल्या आहेत. अनेक मुस्लिम देशांनी देखील त्यांचे कायदे काळानुसार बदलले आहेत. तुर्कीने १९२६ मध्येच पूर्णपणे धर्मनिरपेक्ष नागरी कायदा स्वीकारला. ट्युनिशियात बहुपत्नीत्वावर बंदी आहे. इजिप्त आणि जॉर्डन येथेही घटस्फोट आणि वारसाहक्काच्या कायद्यात मोठ्या सुधारणा झाल्या आहेत. भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशात प्रश्न वेगळे आहेत हे खरे. उदाहरणार्थ- भारताच्या ईशान्येकडील काही राज्यांमध्ये काही सांस्कृतिक परंपरा आहेत. संविधानाच्या तरतुदीनुसार त्यांना संरक्षण आहे. 'यूसीसी' लागू झाला, तर त्यांच्या प्रथांचे काय, असा प्रश्न पुढे येणार आहे. याच कारणामुळे उत्तराखंडने आपल्या कायद्यातून 'शेड्युल्ड ट्राईब्स'ना वगळले आहे.

आपण सध्या ज्या वळणावर आहोत, तेथे चार पर्याय उरतात. पहिला- सर्वांचे वेगवेगळे कायदे जसे सुरू आहेत तसेच सुरू ठेवावेत. दुसरा- सर्वांचे कायदे वेगवेगळेच असावेत पण त्यातील भेदभाव करणाऱ्या तरतुदींमध्ये सुधारणा व्हावी. तिसरा पर्याय असा की- समान नागरी कायदा लागू करावा पण त्यातही धर्मांना त्यांच्या सांस्कृतिक परंपरांना काही सूट द्यावी आणि चौथा व शेवटचा पर्याय म्हणजे, सर्व भारतीय नागरिकांसाठी पूर्णपणे समान असलेला नागरी कायदा लागू करावा. हा चौथा पर्यायच सर्वांत आवश्यक आहे. न्यायालयाच्या म्हणण्यानुसार, आता ती वेळ आली आहे. जुना शरीयत कायदा असो वा तत्सम कायदे, ते कालबाह्य ठरत असताना त्यात सुधारणा होणे आवश्यकच असते. केवळ धर्माच्या आधारावर महिलांना वारसाहक्क वा पोटगी नाकारणे, हे आधुनिक लोकशाहीत भेदभाव करणारे ठरेल. हा कायदा कुठल्याही एका धर्माच्या विरोधात नव्हे, तर सर्व धर्मांतील अनिष्ट प्रथा दूर करणारा असावा. आदिवासी समुदायांच्या विशिष्ट परंपरांना संरक्षण देण्याबाबतची स्पष्टता त्यात हवी. मानवी हक्क आणि स्त्री-पुरुष समानता या दृष्टिकोनातून तरतुदी असाव्यात. विविध परंपरांमधील चांगल्या गोष्टी कायम ठेवून, कालानुरूप वाईट प्रथांचे निर्मूलन करीत एक उत्तम कायदा भारतवर्षासाठी केला जाऊ शकतो. कुठल्याही चांगल्या गोष्टीला सुरुवातीस विरोध होतोच. कालांतराने तो शमतो. त्यामुळे नागरिकांमधील तसेच स्त्री-पुरुषांमधील पारंपरिक व अनिष्ट स्वरूपाचे भेदभाव संपुष्टात आणण्यासाठी सध्याची वेळ इष्ट ठरू शकते. तसे संकेत न्यायालयाने दिले आहेत. त्याचे स्वागतच केले पाहिजे.

## अर्थविशेष

**हितेश पारसे**

# ज्येष्ठ नागरिकाच्या नावावर एफडी, पण पैसा मुलाचा; कर कोण भरतो?

निवृत्त नागरिक आणि त्यांच्या कुटुंबांनी समजून घ्याव्या, अशा महत्त्वाच्या कर बाबींबद्दल भारतातील अनेक कुटुंबांत सर्वसामान्य पद्धत दिसून येते. मुदत ठेव (एफडी) आई-वडिलांच्या म्हणजे ज्येष्ठ नागरिकांच्या नावावर केली जाते, परंतु प्रत्यक्षात त्या रकमेचा स्रोत मुलगा किंवा मुलगी असते. काही वेळा एफडी संयुक्त नावाने केली जाते. बाहेरून पाहता ही केवळ कौटुंबिक सोय वाटते, परंतु करदृष्ट्या हा विषय अत्यंत महत्त्वाचा आहे. प्रश्न असा निर्माण होतो की, एफडीवरील व्याजावर आयकर नेमका कोण भरतो?

**कराचा मूलभूत सिद्धांत - 'पैसा कोणाचा?'**

आयकर कायद्यानुसार कराची जबाबदारी एफडी कोणाच्या नावावर आहे, यावर ठरत नाही; तर पैसा प्रत्यक्षात कोणाचा आहे, यावर ठरते. जर मुलाने स्वतःचा पैसा पालकांच्या नावावर एफडीमध्ये गुंतविला असेल, तर त्या एफडीवरील व्याज हे मुलाच्या उत्पन्नात धरले जाईल. यालाच उत्पन्नाचे एकत्रीकरण म्हणतात. म्हणजे, एखाद्या व्यक्तीने आपला पैसा दुसऱ्याच्या नावावर गुंतवला, तरी त्यातून मिळणारे उत्पन्न पैशाच्या मूळ मालकाकडेच करासाठी जोडले जाते. उदाहरणार्थ, मुलाने १० लाख रुपये आईच्या नावाने एफडीमध्ये ठेवले आणि वार्षिक ८० हजार रुपये व्याज मिळाले, तर त्या व्याजावर कर मुलालाच भरावा लागेल, आईला नाही.

**प्रथम धारक आणि दुसरा धारक करासाठी कोण महत्त्वाचा?**

बँकिंग प्रणालीत प्रथम धारक हा मुख्य धारक मानला जातो आणि टीडीएस (स्रोतावर कर कापला) साधारणपणे त्याच्याच पॅनवर कापला जातो. पण आयकरच्या दृष्टीने महत्त्वाचा मुद्दा वेगळा आहे रक्कम कोणी गुंतवली?

**संयुक्त एफडी असल्यास**

- पैसा वडिलांचा असेल, तर व्याजावर कर वडिलांच्या उत्पन्नात जाईल.
- पैसा मुलाचा असेल, तर क्लबिंग तरतूद लागू होऊन कर मुलाच्या उत्पन्नात जाईल. म्हणूनच टीडीएस कोणाच्या पॅनवर कापला गेला, यावर अंतिम कर जबाबदारी ठरत नाही.

**नामनिर्देशित म्हणजे मालक नाही**

अनेक ज्येष्ठ नागरिक असा समज करून घेतात की, मुलगा किंवा मुलगी नामनिर्देशित असल्यास त्यांनाच त्या एफडीची मालकी मिळते. प्रत्यक्षात नामनिर्देशित हा केवळ रक्कम स्वीकारणारा प्रतिनिधी असतो. कायदेशीर मालकी वारसदारांकडे जाते. त्यामुळे नामनिर्देशित असल्यामुळे कर जबाबदारीत कोणताही बदल होत नाही.

**ज्येष्ठ नागरिकासाठी विशेष बाब - ८० टीटीबी** : आयकर कायद्यानुसार ज्येष्ठ नागरिकाला बँक व्याजावर ५०,००० पर्यंत सूट (कलम ८० टीटीबी) मिळते; परंतु जर एफडीचा पैसा प्रत्यक्षात मुलाचा असेल आणि क्लबिंग लागू होत असेल, तर ८० टीटीबीचा लाभ ज्येष्ठ नागरिकाला मिळणार नाही. त्या परिस्थितीत व्याज मुलाच्या उत्पन्नात धरले जाईल.

**छाननी आणि एआयएस युगातील वास्तव** : आज आयकर विभागाकडे एआयएस (वार्षिक माहिती विधान) बँकिंग डेटा आणि टीडीएस माहिती उपलब्ध असते. त्यामुळे एफडीवरील व्याज लपवणे किंवा चुकीच्या नावाने दाखवणे सहज लक्षात येऊ शकते. जर ज्येष्ठ नागरिकाकडे फारसे उत्पन्न नसताना मोठ्या एफडीवर व्याज दिसत असेल, तर विभागाकडून चौकशी होऊ शकते.

**कुटुंबांनी काय काळजी घ्यावी?**

१. पैसा कोणाचा आहे, हे स्पष्ट ठेवा. कागदोपत्री पुरावा आणि बँक ट्रेल ठेवणे महत्त्वाचे आहे., २. गिफ्ट देत असल्यास गिफ्ट डीड तयार करा. मुलाने पालकांना भेट म्हणून रक्कम दिली असल्यास, योग्य गिफ्ट डीड केल्याने पुढील व्याजावर कर ज्येष्ठ नागरिकाच्या नावावर लागू होईल., ३. संयुक्त खाते केवळ सोयीसाठी असल्यास कर नियोजन करा. केवळ व्यवहार सोपा व्हावा म्हणून नाव जोडले असल्यास, कर परिणाम समजून घ्या.

**व्यवहारातील केस स्टडीज**

केस स्टडी १ - कर बचतीसाठी एफडी आईच्या नावावर

- नागपूरमधील एका कुटुंबात मुलगा आयटी क्षेत्रात नोकरी करतो आणि त्याचे वार्षिक उत्पन्न १५ लाख रुपये आहे. त्याने २० लाखांची एफडी आपल्या आईच्या नावावर ठेवली, कारण आई ज्येष्ठ नागरिक आहे आणि तिचे उत्पन्न फारसे नाही. ● एफडीवर वर्षाला १.६ लाख व्याज मिळते. कुटुंबाचा विचार असा होता: 'आईचा कर स्लॅब कमी आहे, त्यामुळे कर कमी लागेल.' परंतु आयकर कायद्यानुसार पैसा मुलाचा असल्यामुळे १.६ लाख रुपये व्याज मुलाच्या उत्पन्नात जोडले जाईल.

**केस स्टडी २** - भेट दिल्यास कर परिणाम बदलतो

- एका व्यापाऱ्याने आपल्या वडिलांना १५ लाख रुपय भेट म्हणून दिले आणि त्याचे गिफ्ट डीड तयार केले. त्या पैशातून वडिलांनी एफडी केली. एफडीवरील व्याज १.२ रुपये लाख आहे. या परिस्थितीत पैसा वडिलांचा मानला जातो. व्याजावर कर वडिलांच्या नावावर लागेल तसेच वडील ज्येष्ठ नागरिक असल्यामुळे कलम टीटीबी अंतर्गत ५०,००० रुपये वजावट मिळू शकते.

**केस स्टडी ३** - संयुक्त एफडी पण पैसा मुलाचा

- एका बँकेत एफडी खालीलप्रमाणे केली. प्रथम धारक - वडील, दुसरा धारक - मुलगा. एफडी रक्कम १२ लाख रुपये. मुलाच्या बँकेने टीडीएस वडिलांच्या पॅनवर कापला. परंतु आयकराच्या दृष्टीने पैसा मुलाचा असल्यामुळे व्याज मुलाच्या उत्पन्नात जोडले जाईल. मुलाने टीडीएस क्रेडिट वडिलांकडून फॉर्म २६एएस सामंजस्य करून घ्यावी लागते.

**नामनिर्देशित म्हणजे मालक नाही**

- एफडी करताना अनेक लोक नामनिर्देशित ठेवतात. परंतु अनेक ज्येष्ठ नागरिक असा समज करतात की, नामनिर्देशित म्हणजे त्या व्यक्तीची मालकी. कायद्याने हे चुकीचे आहे. नामनिर्देशित हा केवळ रक्कम स्वीकारणारा प्रतिनिधी असतो, अंतिम मालकी कायदेशीर वारसदारांकडे जाते. म्हणून नामनिर्देशित असल्यामुळे कर जबाबदारी बदलत नाही.

**अंतिम विचार**

एफडी कोणाच्या नावावर आहे, हे महत्त्वाचे नाही; पैसा कोणाचा आहे, हे महत्त्वाचे आहे. क्लबिंग तरतुदीमुळे अनेक कुटुंब अनावधानाने कर चुकांची जोखीम घेतात. निवृत्तीनंतर शांत आयुष्य जगताना कर विषयक अडचणी टाळण्यासाठी योग्य सल्ला, योग्य दस्तऐवजीकरण आणि पारदर्शक व्यवहार आवश्यक आहेत. कर नियोजन म्हणजे फक्त कर बचत नव्हे ती कुटुंबातील आर्थिक सुरक्षितता आणि भविष्यातील वाद टाळण्याची गुरुकिल्ली आहे.

(९०९६३३२३५३, कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार)

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# मानसिक तणावाची सावली

एका आत्महत्येने उभे केलेले अस्वस्थ करणारे प्रश्न मनाला चटका लावून गेले. या प्रश्नांवर नक्कीच गांभीर्याने चिंतन करण्याची गरज आहे. नाशिकमधील प्रसिद्ध आयुर्वेदिक तज्ज्ञ डॉ. मनीषा जेजुरकर यांनी केलेल्या आत्महत्येने केवळ वैद्यकीय क्षेत्रच नव्हे, तर संपूर्ण समाज हादरून गेला आहे. समाजात प्रतिष्ठा, चांगले शिक्षण, स्थिर कुटुंब आणि यशस्वी करीअर असलेली व्यक्ती अचानक असा टोकाचा निर्णय घेते, तेव्हा केवळ एक व्यक्ती नाही तर अनेक प्रश्न आपल्या समोर उभे राहतात. विशेष म्हणजे त्यांचे पती स्वतः मनोविकार तज्ज्ञ असल्यामुळे ही घटना अधिकच अस्वस्थ करणारी ठरते. मानसिक आरोग्याबद्दल समाजाला मार्गदर्शन करणाऱ्या कुटुंबातच अशी घटना घडते, हे वास्तव आपल्या काळातील तणावाच्या गंभीरतेची जाणीव करून देते. आजच्या काळात मानसिक तणाव हा एक न बोलला जाणारा, पण प्रत्येकाच्या आयुष्यात हळूहळू वाढत चाललेला संकट बनत आहे. बाहेरून सर्व काही व्यवस्थित दिसत असले, तरी प्रत्येक माणूस आतून अनेक संघर्ष झेलत असतो. नोकरीची असुरक्षितता, वाढती स्पर्धा, आर्थिक दबाव, सामाजिक अपेक्षा आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या याचा भार अनेकांना शांतपणे सहन करावा लागतो. अशा परिस्थितीत मनात साचत जाणारा ताण कधी कधी असह्य होतो आणि माणूस टोकाचा निर्णय घेण्यापर्यंत पोहोचतो. वैद्यकीय क्षेत्रातील लोकांचे आयुष्य बाहेरून खूप स्थिर आणि प्रतिष्ठित वाटत असले, तरी वास्तव वेगळे असते. डॉक्टरांवर असलेली जबाबदारी, रुग्णांच्या अपेक्षा, सततचे कामाचे तास आणि समाजाकडून असलेला दबाव यामुळे त्यांच्यावरही मोठा मानसिक ताण असतो. अनेकदा डॉक्टर स्वतःच्या भावनांकडे आणि मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. कारण समाजाच्या नजरेत डॉक्टर म्हणजे नेहमी मजबूत, संयमी आणि समस्यांचे उत्तर देणारी व्यक्ती असते. पण शेवटी तेही माणूसच असतात. डॉ. मनीषा जेजुरकर यांच्या आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलिस तपासानंतरच वास्तव समोर येईल. परंतु या घटनेने एक गोष्ट मात्र स्पष्ट केली आहे- मानसिक तणाव हा कोणत्याही स्तरावरच्या व्यक्तीला ग्रासू शकतो.

पैसा, प्रतिष्ठा किंवा शिक्षण यापैकी कोणतीही गोष्ट मानसिक वेदना पूर्णपणे दूर करू शकत नाही. समाजात मानसिक आरोग्याबद्दल अजूनही खुली चर्चा होत नाही. अनेक लोक आपल्या समस्या मनातच दाबून ठेवतात. लोक काय म्हणतील? या भीतीमुळे मदत मागण्याचे धाडस अनेकांना होत नाही. परिणामी तणाव, नैराश्य आणि एकाकीपणा वाढत जातो. अशा वेळी कुटुंब, मित्र आणि समाज यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. एखाद्या व्यक्तीच्या वागण्यात अचानक बदल दिसू लागला, एकटेपणा वाढला किंवा निराशेची चिन्हे दिसू लागली तर त्याकडे दुर्लक्ष न करता संवाद साधणे गरजेचे आहे. आज आणखी एक चिंताजनक वास्तव समोर येत आहे. आत्महत्यांच्या घटनांमध्ये विद्यार्थ्यांचे प्रमाणही वाढताना दिसत आहे. शिक्षणातील वाढती स्पर्धा, पालकांच्या अपेक्षा, करीअरची अनिश्चितता आणि सोशल मीडियामुळे निर्माण होणारा दबाव यामुळे अनेक तरुण मानसिक तणावाखाली जगत आहेत. आयुष्याची सुरुवातच संघर्षाने भरलेली वाटू लागली, तर काही जण निराशेच्या अंधारात हरवून जातात. विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या वाढत्या घटनांनी समाजाला गंभीरपणे विचार करण्यास भाग पाडले आहे. त्याचबरोबर पुरुषांमध्येही आत्महत्यांचे प्रमाण वाढत असल्याची बाब तितकीच वेदनादायक आहे. समाजाने पुरुषांना नेहमी मजबूत, कठोर आणि भावनांवर नियंत्रण ठेवणारी भूमिका दिली आहे. त्यामुळे अनेक पुरुष आपल्या वेदना, अपयश किंवा मानसिक तणाव व्यक्त करू शकत नाहीत. घराची जबाबदारी, आर्थिक ताण आणि समाजाच्या अपेक्षा यांच्या ओझ्याखाली अनेक पुरुष शांतपणे तुटत जातात. पण त्यांच्या वेदनांकडे फारसे लक्ष दिले जात नाही. डॉ. मनीषा जेजुरकर यांच्या निधनाने एक दुःखद शोकांतिका घडली आहे; त्याच वेळी समाजाला एक मोठा धडादेखील मिळतो आहे. मानसिक आरोग्य ही केवळ वैद्यकीय संकल्पना नाही, तर ती सामाजिक जबाबदारी आहे. घराघरात संवाद वाढविणे, भावनांना मोकळेपणाने व्यक्त करण्याची सवय लावणे आणि मानसिक समस्यांकडे लाज किंवा दुर्बलतेच्या नजरेने न पाहणे ही काळाची गरज आहे. कदाचित डॉ. मनीषा जेजुरकर यांच्या आत्महत्येमागील सत्य पुढे येईल. पण त्या निमित्ताने समाजाने स्वतःला एक प्रश्न विचारणे गरजेचे आहे- आपण खरोखर एकमेकांना समजून घेण्याचा प्रयत्न करतो आहोत का? कारण कधी कधी एखाद्या व्यक्तीला वाचवण्यासाठी मोठ्या उपायांची गरज नसते, फक्त कोणीतरी शांतपणे त्यांचे बोलणे ऐकणारा असणे पुरेसे असते. आजच्या वेगवान आणि तणावग्रस्त जीवनात मानसिक आरोग्य हा विषय दुर्लक्षित ठेवणे आता शक्य नाही. प्रत्येक घरात, प्रत्येक कुटुंबात आणि प्रत्येक संस्थेत या विषयावर संवेदनशीलतेने विचार होणे आवश्यक आहे. अन्यथा अशा दुर्दैवी घटना पुन्हा पुन्हा आपल्याला अस्वस्थ करत राहतील.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# बिहारची समीकरणे बदलणार

राज्यसभा निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल करीत बिहारचे मुख्यमंत्री आणि जदयुचे सर्वेसर्वा नितीशकुमार यांनी राजकीय वर्तुळात खळबळ उडवली. कोणाच्या ध्यानीमनी नसताना बिहारचे मुख्यमंत्रिपद सोडण्याचा आणि पुन्हा एकदा राष्ट्रीय राजकारणात जाण्याच्या नितीशकुमार यांच्या अनपेक्षित निर्णयामुळे सर्वांना धक्का बसणे स्वाभाविक होते. या निर्णयाचे बिहारच्या राजकारणावर दूरगामी परिणाम होणार असून बिहारचे राजकीय चित्र येत्या काळात बदलणार आहे.

बिहारचे मुख्यमंत्रिपद सोडण्याचा आणि राज्यसभेत जाण्याचा निर्णय नितीशकुमार यांनी घाईगर्दीत नाही तर अतिशय विचारपूर्वक घेतला आहे. या निर्णयाचा आपल्या घरावर आणि पक्षावर कोणता परिणाम होईल, याचा पूर्ण विचार करून नितीशकुमार यांनी अतिशय शांतपणे हा निर्णय घेतला आहे. एकदा मिळालेले मुख्यमंत्रिपद सोडायची कोणाची तयारी नसते. दिल्लीचे माजी मुख्यमंत्री आणि आपचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांनी तर तुरुंगात सहा महिने जावे लागल्यानंतरही मुख्यमंत्रिपद सोडले नव्हते. मुख्यमंत्रिपदाचा बाडबिस्तर घेऊन तुरुंगात गेलेले केजरीवाल हे बहुधा देशातील पहिले मुख्यमंत्री असावे.

नितीशकुमार जवळपास २० वर्षांपासून बिहारचे मुख्यमंत्रिपद सांभाळत आहेत. मुख्यमंत्रिपदाची सर्वाधिक म्हणजे १० वेळा शपथ घेण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. २००५ पासून बिहारचे राजकारण नितीशकुमार यांच्याभोवती फिरते आहे. राज्यात कोणत्याही आघाडीचे सरकार आले तरी मुख्यमंत्री नितीशकुमारच असतात. गेल्या २० वर्षांपासून नितीशकुमारांना वगळून बिहारच्या राजकारणाचा विचार करता येत नव्हता. राज्यात भाजपा आणि जदयु आघाडीचे सरकार असले तरी मुख्यमंत्री नितीशकुमार असतात तसेच राजद, काँग्रेस आणि जदयु आघाडीचे सरकार आले तरी मुख्यमंत्रिपद नितीशकुमार यांच्याकडेच असते. अनेक वेळा नितीशकुमार यांनी भाजपाची साथ सोडत राजदचा कंदील हातात पकडला तर अनेक वेळा कंदिलाची वात विझवत कमळ हातात घेतले. पण नितीशकुमार यांच्या व्यक्तिगत प्रतिमेवर त्यांच्या या कोलांटउडीच्या राजकारणाचा फारसा परिणाम झाला नाही, त्यांची प्रतिमा डागाळली नाही, आयाराम गयाराम म्हणून त्यांची टिंगलटवाळी झाली नाही. अनेक वेळा तर समोरच्या पक्षापेक्षा नितीशकुमार यांच्या पक्षाचे कमी आमदार असतानाही मुख्यमंत्रिपद नितीशकुमार यांना मिळाले. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर त्यांच्याकडे मुख्यमंत्रिपद ठेवणे ही बिहारमधील राजकीय पक्षांची अपरिहार्यता होती.



सामान्यपणे कोणताही नेता विधानसभेची निवडणूक जिंकत मुख्यमंत्री होत असतो. पण विधानसभेत निवडून येत नितीशकुमार कधीच बिहारचे मुख्यमंत्री झाले नाहीत. एक अपवाद वगळता नितीशकुमार यांनी कधीच विधानसभेची निवडणूक लढवली नाही. विधान परिषदेचे सदस्य म्हणूनच त्यांनी जवळपास २० वर्षे मुख्यमंत्रिपद सांभाळले, हाही एकप्रकारचा विक्रम म्हटला पाहिजे. आपण विधानसभेची निवडणूक का लढत नाही, याचे कारण त्यांनी कधीच सांगितले नाही. बिहारच्या राजकारणात नितीशकुमार यांची लोकप्रियता चांगली होती, तरीही त्यांनी विधानसभेची निवडणूक लढवण्याची हिंमत केली नाही.

नितीशकुमार यांना बाजूला ठेवून वा वगळून बिहारच्या राजकारणाचा विचारही कोणाला करता येत नव्हता. बिहारच्या राजकारणाचा केंद्रबिंदू आतापर्यंत तरी नितीशकुमारच होते. प्रदीर्घ काळ बिहारच्या राजकारणात असतानाही नितीशकुमार यांच्यावर भ्रष्टाचाराचा आरोप झाला नाही तसेच घराणेशाहीच्या राजकारणाचा डाग त्यांनी आपल्या अंगाला लागू दिला नाही. ही त्यांची जमेची बाजू म्हणावी लागेल. त्यांचे प्रतिस्पर्धी नेते लालूप्रसाद यादव यांच्या कुटुंबांतील अर्धा डझन सदस्य राजकारणात असताना नितीशकुमार यांनी आपल्या एकुलत्या एक मुलाला आतापर्यंत राजकारणात येऊ दिले नाही.

बिहारच्या राजकारणात येण्यापूर्वी नितीशकुमार राष्ट्रीय राजकारणात होते. अटलबिहारी वाजपेयी यांच्या मंत्रिमंडळात त्यांनी रेल्वेमंत्रिपद भूषविले होते. त्यामुळे त्यांच्यासाठी राष्ट्रीय राजकारणही काही नव्हाळ्याची गोष्ट नाही. नितीशकुमार यांना पंतप्रधानपदाची स्वप्ने पडलीच नाहीत असे नाही. २०१४ च्या आधी विरोधी पक्षांची मोट बांधण्याचा अयशस्वी प्रयत्न त्यांनी करून पाहिला. विरोधी आघाडीचे पंतप्रधानपदाचे उमेदवार आपण होऊ शकत नाही, हे लक्षात आल्यानंतर त्यांनी हा नाद सोडून दिला आणि भाजपा तसेच नरेंद्र मोदींशी जुळवून घेतले. त्याचा त्यांना नंतरच्या राजकारणात फायदाही झाला.

राजकारणात योग्यवेळी योग्य निर्णय घेण्याची कला बिहारमधील नेत्यांना साधली आहे, असे म्हणावे लागेल. रामविलास पासवान यांच्यानंतर नितीशकुमार यात वाकबगार झाले होते, असे म्हणायला हरकत नाही. केंद्रीय मंत्री आणि रिपब्लिकन पक्ष आठवले गटाचे नेते रामदास आठवलेही यात बसतात.

विधिमंडळाच्या विधानसभा तसेच विधानपरिषद या दोन्ही सभागृहाचे सदस्यपद आपण भूषविले, अनेक कार्यकाळ लोकसभेचे सदस्यही होतो; मात्र आतापर्यंत कधीच राज्यसभेचे सदस्य नव्हतो. ती आपली अपूर्ण इच्छा पूर्ण करण्यासाठी मुख्यमंत्रिपद सोडत राज्यसभेत आपण जात असल्याचे नितीशकुमार सांगत असले, तरी त्यावर विश्वास बसत नाही. बिहारच्या राजकारणातून बाहेर पडण्याची घोषणा नितीशकुमार यांनी केल्यानंतर त्यांचा मुलगा निशांतकुमार याने औपचारिकपणे जदयुत प्रवेश केला. याचा अर्थ निशांतकुमार अधिकृतपणे नितीशकुमार यांचे राजकीय उत्तराधिकारी झाले आहेत. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर जदयुची धुरा निशांतकुमारकडे सोपवत नितीशकुमार यांनी राज्यसभेचा वानप्रस्थाश्रम स्वीकारला, असे म्हणायला हरकत नाही. बिहारमध्ये विशेषत: जदयुत नितीशकुमार यांचे युग संपत निशांतकुमार यांचे पर्व सुरू होत आहे.

नितीशकुमार राज्यसभेत जाण्याच्या निर्णयाचा सर्वांत मोठा फायदा भाजपाला होणार आहे. उत्तर भारतातील बिहार हे एकमेव असे राज्य होते, ज्याठिकाणी भाजपाचा मुख्यमंत्री कधी झाला नाही. भाजपाला बिहारमध्ये उपमुख्यमंत्रिपदावरच समाधान मानावे लागत होते. नितीशकुमार यांनी बिहार सोडल्यामुळे राज्यात भाजपाचा मुख्यमंत्री होण्याचा मार्ग प्रशस्त झाला आहे. एप्रिल महिन्यात नितीशकुमार यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर राज्यात भाजपाचा मुख्यमंत्री शपथ घेणार आहे. भाजपाने मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार अद्याप जाहीर केला नसला, तरी जो कोणी बिहारचा मुख्यमंत्री होईल, त्याच्या मंत्रिमंडळात निशांतकुमार यांचा उपमुख्यमंत्री म्हणून समावेश होऊ शकतो.

आतापर्यंत जदयु नेत्याच्या म्हणजे नितीशकुमार यांच्या मंत्रिमंडळात भाजपाचा उपमुख्यमंत्री राहात होता; आता भाजपा नेत्याच्या मंत्रिमंडळात जदयुचा नेता म्हणजे नितीशकुमार यांचा मुलगा निशांतकुमार उपमुख्यमंत्री होणार आहे. आपल्या मुलाला म्हणजे निशांतकुमारला राजकारणात आणण्यासाठी आणि प्रस्थापित करण्यासाठी नितीशकुमार यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देत बिहार सोडण्याचा आणि राज्यसभेत जाण्याचा निर्णय घेतला, असे म्हणायला हरकत नाही. नितीशकुमार यांच्या या दूरदर्शी राजकीय निर्णयाचा राज्यातील भाजपा, जदयु आणि राजदवर दूरगामी परिणाम होणार आहे. राज्यातील राजकीय समीकरणे बदलणार आहेत, यात शंका नाही.

९८८१७१७८१७

## वाचक पत्रे

### करमणुकीसंबंधी सदर सुरू व्हावे

आपलं पुणे आवृत्ती खूपच माहितीपूर्ण व वाचनीय आहेच. हळूहळू वेगवेगळ्या साहित्य प्रकारांची मेजवानी मिळेलच याची खात्री आहे. तसेच आजची करमणूक हे सदर सुरू करून त्यात पुण्यातील प्रत्येक नाट्यगृहात कोणती नाटके वा करमणुकीचे कार्यक्रम आहेत याची माहिती द्यावी म्हणजे आमच्यासारख्या अनेक ज्येष्ठ नागरिकांना नियोजन करणे सोईचे होईल.

**किशोर आपटे**/पुणे

### वाढते सामाजिक तणाव आणि राष्ट्रीय एकात्मतेची परीक्षा

संपूर्ण विश्व आज मंथनात आहे. उद्याची सकाळ कशी असेल याच चिंतेत प्रत्येक जण झोपी जातो. काही नागरिकांच्या मनात देशाची सामाजिक व वैचारिक एकजूट कमी होत चालली आहे का, असा प्रश्न निर्माण होत आहे. बदलती धोरणे, वाढते सामाजिक ताणतणाव आणि सार्वजनिक चर्चेमधील ध्रुवीकरण यामुळे ही भावना अधिक तीव्र होत आहे.

निवडणुकांच्या पृष्ठभूमीवर विविध राज्यांमध्ये मोफत वीज, रोख अनुदाने, कर्जमाफी किंवा इतर आर्थिक सवलती जाहीर केल्या जातात. या योजनांमुळे तात्कालिक दिलासा मिळतो; मात्र दीर्घकालीन आर्थिक बळकटी आणि राष्ट्रहिताचे प्राधान्यक्रम यांचा पुरेसा विचार होतो आहे का, असा प्रश्न काही अर्थतज्ज्ञ उपस्थित करतात. मतांच्या राजकारणात दीर्घकालीन राष्ट्रहित दुय्यम ठरू नये, ही अपेक्षा आहे. सामाजिक माध्यमांवरील वाढते ध्रुवीकरणही चिंतेचा विषय ठरत आहे. संवेदनशील घटनांना तत्काळ धार्मिक किंवा जातीय रंग दिला जातो. अपुरी माहिती, अफवा आणि आक्षेपार्ह भाष्य यामुळे समाजाची दिशाभूल होते. अशा वेळी संयमी नेतृत्व, जबाबदार माध्यमे आणि जागरूक नागरिकत्व आवश्यक ठरते. लोकसंख्यावाढ, सामाजिक समतोल आणि राष्ट्रीय ओळख या विषयांवरही विविध मतप्रवाह आहेत. काही राज्यांनी लोकसंख्या नियंत्रणाबाबत धोरणात्मक पावले सुचवली आहेत, तर काही जण शिक्षण आणि जनजागृतीला अधिक प्रभावी उपाय मानतात. या चर्चांमध्ये संतुलन राखणे आवश्यक आहे.

काही समाजघटकांमध्ये धार्मिक ओळखीविषयी तीव्र बांधिलकी दिसून येते. विविध विचारप्रवाह असणे ही लोकशाहीची ताकद असली, तरी ते राष्ट्रीय एकात्मतेच्या चौकटीत राहून व्यक्त होणे गरजेचे आहे. देशाच्या अखंडतेविषयी शासनाने स्पष्ट भूमिका घेणे आवश्यक असले, तरी केवळ शासनाकडून अपेक्षा ठेवून चालणार नाही. इतिहास साक्षी आहे की समाज सजग आणि संघटित राहिला तरच मोठे परिवर्तन घडते. स्वातंत्र्यलढ्यात विविध विचारांचे लोक एका ध्येयासाठी एकत्र आले आणि राष्ट्रनिर्मितीला बळ मिळाले. आजही देशाच्या अखंडतेसाठी प्रत्येक नागरिकाने जबाबदारीची जाणीव ठेवणे, कायद्याचा सन्मान करणे आणि राष्ट्रीय हित सर्वोच्च मानणे आवश्यक आहे. समाज संघटित, सजग आणि मूल्याधिष्ठित झाला, तरच राष्ट्रीय एकात्मता दृढ होईल कारण कलियुगात 'संघे शक्ती' हेच राष्ट्रबांधणीचे प्रभावी सूत्र आहे.

**रमा देशमुख**/नागपूर

### मुलांना सोशल मीडियापासून दूर ठेवा

कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि बिहार सरकारने १६ वर्षांखालील सर्व मुलांना सोशल मीडिया वापरण्यास बंदी घातली आहे. कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि बिहार सरकारने घेतलेला हा निर्णय सर्वार्थाने योग्य असून महाराष्ट्र सरकारनेही लहान मुलांचा स्क्रीन टाईम कमी करण्यासाठी पावलं उचलायचं ठरवलं आहे असे वाचण्यात आले. सरकारने याबाबत आणखी उशीर न करता या संदर्भातील अध्यादेश याच अधिवेशनात काढावा. आपल्या देशात लहान मुलांना सोशल मीडिया वापरण्यास परवानगी असल्याने शाळकरी मुले सर्रास त्याचा वापर करत आहेत. काही मुले तर सोशल मीडियाच्या अगदी आहारी गेले आहेत. सोशल मीडियाने शाळकरी मुलांचे बालपणच हिरावून घेतले आहे. एका अहवालात असे नमूद करण्यात आले आहे की १० ते १६ वयोगटातील १० पैकी ७ मुलांवर सोशल मीडियाचा दुष्परिणाम होत आहे. सोशल मीडियामुळे लहान मुलांना खाण्यापिण्याच्या चुकीचा सवयी लागतात आणि ते महिलांचा तिरस्कार करतात तसेच आत्महत्येसारखे नकारात्मक विचार त्यांच्या मनात येतात. सोशल मीडियाच्या आहारी गेल्याने या मुलांचे अभ्यासातही लक्ष लागत नाही शिवाय त्यांच्यामध्ये अनेक शारीरिक व्याधी निर्माण होत आहेत. या सर्व गोष्टींपासून मुलांना वाचवायचे असेल आणि त्यांचे बालपण टिकवायचे असेल तर या वयोगटातील मुलांना सोशल मीडियाच्या वापरापासून रोखलेच पाहिजे.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेजचे आंतरराष्ट्रीय परिषदेत लौकिकास्पद यश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ मार्च :** चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेज (डिग्री), लातूर येथील एम. फार्म (फार्माकोलॉजी) द्वितीय वर्षाचा विद्यार्थी ऋषिकेश चौधरी याने इनोव्हेशन्स इन फार्मास्युटिकल, लाइफ अँड फॉरेन्सिक सायन्सेस: ब्रिजिंग क्लासिकल नॉलेज विथ मॉडर्न टेकनॉलॉजिजया दुसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेत ओरल प्रेझेंटेशन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले आहे.

ही परिषद दत्तकला कॉलेज ऑफ फार्मसी आणि दत्तकला इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल सायन्स अँड रिसर्च, भिगवण, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत उत्कृष्ट सादरीकरणासाठी ऋषिकेश चौधरीला रु. ३०००/- रोख पारितोषिक, ट्रॉफी आणि प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेला आणि संशोधनपर उपक्रमांना नवे बळ मिळाले असून विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या यशाबद्दल संस्थेचे सचिव श्री. भीमाशंकर देवणीकर, विश्वस्त श्री. विजयकुमार मठपती, श्री. अरुण हालकुडे, प्राचार्य डॉ. विजयेंद्र स्वामी, डॉ. अविनाश टेकाडे, डॉ. ओमप्रकाश भुसनुरे, डॉ. अनंत देशपांडे, डॉ. शिवराज नागोबा, डॉ. विवेक पंचभाई, डॉ. पद्मजा गिराम, डॉ. राम साखरे, डॉ. सुनील हिंडोळे, डॉ. शिवकुमार लद्दे, डॉ. नशीर शेख, प्रा. सारिका झिंगाडे, प्रा. रिशा वाले, प्रा. मोईन अत्तार, प्रा. महेश मानके, प्रा. अविनाश मठपती, प्रा. रोहित कोंबडे, शिवहार विभुते, सिद्धेश्वर स्वामी, प्रमोद स्वामी, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



## विविध वृत्त...

### लातूर अर्बन बँकेचा स्वतंत्र IFSC कोड कार्यान्वित; RTGS, NEFT सेवांचा शुभारंभ

**लातूर :** लातूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. लातूर ने डिजिटल बँकिंग सेवांच्या दिशेने महत्वपूर्ण पाऊल टाकत स्वतःचा स्वतंत्र IFSC कोड (शाखानिहाय) कार्यान्वित केला असून त्या अंतर्गत RTGS व NEFT सेवांचा चा शुभारंभ नुकताच करण्यात आला. या सेवांचा शुभारंभ बँकेच्या लातूर येथील मुख्य कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमातून उद्घाटक ललितभाई शाह, प्रा. शिवराज मोटेगावकर सर व रमेश राठी यांच्या हस्ते करण्यात आला.

या प्रसंगी बँकेचे संस्थापक अध्यक्ष प्रदीप राठी, अध्यक्ष आकाश राठी, उपाध्यक्ष सी.ए. लक्ष्मीरमण मालू, बँकेच्या बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, रामबिलास लोया, दिलीप माने, व्यंकटराव गर्जे, प्रदीप बेद्रे, सी.ए. महेश तापडिया, चंद्रशेखर वडजे, श्रीमती रत्नमाला आंभोरे, सौ. शोभाजी वारद मॅडम, रमेश भुतडा, चांदकरण लड्डा यांच्या सह बँकेचे व्यवस्थापकीय संचालक नवनीत भंडारी, कार्यकारी संचालक सी.ए. नरेश सूर्यवंशी तसेच, महाव्यवस्थापक सत्यनारायण खटोड तसेच अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संस्थापक अध्यक्ष प्रदीप राठी यांच्या दूरदृष्टीतून सुरू झालेली ही बँक आज १४ जिल्ह्यांमध्ये २४ शाखांद्वारे कार्यरत असून सुमारे १३४० कोटींचा व्यवसाय करत आहे. स्वतःचा स्वतंत्र शाखानिहाय IFSC कोड (LUCB0000001 Vo LUCB0000025) द्वारे मिळणाऱ्या या सेवेच्या माध्यमातून ग्राहकांना देशभरात त्वरित व सुरक्षित निधी हस्तांतरणाची सुविधा उपलब्ध होणार आहे. कार्यक्रमाच्या शेवटी उपाध्यक्ष सी.ए. लक्ष्मीरमण मालू यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### 'जागेवरच निवड संधी' या मोहिमेअंतर्गत रोजगाराची संधी

**लातूर :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व मॉडेल करिअर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पंडीत दीनदयाल उपाध्याय जागेवरच निवड संधी (प्लेसमेंट ड्राईव्ह)चे शुक्रवार, १३ मार्च, २०२६ रोजी सकाळी ११ वाजता लातूर जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र येथे आयोजित करण्यात आले आहे.या रोजगार मेळाव्यात नामांकित आस्थापना, उद्योजक सहभागी होणार आहेत. या आस्थापनेमध्ये दहावी, बारावी, कोणतीही पदवी, पदव्युत्तर पदवी, आय.टी.आय., डिप्लोमा, तसेच इतर शैक्षणिक पात्रतेच्या उमेदवारांना सहभागी होता येणार आहे. इच्छुक उमेदवारांनी शुक्रवार, १३ मार्च, २०२६ रोजी सकाळी ११ वाजता लातूर जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, शासकीय तंत्र प्रशाला केंद्र, जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालया समोर, लातूर येथे स्वखर्चाने मुलाखती करीता आवश्यक शैक्षणिक कागदपत्रे, स्वत:चा रिझ्युम, बायोडाटा, पासपोर्ट फोटो इ. (तीन प्रती) सह उपस्थित रहावे, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी, लातूर यांनी केले आहे.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर सेवानिवृत्त जयंती समितीच्या अध्यक्षपदी बलभीमराव कोथिंबीरे यांची निवड

**लातूर :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर सेवानिवृत्त जयंती समितीच्या अध्यक्षपदी संस्था चालक तथा सेवानिवृत्त संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष प्रा, बलभीमराव कोथिंबीरे यांची निवड करण्यात आली, डॉ,बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे मागासवर्गीय सेवानिवृत्त कर्मचारी संघ लातूर ची बैठक संपन्न झाली याच बैठकीत वरील निवड करण्यात आली.



बैठकीच्या अध्यक्षस्थानी बी, बी, गायकवाड हे होते, जयंती कार्यकारिणी खालील प्रमाणे निवडण्यात आली, अध्यक्ष प्रा, बलभीमराव कोथिंबीरे, उपाध्यक्ष प्रा, शंकर सोनवणे, माणिकराव पवार, विनायक बोरीकर, मोहन कांबळे सेलूकर, प्रा,डॉ, बाळासाहेब झरीकर, सचिव प्रा, एस, टी, मस्के, सह सचिव प्रा, डी, टी, सूर्यवंशी, बी, बी, गायकवाड, प्रा, देविदास शिंदे, अंकुश रोडे, रमेश श्रृंगारे, संघटक प्रा, विजयकुमार श्रृंगारे, सह संघटक एस, एस, धसवाडीकर, ए, बी, कांबळे, रमेश हणमंते, डी, एन, कांबळे, कोषाध्यक्ष लक्ष्मण धोत्रे, सह कोषाध्यक्ष एम, एम, माकणीकर, देगलूरकर, प्रमुख सल्लागार प्रा, अनंत लांडगे, डॉ, सुधाकर गुळवे, पी, एस, कांबळे, इंजि, ए, आर, लामतुरे, एन, डी, गायकवाड, अभिमन्यू सवई, डी, एस, साठे, प्रा, एस, टी, मस्के यांनी आभार मानल्या नंतर बैठक संपली.

# मनपा कॉँग्रेसच्या ताब्यात देऊन चुकलो की काय?

## मनपाच्या पहिल्या सर्वसाधारण सभेतील प्रकार पाहून लातूरचा सुजाण मतदार संभ्रमात..!

**तभा वृत्तसेवा/श्रीधर स्वामी**

**लातूर, दि. १२ मार्च : लातूर शहर महानगरपालिकेच्या पहिल्या वहिल्या सर्वसाधारण सभेत एकंदर जे काही घडले, ते समस्त लातूरकरांपर्यंत पोहोचलेही . दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांच्यावरील अतीव प्रेमापोटी मतदारांनी राज्यात आणि देशात भाजपाची सत्ता असतानाही मनपाच्या सत्तेच्या चाव्या आ. अमित देशमुखांच्या अर्थात काँग्रेसच्या ताब्यात दिल्या. परंतु प्रदीर्घ कालखंडानंतर होणाऱ्या पहिल्याच सर्वसाधारण सभेत घडलेल्या प्रकारांवरून लातूरचा सुजाण मतदार या बाबतीतील आपला निर्णय चुकला की काय ? या संभ्रमात असल्याचे निदर्शनास येत आहे. पुढील पाच वर्षात लातुरात काय होणार आहे ? याची शितावरून भाताची परीक्षाही केली गेल्याचे स्पष्ट दिसून आले.**





कधीकाळी लातूरने राज्याला - देशाला दिशा देणारे नेतृत्व प्रदान केले आहे. त्याच लातूरमधील राजकीय वातावरण आजमितीस पूर्णतः गचाळ झाल्याचे पावलोपावली पाहावयास मिळते. तत्वाचे राजकारण आता जवळपास कालबाह्य झाले असून त्याची जागा आता ' कमिशन' - 'टक्केवारी' ने घेतल्याचे बोलले जात आहे. कधीकाळी अशा गोष्टी झाल्या तरीही त्याची वाच्यता करण्याचे धाडस फारसे कोणी करत नसत. ज्या गोष्टींशी आपला संबंधच नाही, त्यावर चर्चा करण्याचे टाळले जात असे. आज सामान्य नागरिक उघड उघड एखाद्या नेत्याबद्दल - राजकीय पदाधिकाऱ्याबद्दल यासंदर्भात जाहीर तथा खाजगीत बोलताना आढळून येतात. आता सोशल मिडीयाच्या नावाखाली काहीही केले जात असल्याचे दुर्दैवाने पाहण्याची वेळ येऊन ठेपली आहे. नको त्या गोष्टींना महत्व दिले जात असल्यानेही सध्यस्थितीत तसे घडत असावे, अशी चर्चाही केली जाते.

नुकत्याच पार पडलेल्या लातूर शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीत राज्यात सगळीकडे भाजपने आघाडी घेतलेली असतानाही लातूरमध्ये भाजपला अनपेक्षित पराभवाचा सामना करावा लागला. लातूर मनपात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला स्पष्ट बहुमत मिळाले. लातुरात भाजपासाठी वातावरण अगदी अनुकूल असतानाही काही कारणांमुळे त्यात बदल झाला. थोडक्यात, मनपा निवडणुकीपूर्वी पूर्ण बहुमताच्या जवळ असलेली भाजप अचानकपणे बॅकफूटवर गेली. याकामी काहींनी झारीतील शुक्राचार्यांची भूमिकाही अगदी प्रामाणिकपणे बजावल्याचे सर्वज्ञात आहे. तो विषय तूर्तास याठिकाणी चर्चिला जाणे अपेक्षित नाही. लोकांनी आ. अमित देशमुख यांच्यावर आपले जीवापाड प्रेम आहे, म्हणूनही काँग्रेसच्या हाती मनपाची सूत्रे दिलेली नाहीत, हेही वास्तव आहे. यामध्ये एक बाब निश्र्चितच मान्य करावी लागेल की, मनपा निवडणुकीच्या विजयासाठी भाजपचे स्थानिक तसेच प्रदेश पातळीवरील अनेक नेते लातुरात येऊन गेले. भाजपच्या तुलनेत काँग्रेसचे फार कमी नेते प्रचाराला आले. काँग्रेसच्या प्रचाराची धुरा एकट्या अमित देशमुखांनी सक्षमपणे पेलली. त्यामुळे एकंदर राजकीय परिस्थितीत त्यांच्याकडे मजबूत नेतृत्व देण्याची क्षमता आहे, हे पुनःश्च एकदा अधोरेखित झाले आहे.

मनपात स्पष्ट बहुमत मिळाल्याने येथील सर्व पदाधिकारी निवडण्याचे सर्वाधिकार अर्थातच काँग्रेसच्या वरिष्ठ नेतृत्वाने आ. अमित देशमुख यांना दिले होते. त्याप्रमाणे त्यांनी पदाधिकारी निवडलेही. मनपा पदाधिकाऱ्यांचा कार्यकाळ आता कुठे सुरु झाला आहे. मनपाची पहिली सर्वसाधारण सभा मंगळवारी पार पडली. ही सभा कामकाजापेक्षा अन्य कारणांनीच अधिक गाजली. मनपातील काँग्रेसच्या सत्ताधारी सदस्यांनी लातुरात चालू असलेल्या विकास कामांना खीळ घालण्याचा प्रयत्न सुरु केल्याचे एकंदर परिस्थितीवरून निदर्शनास येते. चालू असलेल्या विकास कामांसाठी भाजपच्या पालकमंत्र्यांनी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून निधींसह सर्व सोपस्कार पूर्ण केले असून कामांनाही सुरुवात झाली आहे. या विकास कामांमध्ये खोडा घातल्याने त्याचे दूरगामी परिणाम मनपाच्या विकास कामावर होणार आहेत. परिणामतः त्याबाबत आ. अमित देशमुख यांनाच जबाबदार धरले जाऊ शकते , हेही खरे आहे. त्यामुळे आ. अमित देशमुखानीच आता आपल्या नगरसेवकांना कोणत्या मुद्द्याला , कधी कशा पद्धतीने विरोध करायचा याचे प्रशिक्षण देणे गरजेचे वाटत आहे. आपला नावलौकिक आणि लातूर मनपाची प्रतिष्ठा कायम ठेवून भाजप सरकारशी, पदाधिकाऱ्यांशी कसे जुळवून घ्यायचे ? याचीही शिकवण नवख्या काँग्रेस नगरसेवकांना देणे आवश्यक असल्याचे दृष्टिपथास येत आहे. काँग्रेस नगरसेवकांना 'अर्थ'प्राप्ती बाबत आत्तापासूनच आक्रमक न होण्याची सूचनाही वेगळ्या भाषेत देणे आवश्यक आहे. कारण हा सर्व प्रकार त्यांना मिळालेय, आम्हाला का नाही ? यावरून सुरु असल्याचे न कळण्याएवढे लातूरकर मुळीच दुधखुळे नाहीत.

कोणत्याही कामाची चांगली सुरुवात अर्धे यश मिळवून देत असते, असे म्हणतात. त्यामुळे लातूर मनपाची पहिली सर्वसाधारण अपयशी झाल्यात जमा आहे. म्हणजे पहिले इंप्रेशन फेल गेले आहे. त्यावरून लातूरच्या सुजाण मतदारांना आपण काँग्रेसच्या हातात मनपाची सत्ता देऊन चुकलो की काय ? अशी शंका वाटताना दिसतेय. लातूरचा सुजाण मतदार त्यामुळे संभ्रमावस्थेत असल्याचे दिसून येत आहे. मतदारांच्या मनातील हा संभ्रम लवकरात लवकर दूर करण्याचे काम आता काँग्रेसला करावे लागणार आहे. लातूरच्या विकासाला कोणत्याही बाबतीत खीळ बसणार नाही, राज्यात - केंद्रात जरी भाजपचे सरकार असले तरी ते सरकार विकास कामाच्या बाबतीत कदापि दुजाभाव करणार नाही याचा आपल्याला विश्र्वास असल्याचे आ. देशमुख यांनी आपल्या मनपा पदाधिकाऱ्यांना पटवून देणे अगत्याचे बनले आहे. अन्यथा मतदारांच्या मनातली हा संभ्रम काही केल्या कमी होणार नाही. पाहू या, मनपाच्या पुढील सभेपर्यंत परिस्थितीत काय बदल होतोय ते.. !

## महिलांसाठी मोफत कर्करोग तपासणी शिबीराची सांगता



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ मार्च :** आंतर राष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने माझे आरोग्य - माझी जबाबदारी या संकल्पनेतून सहकार भारती च्या पुढाकाराने आणि विवेकानंद मेडिकल फाऊंडेशन ड रिसर्च सेंटर; नारीयारी ग्रामभारती; लातूर अर्बन को ऑपरेटिव्ह बॅक लि . यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी आरोग्य जनजाग्रती तसेच मोफत कर्करोग तपासणी शिबीर अष्टविनायक मंदिरातील गणेश हॉल येथे आयोजित करण्यात आले होते.

या शिबीरात एकूण२४४ महिलांनी नोंदणी केले होती पण प्रत्यक्षात१०२ महिलांनी तपासणी करून घेतली. शिबिरासाठी अत्याधुनिक तपासणी सुविधा असलेली व्हॅन उपलब्ध करून देण्यात आली होती.

हे शिबीर यशस्वी करण्यासाठी सहकार भारतीचे जिल्हाध्यक्ष नवनीत भंडारी, महामंत्री नितीन शेटे, संघटन प्रमुख गणेश कवठेकर, सुनील कदम, शाम कापसे, ग्राम भारती च्या वर्षा शेटे, सहकार भारती च्या महिला सह प्रमुख अॅड. मीरा कुलकर्णी, नारीयारी ग्रामभारती. डॉ. मनीषा राऊत, वर्षा शेटे, नगरसेविका शोभा पाटील, संगीता मिरचे, प्रा. कल्पना भटटड, अनुराधा वडवले यांनी विशेष परिश्रम घेतले.

या कार्यक्रमासाठी नागपूर येथील अंजली मुळे - सहकार भारती चे प्रदेश सहप्रमुख. उपस्थित होत्या.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अॅड. ऐश्वर्या कुलकर्णी यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक नितीन शेटे यांनी तर उपस्थितांचे आभार अॅड. मीरा कुलकर्णी यांनी मानले.

या कार्यक्रमासाठी महिला मोठ्या संख्येनी उपस्थित होत्या.

## लातूरचा सुपुत्र वेदांत सास्तुरकर भारतीय सैन्यात 'लेफ्टनंट'पदी विराजमान

### आई पल्लवी आणि वडील किशोर सास्तुरकर यांच्या कष्टाचे चीज

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ मार्च :** जिद्द, चिकाटी आणि देशसेवेची ओढ असेल तर यशाला नक्कीच गवसणी घालता येते हे लातूरच्या वेदांत सास्तुरकर याने सिद्ध करून दाखवले आहे. बिहारमधील गया येथील प्रतिष्ठित 'ऑफिसर्स ट्रेनिंग अकादमी' मधून आपले खडतर लष्करी प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करून वेदांत भारतीय सैन्य दलात 'लेफ्टनंट' पदी विराजमान झाला आहे. या यशानंतर प्रथमच राघवेंद्र कॉलनी,लातूर मध्ये आगमन झालेल्या वेदांतचे कुटुंबीयांनी आणि कॉलनीतील रहिवासी यांनी अत्यंत उत्साहात आणि भव्य मिरवणुकीने स्वागत केले.



**आई-वडिलांच्या डोळ्यांत आनंदाश्रू**

वेदांतचे वडील श्री. किशोर सास्तुरकर आणि आई सौ. पल्लवी सास्तुरकर यांनी आपल्या मुलाच्या या यशासाठी घेतलेल्या कष्टाचे आज चीज झाले. गया (बिहार) येथील दीक्षांत संचलन सोहळ्यात खांद्यावर मानाचे 'स्टार्स' लागल्यानंतर वेदांत जेव्हा आपल्या लातूर शहरात परतला, तेव्हा पालकांनी त्याचे औक्षण करून आणि मिठी मारून स्वागत केले. हा क्षण उपस्थित असलेल्या प्रत्येक लातूरकरासाठी अभिमानाचा ठरला.

वेदांत सास्तुरकर यांचे राघवेंद्र कॉलनी मध्ये आगमन झाल्यानंतर पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. ढोल-ताशांच्या गजराने परिसर दुमदुमून गेला होता. 'भारत माता की जय' आणि 'वंदे मातरम'च्या घोषणांनी तरुणांमध्ये नवचैतन्य पसरले होते. ठिकठिकाणी रांगोळ्या काढून आणि फुलांचा वर्षाव करून या वीर सुपुत्राचे स्वागत करण्यात आले.

**OTA गया येथील खडतर प्रवास**

भारतीय सैन्यातील अधिकारी होण्यासाठी आवश्यक असणारे शारीरिक आणि मानसिक प्रशिक्षण वेदांतने गया येथील अकादमीत पूर्ण केले. अत्यंत कठीण शिस्त आणि प्रशिक्षणातून निघाल्यानंतर तो आता देशसेवेसाठी सज्ज झाला आहे. माझ्या आई-वडिलांनी दिलेले संस्कार आणि लातूरच्या मातीने दिलेली जिद्द यामुळेच मी इथपर्यंत पोहोचू शकलो, अशा भावना वेदांतने यावेळी व्यक्त केल्या.

## वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी उपाययोजनेसाठी 'पायलट प्रोजेक्ट' चा प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ मार्च :** लातूर शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी उपाय योजना करण्यासाठी लातूर जिल्हा पोलीस दल व महानगरपालिका प्रशासनाच्या समन्वयाने गुरुवारपासून 'पायलट प्रोजेक्ट' चा प्रारंभ करण्यात आला आहे.

लातूर शहरात वाढत्या वाहनसंख्येमुळे प्रमुख चौकांमध्ये वारंवार वाहतूक कोंडी निर्माण होत असून नागरिकांना मोठ्या प्रमाणात गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. या पार्श्र्वभूमीवर शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक सुटसुटीत, सुरक्षित व शिस्तबद्ध करण्याच्या उद्देशाने लातूर जिल्हा पोलीस दलाने महानगरपालिका प्रशासन व इतर संबंधित विभागांच्या समन्वयाने वाहतूक कोंडीच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

या अनुषंगाने पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवार दि. १ मार्च २०२६ रोजी लातूर महानगरपालिकेच्या मीटिंग हॉलमध्ये वाहतूक समस्येबाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस महानगरपालिका आयुक्त सौ. मानसी मीना, महापौर सौ. जयश्री सोनकांबळे, उपमहापौर डॉ. स्नेहल उटगे, विरोधी पक्षनेते देविदास काळे, प्रादेशिक परिवहनचे विनोद चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी (लातूर शहर) समीरसिंह साळवे, वाहतूक शाखेचे प्रभारी मनोज जिरगे तसेच महानगरपालिका बांधकाम विभाग, आरटीओ कार्यालय, राज्य परिवहन विभाग, अतिक्रमण विभाग व इतर संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान लातूर शहरातील प्रमुख चौकांमध्ये निर्माण होणाऱ्या वाहतूक कोंडीची कारणे, अनियमित पार्किंग, अतिक्रमण, चौकांची रचना, वाहतुकीचा वाढता ताण तसेच वाहतूक व्यवस्थापनातील अडचणी याबाबत सखोल चर्चा करण्यात आली. शहरातील वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी काही प्रमुख चौकांवर पायलट प्रोजेक्ट राबवून सुधारित वाहतूक नियोजनाची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आला.



सदर निर्णयाच्या अनुषंगाने गुरुवारी सकाळी नऊ वाजता पोलीस व महानगरपालिका प्रशासनाच्या संयुक्त पथकाने पीव्हीआर चौक व छत्रपती शिवाजी चौक येथे प्रत्यक्ष भेट देऊन वाहतूक व्यवस्थेची पाहणी केली. यावेळी चौकातील वाहतुकीचा प्रवाह, वाहनांची गर्दी होण्याची कारणे, रस्त्यांची रचना, अतिक्रमण, पार्किंग व्यवस्था तसेच सिग्नल व्यवस्थेची आवश्यकता याबाबत सविस्तर निरीक्षण करण्यात आले.

या पाहणीदरम्यान संबंधित विभागांना आवश्यक त्या सुधारणा तातडीने करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून आजपासूनच पायलट प्रोजेक्टच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीस प्रारंभ करण्यात आला आहे. या प्रकल्पांतर्गत चौकांचे सुयोग्य नियोजन, वाहतूक प्रवाह सुलभ करणे, अतिक्रमणावर नियंत्रण, योग्य पार्किंग व्यवस्था तसेच वाहतुकीचा सुरळीत व सुरक्षित प्रवाह निर्माण करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येणार आहेत.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## आवाडशिरपुरा येथ घरफोडी; ७० हजारांचे सोन्याचे दागिने लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ मार्च -**

कळंब तालुक्यातील आवाडशिरपुरा येथे अज्ञात चोरट्याने घरफोडी करून सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी शिराढोण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी शशिकांत व्यंकटराव निगुट (वय ५०, रा. आवाडशिरपुरा, ता. कळंब, जि. धाराशिव) यांच्या राहत्या घराच्या गेटचे कुलूप अज्ञात व्यक्तीने ११ मार्च २०२६ रोजी पहाटे सुमारे २ वाजण्याच्या सुमारास तोडून घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील कपाटात ठेवलेले सुमारे १९ ग्रॅम वजनाचे अंदाजे ७० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले.



या प्रकरणी शशिकांत निगुट यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शिराढोण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.



## संक्षिप्त वृत्त...



### निवृत्त लेफ्टनंट कर्नल मनोजकुमार सिन्हा यांनी घेतले तुळजाभवानी देवीचे दर्शन

**तुळजापूर, दि.१२ मार्च -**

निवृत्त लेफ्टनंट कर्नल मनोजकुमार सिन्हा यांनी श्री तुळजाभवानी देवीचे दर्शन घेतले. यानंतर मंदिर समितीचे पब्लिक रिलेशन ऑफिसर अभिजीत तेरखेडकर यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. काश्मीरमध्ये दहशतवाद्यांविरुद्ध लढताना त्यांच्या मानेतून गोळी आरपार गेली होती. यावेळी पुजारी मंडळाचे माजी अध्यक्ष किशोर गंगणे, हिंदू जनजागृती समितीचे समन्वयक राजन बुणगे तसेच चेतन देशमाने उपस्थित होते.



### सुप्रिया माळवदकर यांना 'पोस्ट ऑफ द मंथ' तालुकास्तरीय पुरस्कार

**लोहारा, दि.१२ मार्च -**

लोहारा तालुक्यातील आरणी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील सहशिक्षिका सुप्रिया माळवदकर यांना विनोबा पमार्फत दिला जाणारा 'पोस्ट ऑफ द मंथ' हा तालुकास्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार गटशिक्षणाधिकारी शिवकुमार बिराजदार, केंद्रीय मुख्याध्यापक दत्तात्रय फावडे आणि विनोबा तज्ञ सोमनाथ स्वामी यांच्या हस्ते देण्यात आला. या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय पांचाळ, शिक्षक मेघराज कदम, बाबासाहेब कदम, विकास घोडके, केंद्रप्रमुख मोहन शेवाळे, केंद्रीय मुख्याध्यापक सुदर्शन जावळे तसेच शिक्षकवृंद व शाळा व्यवस्थापन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सुप्रिया माळवदकर यांचे अभिनंदन केले आहे.



### मुंबई पोलीस दलातील बलभीम वाघमारे यांचा सत्कार

**इटकळ, दि.१२ मार्च -**

तुळजापूर तालुक्यातील खानापूर येथील रहिवासी व सध्या मुंबई पोलीस दलात कार्यरत असलेले बलभीम वाघमारे यांची सहाय्यक फौजदार (एएसआय) पदावर नुकतीच निवड झाल्याबद्दल इटकळ ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. या उल्लेखनीय यशाबद्दल इटकळ ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने शाल, पुष्पगुच्छ व श्रीफळ देऊन तसेच पेढा भरवून त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी पोलीस पाटील अमोल हिप्परगे, शंकर वाघमोडे, दिनेश सलगरे, नामदेव गायकवाड, लियाकत खुदादे, बालाजी गायकवाड, चांद शेख यांच्यासह वाघमारे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### कदमवाडी शाळेत विद्यार्थ्यांचा 'स्वयंशासन दिन' साजरा

**तुळजापूर, दि.१२ मार्च -**

तुळजापूर तालुक्यातील कदमवाडी (मा.) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मंगळवार, दि.१० मार्च रोजी इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांचा 'स्वयंशासन दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी एक दिवसासाठी शाळेचे संपूर्ण कामकाज सांभाळत जबाबदारीची जाणीव अनुभवली. यावेळी शिवम लोहार, चेतन मोरे, आराध्या शिंदे, आरती गिरी, स्वरा फंड आणि श्रावणी शिंदे यांनी शिक्षकांची भूमिका निभावत इयत्ता पहिली ते तिसरीच्या विद्यार्थ्यांना विविध विषयांचे अध्यापन केले. उपक्रमात रुद्र पांडुरंग शिंदे यांनी मुख्याध्यापकाची तर सोहम बागल यांनी उपमुख्याध्यापकाची भूमिका पार पाडली. शाळेचे मुख्याध्यापक घोडके डी.टी. यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तर भुतेकर एस.आर. यांनी आभार मानले.

### शेतीतील ७५ हजारांची तार चोरी

**वाशी, दि.१२ मार्च -**

वाशी तालुक्यातील कवडेवाडी शिवारात शेतीच्या लाईनवर ओढलेली अंदाजे ७५ हजार रुपये किमतीची तार अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली आहे. याबाबत सुरज फुलचंद तांदळे (वय ३०, रा. फक्राबाद ता. वाशी जि. धाराशिव) यांनी वाशी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या शेतातील लाईनवर ओढलेली अंदाजे २,४०० मीटर लांबीची जर्मन बनावटीची ५५ एमएमची तार अज्ञात व्यक्तीने चोरून नेल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

# झेडपीच्या अध्यक्ष-उपाध्यक्ष निवडीकडे जिल्ह्याच्या नजरा!

## अर्चनाताई पाटील अध्यक्षपदासाठी आघाडीवर...

## निवडणूक बिनविरोध होणार की मतदानद्वारे हा ट्विस्ट कायम...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ मार्च -**

जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाच्या निवडीसाठी आजचा दिवस महत्वाचा असून संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष या निवडीकडे लागले आहे. महायुतीत असलेल्या पक्षांमधील अंतर्गत समीकरणे आणि संभाव्य राजकीय तडजोडीमुळे निवड बिनविरोध होणार की मतदानाद्वारे होणार, याबाबत शेवटच्या क्षणापर्यंत उत्सुकता कायम आहे. अध्यक्षपदासाठी भाजपकडून माजी उपाध्यक्षा अर्चनाताई राणाजगजितसिंह पाटील यांचे नाव जवळपास निश्चित मानले जात आहे.

जिल्हा परिषदेत सत्तास्थापनेसाठी भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) यांच्यातील समन्वय अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. भाजपचे आमदार राणाजगजितसिंह पाटील आणि शिवसेनेचे आमदार तानाजी सावंत यांच्यातील राजकीय समन्वयातून सत्ता स्थापनेचे सूत्र ठरणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. अध्यक्ष-उपाध्यक्ष पदांसह विविध सभापती पदांचे वाटप कोणत्या पक्षाला मिळणार याकडेही लक्ष लागले आहे. भाजपकडून





अध्यक्षपदासाठी अर्चनाताई राणाजगजितसिंह पाटील इच्छुक आहेत, तर शिवसेना (शिंदे गट) कडून उषाताई रवींद्र गायकवाड यांचे नावही चर्चेत आहे. त्यामुळे महायुतीतील दोन्ही पक्षांमध्ये समन्वय होऊन निवड बिनविरोध पार पडते की वैचारिक मतभेदांमुळे निवडणूक मतदानाद्वारे होते, याबाबत राजकीय उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

धाराशिव जिल्हा परिषदेत यावेळी तब्बल ६४ वर्षांनंतर भाजपला मोठे यश मिळाले असून कमळ फुलले आहे. भाजप सर्वाधिक १९ सदस्यांसह पहिल्या क्रमांकावर आहे. शिवसेनेत फूट पडल्यामुळे जिल्ह्यात दोन शिवसेना समोरासमोर लढल्या होत्या. त्यामध्ये शिवसेना (शिंदे गट) धनुष्यबाण चिन्हावर १५ जागा जिंकण्यात यशस्वी ठरली, तर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) मशाल चिन्हावर ७ जागा जिंकत आपली उपस्थिती दाखवून दिली. महायुतीत भाजपसोबत शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी सोबत असल्यामुळे सत्ता स्थापनेसाठी परस्पर तडजोड अपरिहार्य असल्याचे राजकीय चित्र दिसून येत आहे. गेल्या महिनाभरापासून अध्यक्ष-उपाध्यक्ष पदांच्या निवडीवरून विविध राजकीय चर्चांना उधाण आले होते. काही ठिकाणी विरोधी सदस्यांना सोबत घेऊनही सत्ता स्थापन होऊ शकते, अशा शक्यताही व्यक्त केल्या जात होत्या.

जिल्ह्यातील महायुतीचे प्रमुख नेते आतापर्यंत एकत्र येऊन हा अंतर्गत पेच सोडवण्याचा ठोस प्रयत्न करताना दिसले नाहीत. त्यामुळे हा प्रश्न राजकीय कुरघोडीचे साधन ठरत असल्याची चर्चा सुरू होती. अखेर मुंबई येथे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याशी संवाद साधल्यानंतरच आजच्या निवडीत अंतिम निर्णय होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. राज्यातील पक्षश्रेष्ठींच्या आदेशानुसारच अंतिम समीकरण ठरणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष निवड प्रक्रियेत महायुतीतील राजकीय गणिते आणि नेतृत्वातील समन्वय किती प्रभावी ठरतो, यावर आजच्या निकालाची दिशा ठरणार आहे. आज जिल्ह्यातील प्रमुख नेते व पालकमंत्री एकत्र येऊन अंतिम निर्णय जाहीर करतात की आणखी एखादा नवीन युती फॉर्म्युला समोर येतो, याबाबत राजकीय वर्तुळात उत्सुकता निर्माण झाली आहे.

### जिल्हा परिषदेत पक्षीय बलाबल ...

महायुतीत भाजपाचे १९ सदस्य, शिवसेना (शिंदे गट) १५ सदस्य, तर राष्ट्रवादी काँग्रेसचे ६ सदस्य निवडून आले आहेत. महाविकास आघाडी शिवसेना (ठाकरे गट) चे ७ सदस्य, काँग्रेसचे ३ सदस्य निवडून आले. याशिवाय ४ अपक्ष आणि १ समाजवादी पक्षाचा सदस्य निवडून आला असून जिल्हा परिषदेत एकूण ५५ सदस्य आहेत. सत्तास्थापनेसाठी किमान २८ सदस्यांची आवश्यकता आहे.

### अध्यक्ष-उपाध्यक्ष निवडीचा कार्यक्रम...

- सकाळी १० ते १२ दोन्ही पदांसाठी नामनिर्देशनपत्र स्वीकारणे
- दुपारी २ सभेस सुरुवात
- दुपारी २ ते २.१५ नामनिर्देशनपत्रांची तपासणी व छाननी
- दुपारी २.१५ वैध उमेदवारांची नावे जाहीर
- दुपारी २.१५ ते २.३० उमेदवारी मागे घेण्याची मुदत
- दुपारी २.३५ माघार घेतलेल्या उमेदवारांची नावे जाहीर
- दुपारी २.४० अंतिम उमेदवारांची घोषणा
- दुपारी २.४९ पासून आवश्यक असल्यास मतदान

## उन्हाची तीव्रता वाढताच कलिंगड-खरबूजांना मागणी

### बाजारात हंगामी फळांची रेलचेल...

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१२ मार्च -**



उन्हाळ्याची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून नागरिकांचा कल थंडावा देणाऱ्या हंगामी फळांकडे वाढताना दिसत आहे. शहरातील मुख्य रस्ते, चौक आणि बाजारपेठ परिसरात सध्या कलिंगड आणि खरबूज विक्रीसाठी मोठ्या प्रमाणात हातगाड्या दिसत आहेत.

रस्त्याच्या कडेला आकर्षक पद्धतीने रचलेली कलिंगडे व खरबुजे ग्राहकांचे लक्ष वेधून घेत आहेत.

कडक उन्हामुळे शरीरात पाण्याची कमतरता जाणवू लागते.

त्यामुळे पाण्याचे प्रमाण जास्त असलेल्या फळांकडे नागरिकांचा कल वाढत आहे. दरम्यान, यावर्षी या हंगामी फळांच्या दरात किंचित वाढ झाली आहे. सध्या बाजारात कलिंगडाचे दर आकार व वजनानुसार प्रति नग सुमारे ४० ते १०० रुपये आहेत.

तर खरबूज ८० ते १०० रुपये प्रतिकिलो दराने विक्री होत आहे.

गेल्या वर्षाच्या तुलनेत यंदा फळांच्या दरात सुमारे पाच टक्क्यांनी वाढ झाल्याचे विक्रेत्यांचे म्हणणे आहे.

आरोग्य तज्ज्ञांच्या मते, उन्हाळ्यात शरीरातील पाण्याची पातळी संतुलित ठेवण्यासाठी कलिंगड व खरबूज खाणे फायदेशीर ठरते.

या फळांमध्ये पाण्याचे प्रमाण जास्त असल्याने शरीराला थंडावा मिळतो आणि थकवा कमी होण्यास मदत होते.

## जुन्या वादातून तरुणावर हल्ला; दोन दुचाकींची तोडफोड

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ मार्च -**

कळंब-येरमाळा रोडवरील हासेगाव शिवारातील पाटील धाब्यावर जुन्या वादातून एका तरुणावर मारहाण केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी कळंब पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सुरज काळदाते, सुमित काळदाते, संतोष काळदाते (सर्व रा. पुनर्वसन सावरगाव, ता. कळंब) व इतर १५ जणांनी दि.८ मार्च रोजी कळंब-येरमाळा रोडवरील पाटील धाबा, हासेगाव शिवार येथे गोविंद संजय काळदाते (रा. भवानी चौक, देवी रोड, कळंब) यांना जुन्या भांडणाच्या कारणावरून शिवीगाळ करून लाथाबुक्यांनी तसेच लोखंडी पाईप, लोखंडी रॉड व दगडाने मारहाण केली. हल्ल्यात गोविंद काळदाते गंभीर जखमी झाले. तसेच आरोपींनी त्यांच्या घरासमोरील दोन मोटरसायकलींची तोडफोड करून नुकसान केल्याचेही फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

## अणदूरचा पैलवान राहुल मुळे यांची महाराष्ट्र केसरी स्पर्धेसाठी निवड



**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१२ मार्च -**

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील होतकरू पैलवान राहुल मुळे यांची सासवड येथे होणाऱ्या प्रतिष्ठेच्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ग्रामीण भागातून मेहनतीच्या जोरावर पुढे आलेल्या राहुलच्या या यशामुळे अणदूर परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

राहुल मुळे हा जय हनुमान तालीम संघ, अणदूर येथील पैलवान असून लहानपणापासूनच त्याला कुस्तीची आवड आहे. नियमित सराव, शिस्त आणि जिद्दीच्या जोरावर त्याने अनेक स्कूल कुस्ती स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत आपली छाप पाडली आहे. त्याच्या उत्कृष्ट खेळाची दखल घेत त्याची सासवड येथे होणाऱ्या राज्यातील मानाच्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

राहुलच्या या निवडीमुळे अणदूर गावासह परिसरातील कुस्तीप्रेमींमध्ये समाधान व्यक्त होत आहे. गावातील क्रीडाप्रेमी, ज्येष्ठ नागरिक तसेच जय हनुमान तालीम संघाचे पदाधिकारी व ग्रामस्थांनी राहुलचे कौतुक केले. या निमित्ताने खडकाळी मॉर्निंग ग्रुपच्या वतीने त्याचा भव्य सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.

## तुळजापूरातील भाजी मंडईतून दुचाकी लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ मार्च -**

तुळजापूर शहरातील भाजी मंडई परिसरातून अंदाजे २५ हजार रुपये किमतीची दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे.

फिर्यादी दत्ता मुरलीधर देशमुख (वय ४०, रा. हंगरगा तुळ पाटी, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) यांनी तुळजापूर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांची होंडा शाईन (क्र. एमएच १३ सीझेड १५९५) ही मोटरसायकल दि.१० मार्च रोजी दुपारी २ ते रात्रीच्या दरम्यान सोमेश्वर गणपती मंदिराच्या पाठीमागील भाजी मंडई परिसरातून अज्ञात व्यक्तीने चोरून नेली.

या प्रकरणी दत्ता देशमुख यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## एलपीजी गॅस पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी जिल्हा प्रशासनाची बैठक; वितरणात पारदर्शकता ठेवण्याच्या सूचना

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ मार्च -**

जिल्ह्यात एलपीजी गॅसचा पुरवठा सुरळीत राहावा आणि ग्राहकांना वेळेत गॅस सिलेंडर उपलब्ध व्हावेत यासाठी जिल्हा प्रशासनाकडून आज १२ मार्च रोजी महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली. ही बैठक जिल्हा पुरवठा अधिकारी स्वाती शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

बैठकीस सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी निकिता साकळे, गॅस एजन्सींचे जिल्हा नोडल अधिकारी रिजवान पटेल तसेच धाराशिव जिल्ह्यातील सर्व गॅस एजन्सीधारक उपस्थित होते.

या बैठकीत जिल्ह्यातील गॅस स्टॉक आणि वितरण व्यवस्थेचा सविस्तर आढावा घेण्यात आला. तसेच एलपीजी गॅसचा पुरवठा



सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक नियोजनाबाबत चर्चा करण्यात आली.

ग्राहकांना विहीत वेळेत गॅस सिलेंडर उपलब्ध करून देण्यावर विशेष भर देण्यात आला. यावेळी जिल्हा नोडल अधिकाऱ्यांनी गॅस पुरवठा आणि वितरण प्रक्रियेत आवश्यक समन्वय राखण्याच्या सूचना दिल्या.

तसेच गॅस एजन्सींनी वितरण प्रक्रिया पारदर्शक आणि नियमानुसार ठेवावी, असेही स्पष्ट करण्यात आले. शासनाने ठरवून दिलेल्या निर्देशांनुसारच गॅस सिलेंडरचे वाटप करावे. ग्राहकांकडून अतिरिक्त रक्कम आकारल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असा इशाराही बैठकीत देण्यात आला.

प्रशासनाच्या या सूचनांमुळे जिल्ह्यातील एलपीजी गॅस वितरण अधिक शिस्तबद्ध व ग्राहकाभिमुख होण्यास मदत होणार असल्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

## लातूर-येडशी-बार्शी-टेंभुर्णी मार्ग उन्नतीकरणाला २०५.२३ कोटींची मंजुरी

### खा. ओमराजे निंबाळकर यांची माहिती

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ मार्च -**

धाराशिव, लातूर आणि बार्शी परिसरातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या लातूर-मुरुड-ढोकी-येडशी-बार्शी-टेंभुर्णी या प्रमुख मार्गाच्या उन्नतीकरणासाठी केंद्र सरकारकडून २०५.२३ कोटी रुपयांची प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी मिळाली आहे. या निर्णयामुळे येडशी बायपाससह या मार्गावरील उर्वरित प्रलंबित कामांना गती मिळणार असल्याची माहिती खासदार ओम राजे निंबाळकर यांनी दिली.

या मार्गाच्या कामांसाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला होता. त्या पाठपुराव्याला यश मिळाल्याने आता रस्त्याच्या उन्नतीकरणाचे काम वेगाने होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या प्रकल्पामुळे येडशी बायपासचे काम तसेच इतर प्रलंबित कामे पूर्ण होण्यास मदत होणार आहे.



परिणामी या परिसरातील वाहतूक अधिक सुरक्षित, वेगवान आणि सोयीस्कर होणार आहे.

खासदार ओमराजे निंबाळकर यांनी सांगितले की, यापूर्वीही केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करून या मार्गाच्या चौपदरीकरणासाठी ४३८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून घेण्यात यश आले होते.

या निधीमुळे या महत्त्वाच्या मार्गाच्या विकासाला मोठी गती मिळाली आहे.

या मार्गाच्या विकासामुळे स्थानिक नागरिकांचा प्रवास अधिक सोयीस्कर होणार असून व्यापार, उद्योग आणि वाहतूक व्यवस्थेलाही मोठी चालना मिळणार आहे.

या प्रकल्पामुळे ग्रामीण भागातील संपर्क सुधारण्याबरोबरच कृषी मालाच्या वाहतुकीलाही गती मिळणार असल्याने स्थानिक अर्थव्यवस्थेला देखील मोठा फायदा होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. तसेच येडशी बायपास पूर्ण झाल्यानंतर शहरातील वाहतूक कोंडी कमी होण्यासही मदत होणार आहे.


### जाहीरनामा

**तुळजापूर येथील मा. सह दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर, यांचे कोर्टात.**

**कि.अ.नं.२४७/२०२६** — **नि.नं. ७**

ज्यापेक्षा **कै. मधुकर रामकृष्ण पाटील** हे वृध्दापकाळामुळे **दि.२७/१२/२०१५** रोजी कसबे तुळजापूर, ता. तुळजापूर येथे मयत झाले आहेत, त्यांचे पश्चात अर्जदार क्रे. (१) ज्योती अरुण महाजन, रा.३२४, वकील नगर जवळ, दिनानाथ मंगेशकर हॉस्पीटल, एरंडवणे, पुणे, ता. जि. पुणे, (२) मेघना दिलीप भेडसुरकर, रा. भेडसुर, ता. भेडसुर, जि. कलबुर्गी (कर्नाटक) (३) सुभाष मधुकरराव पाटील, रा. बिल्डींग नं. ३, फ्लॅट नं. २४, वकील नगर, दिनानाथ मंगेशकर हॉस्पीटल जवळ, एरंडवणे, पुणे, ता. जि. पुणे, (४) स्वाती विकास महाजन, रा. फ्लॅट नं. ३०१. अजमेरा हॉसींग कॉम्प्लेक्स, अजमेरा शाळा जवळ, पिंपरी, पुणे शहर, पुणे, (५) मंजुषा रविंद्र पाटील, रा. मंगळवार पेठ, तुळजापूर, ता. तुळजापूर, जि. धाराशिव, (६) अथर्व रविंद्र पाटील, रा. आरळी (खुर्द), ता. तुळजापूर, ह. मु. जिजामाता नगर, नवीन बागे शेजारी, विजय पॅथोलॉजी समोर, तुळजापूर, ता. तुळजापूर, जि. धाराशिव, (७) आदित्य रविंद्र पाटील, रा. आरळी (खुर्द), ता. तुळजापूर, ह. मु. तुळजापूर, ता. तुळजापूर, हे मयताचे वारस असून, अर्जदार यांनी मयताच्या नांवे असलेले कसबे तुळजापूर, ता. तुळजापूर येथील सिटी सव्र्हे नं. ३१९५, ज्याचा नगर परिषद मिळकत क्रं. ९४१/४ या जागेच्या सिटी सर्व्हे रेकॉर्डला (पी. आर. कार्डवर) व इतर रेकॉर्डला अर्जदारांचे नांव वारस म्हणून लावण्यांकरीता वारसांचे प्रमाणपत्र मिळण्यांसाठी अर्ज केला आहे.

त्यापेक्षा अर्जदार क्रं. १ ते ७ हे सदरहू मयताचे वारसदार नव्हे असे कोणास कळविण्यांचे असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्यांचे आंत त्यांनी हया न्यायालयात हजर होवून, आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यांत येते की, सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना **कै. मधुकर रामकृष्ण पाटील** यांचे वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यांत येईल.

**पु.ने.ता. ३०/०४/२०२६**
**आज दिनांक : १२/०३/२०२६**

**स्वाक्षरित/-** **कनिष्ठ लिपीक** — **स्वाक्षरित/-** **सहा.अधिक्षक**

**सह दिवाणी न्यायालय क. स्तर, तुळजापूर (आदेशावरुन)**

# नांदेडमध्ये चार हजार कोटींचा 'हेलीप्लांट' साकारणार!

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १२ मार्च-**

निवडणुकीत नांदेडकरांनी कमळाची काळजी करावी, त्यानंतर पुढील पाच वर्षे नांदेडची चिंता मी करेन, असा शब्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेच्या निवडणूक प्रचारात दिला होता. नांदेडला तब्बल ४ हजार २५० कोटी रुपयांचा हेलीप्लांट प्रकल्प देऊन मुख्यमंत्र्यांनी आपला शब्द खरा करून दाखवल्याचे खा. अशोकराव चव्हाण यांनी म्हटले आहे.

मुख्यमंत्र्यांनी बुधवारी विधानसभेत बोलताना नांदेडमध्ये ४ हजार २५० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा सामंजस्य करार होत असल्याची घोषणा केली होती. या महत्वपूर्ण प्रकल्पाबाबत अधिक माहिती देताना खा. अशोकराव चव्हाण म्हणाले की, राज्य सरकारने 'रिटाव्हिया प्रायव्हेट लिमिटेड' सोबत हा महत्वपूर्ण करार केला आहे. या कराराअंतर्गत नांदेडमध्ये हेलिकॉप्टर निर्मिती, जुळवणी आणि सुट्या भागांच्या उत्पादनाचा प्रकल्प उभारला जाणार आहे. तसेच, हेलिकॉप्टरसाठी आवश्यक अभियांत्रिकी सेवा आणि देखभाल व दुरुस्ती सेवा देखील या ठिकाणी उपलब्ध असतील. या प्रकल्पामुळे १ हजार ८०० ते २ हजार थेट नोकऱ्या निर्माण होतीलच, शिवाय मोठ्या प्रमाणावर अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन जिल्ह्याच्या आर्थिक विकासात अधिक भर पडेल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मेक इन इंडिया' आणि 'विकसित भारत' या संकल्पनेत महाराष्ट्राचे योगदान सर्वाधिक असावे, या ध्येयाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस झपाट्याने काम करत आहेत. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक येत असून, नांदेडचा हेलीप्लांट प्रकल्प हे त्याचेच फलित असल्याचेही खा. अशोकराव चव्हाण यांनी म्हटले आहे.

# अभाविपचा विद्यार्थी आक्रोश मोर्चा ; शिक्षणाच्या बाजारीकरणाविरोधात शेकडो विद्यार्थी रस्त्यावर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १२ मार्च-**

शासनाच्या ढिसाळ कारभाराविरोधात नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयावर अभाविपचा विद्यार्थी आक्रोश मोर्चा काढण्यात आला. शहरात पंचवटी हनुमान मंदिर मल्टीपर्पज मैदान चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय या मार्गाने अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) नांदेड शाखेचा विद्यार्थी आक्रोश मोर्चा यशस्वीपणे पार पडला. विविध आयटीआय, वैद्यकीय, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये तसेच इतर शैक्षणिक संस्थांमधील शेकडो विद्यार्थी-विद्यार्थिनी या मोर्चात सहभागी झाले होते. हा मोर्चा केवळ निदर्शन नसून महाराष्ट्रातील लाखो विद्यार्थ्यांच्या ज्वलंत प्रश्नांवर शासनाला जागे करण्याची ठाम आणि तीव्र हाक होती.



मोर्चादरम्यान विद्यार्थ्यांनी बॅनर-फलक घेऊन जोरदार घोषणाबाजी केली. उठ दोस्ता उगार मुठ... तूच थांबव तुझ्या शिक्षणाची लूट! अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सादर करण्यात आलेल्या निवेदनात अभाविपने राज्यातील १४ प्रमुख शैक्षणिक समस्या मांडल्या.

अतिवृष्टीग्रस्त भागातील विद्यार्थ्यांचे स्पर्धा परीक्षा शुल्क पूर्णतः माफ करावे व सर्व स्पर्धा परीक्षांचे शुल्क तात्काळ कमी करावे; विद्यार्थिनींच्या मोफत शिक्षणाची घोषणा प्रत्यक्षात अमलात आणावी; डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे येथील परीक्षा व निकालातील गोंधळ तात्काळ थांबवून वेळेवर गुणपत्रिका द्याव्यात; महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातील रिक्त प्राध्यापक पदे भरावीत, परीक्षा शुल्क कमी करावे व इंटर्न्स/रेसिडेंट डॉक्टर्स यांना स्टायपेंड वाढवावे; प्रलंबित शिष्यवृत्ती, विद्यावेतन व निर्वाह भत्ता तात्काळ विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा करावेत; शासकीय वसतिगृहे, आयटीआय इमारती व उपकरणांचे नूतनीकरण करावे; MH-CET साठी CUET धर्तीवर एकच अर्ज प्रक्रिया, कमी शुल्क व सुलभ प्रणाली लागू करावी; महाविद्यालयीन खुल्या निवडणुका तात्काळ सुरू कराव्यात; मराठी माध्यम शाळांची गुणवत्ता वाढवावी; ग्रामीण भागातील सर्व विद्यार्थ्यांना मोफत बस पास द्यावा; आयटीआय निर्वाह भत्ता त्वरित सुरू करावा; पशुवैद्यकीय पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी अंतनिर्वाह भत्ता व अधिछात्रवृत्ती लागू करावी, तसेच परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील रिक्त पदे भरावीत अशी मागणी करण्यात आली.

अभाविपने राज्यभरातील विद्यार्थ्यांच्या भावना लक्षात घेऊन शांततेत मागण्या मांडल्या असल्याचे नमूद केले. मात्र शासनाने या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास राज्यभर विविध जिल्ह्यांत तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही देण्यात आला.

अभाविप देवगिरी प्रदेश सहमंत्री दीपाली चित्ते म्हणाले की, राज्यातील विविध विद्याशाखांतील विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहेत. परीक्षा शुल्कवाढ, शिष्यवृत्तीतील विलंब, रिक्त पदांमुळे गुणवत्तेवर होणारा परिणाम, तसेच ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांच्या अडचणी यामुळे शिक्षणव्यवस्था कमकुवत होत आहे. शासनाने विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे केवळ घोषणांच्या माध्यमातून पाहू नये, तर ठोस धोरणात्मक निर्णय घेऊन तात्काळ अंमलबजावणी करावी. अन्यथा अभाविप राज्यव्यापी तीव्र आंदोलन उभारेल. तर नांदेड महानगरमंत्री ऋषिकेश काळे म्हणाले की, सरकारकडून मोठ्या घोषणा केल्या जातात; मात्र त्यांची अंमलबजावणी प्रत्यक्षात दिसून येत नाही. विद्यार्थिनींचे मोफत शिक्षण असो वा आयटीआयचे विद्यावेतन, आम्हाला केवळ कागदोपत्री आश्वासने नकोत, तर प्रत्यक्ष कृती हवी आहे.

## सुप्रसिद्ध विनोदी भारूड किर्तनकार गोविंद महाराज यांचा कार्यक्रम

**उमरी** -महाराष्ट्रातील प्रबोद्धन करणारे सुप्रसिद्ध विनोदी भारूड किर्तनकार यांचा दि १६ मार्च रोजी उमरी शहरात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे . उमरी शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राजकीय बादशाह युवा नेते, नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष तसेच नांदेड जिल्हा मध्यवर्ती



सहकारी बँकेचे संचालक कैलासभाऊ देशमुख गोरठेकर यांच्या वाढदिवसानिमित्त उमरी येथे भव्य धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने विनोदातून समाजप्रबोधन करणारे प्रसिद्ध भारुडकार ह.भ.प. गोविंद महाराज गायकवाड यांचे भारूड आयोजित करण्यात आले आहे. हा कार्यक्रम सोमवार, दिनांक १६ मार्च रोजी सायंकाळी ७ वाजता उमरी येथील मोंढा मैदान, गोरठेकर कॉम्प्लेक्स समोर मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. आपल्या भारूडाच्या माध्यमातून समाजातील विविध सामाजिक प्रश्न, अंधश्रद्धा, व्यसनमुक्ती तसेच नैतिक मूल्यांबाबत जनजागृती करणारे ह.भ.प. गोविंद महाराज गायकवाड हे महाराष्ट्रभर प्रसिद्ध आहेत. त्यांच्या भारूडातील विनोदी शैली, प्रभावी सादरीकरण आणि प्रबोधनात्मक संदेश यामुळे हा कार्यक्रम नागरिकांसाठी विशेष आकर्षण ठरणार आहे. कार्यक्रमासाठी येणाऱ्या महिलांसाठी विशेष बसण्याची व्यवस्था करण्यात आली असून, सर्व नागरिकांनी कुटुंबासह उपस्थित राहून या प्रबोधनात्मक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या कार्यक्रमाचे आयोजन के.डी. बॉस मित्र मंडळ, उमरी तालुका यांच्या वतीने करण्यात आले असून, परिसरातील भाविक व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

## शुक्रवारी बिलोली येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन

**नांदेड** -जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नांदेड व श्रीधर स्वामी शासकीय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बिलोली यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार १३ मार्च २०२६ रोजी श्रीधर स्वामी शासकीय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बिलोली येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय प्लेसमेंट ड्राईव्ह/रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या प्लेसमेंट ड्राईव्ह /रोजगार मेळाव्यामध्ये विविध खाजगी आस्थापनामध्ये रोजगार व नोकरीच्या संधी साठी मुलाखती घेण्यात येणार असून जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांनी शुक्रवार १३ मार्च २०२६ सकाळी ११ वा. पासून श्रीधर स्वामी शासकीय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बिलोली येथे उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नांदेड यांनी केले आहे. अधिक माहिती व संपर्कासाठी मा. सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, आनंदनगर रोड, बाबानगर नांदेड ईमेल आयडी परपवशवीक्षसरी०१सारळश्र.लो दूरध्वनी क्रमांक ०२४६२-२५१६७४ व योगेश यडपलवार ९८६०७२५४४८ वर संपर्क साधावा, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता सहायक आयुक्त डॉ. रा. म. कोल्हे यांनी केले आहे.

## जिल्ह्यात जमावबंदी, शस्त्रबंदी आदेश

**नांदेड** -१३ मार्चच्या सकाळी ६ वाजेपासून ते २७ मार्च २०२६ च्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे. जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये जिल्ह्यात १३ मार्चच्या सकाळी ६ वाजेपासून ते २७ मार्च २०२६ च्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहिल. त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी या आदेशात नमुद असलेली कृत्ये सार्वजनिक परिसर किंवा त्याच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे.

# जन्मदात्या बाळाला घेऊन परीक्षा देणाऱ्या मातेचा सन्मान

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १२ मार्च-**

राज्यात सुरु असलेल्या बारावी बोर्डाच्या परीक्षेचा शेवट बुधवारी झाला. परीक्षेच्या शेवटच्या दिवशी आपल्या जन्मदात्या तान्हुल्या बाळाला सोबत घेऊन बारावी बोर्डाची परीक्षा देणाऱ्या मातेचा सन्मान बुधवारी पीपल्स महाविद्यालयात करण्यात आला.

विद्यार्थी जीवनातील महत्वाचा टप्पा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बारावी बोर्डाच्या परीक्षेला राज्यामध्ये दिनांक १० फेब्रुवारी पासून सुरुवात झाली होती. या परीक्षेचा शेवट बुधवारी झाला. नांदेड येथील



पीपल्स महाविद्यालयात बारावी बोर्ड परीक्षा शांततेत व सुरळीत पार पडली. केंद्रावर एकूण ८६१ परीक्षार्थी होते. प्रशासनाच्या वतीने परीक्षा केंद्रांवर बैठे पथकांमार्फत झूम वेबकास्टद्वारे संपूर्ण वेळ

परीक्षेचे नियंत्रण काटेकोरपणे ठेवण्यात आले होते . परीक्षेतील गैरप्रकार टाळण्यासाठी भरारी पथके, बैठे पथकाद्वारे नियंत्रण ठेवण्यात आले होते.

परीक्षेदरम्यान पीपल्स महाविद्यालयात अत्यंत हृदयस्पर्शी घटना घडली. शितल चंद्रकात चिते (२१) या मातेने आपल्या नवजात तान्हुल्या बाळाला घेऊन बारावी बोर्ड परीक्षा दिली. पीपल्स कॉलेजमधील ते दृश्य पाहून अनेकांचा कंठ दाटून आला. शीतल जेव्हा बाळाला घेऊन आली, तेव्हा कॉलेज प्रशासनानेही माणुसकी दाखवली. तिची शिक्षणाची धडपड पाहून ही मुलगी एवढ्या कष्टाने येतेय, तर आपण तिच्यासाठी काय करू शकतो? असा विचार करून महाविद्यालयात मातृ स्नेह कक्ष तयार करण्यात आला. या कक्षात बाळाला विश्रांतीसाठी पाळण्याची व्यवस्था करण्यात आली होती. आईची माया आणि तिला शिक्षणाची असणारी गोडी पाहून शितलचे सर्वत्र कौतुक झाले. बुधवारी परीक्षेचा हेव्त झाला आणि शितलचा महविद्यालयात जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून प्रभारी प्राचार्य डॉ. शिवशंकर भानेगावकर यांच्या हस्ते बाळासाठी पाळणा भेट देऊन सन्मान करण्यात आला. बारावी बोर्डाची परीक्षा यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी केंद्रप्रमुख प्रा. विजय कदम, सह केंद्रप्रमुख प्रा.जीडी. ताडोड, प्रा. डॉ. विनोद चव्हाण, शरद डहाळे, सूर्यकांत राऊत, संदेश लांडगे आदींनी परिश्रम घेतले.

# वीज चोरी प्रकरणी चार जणांविरुध्द् पोलीस कारवाई

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १२ मार्च-**

वीज चोरी विरुध्द् महावितरणतर्फे मोहीम तिव् करण्यात आली असून थेट पोलीस कारवाया करण्यात येत आहेत. नांदेड शहरातही शनिवारी नांदेड शहर पोलीस ठाण्यात विद्युत वाहीनीवर आकडे टाकून वीजचोरी केल्या प्रकरणी चार जणांविरुध्द् गुन्हे दाखल झाले आहेत.

आकडे टाकून वीज चोरी करण्या-यांमध्ये सौ.मुक्ताबाई नरवाडे रा.प्रभातनगर, सोनसळे आनंदा अर्जूनराव रा.प्रभातनगर, माधव नागोराव भगत रा.विवेकनगर, इंगोले संभाजी लक्ष्मण रा.जंगमवाडी यांचा समावेश आहे. त्यांच्यावर शहर पोलीस ठाण्यात भारतीय विद्युत कायदा २००३ च्या कलम १३५ नुसार कारवाई सुरु आहे.

यातील सौ.मुक्ताबाई नरवाडे यांच्याकडे १३८३० रुपयांचे बिल थकीत असून त्यांना वीज चोरीचे १२००० रुपयांचे बिल देण्यात आले आहे. सोनसळे आनंदा यांच्याकडे ३९४३० रुपयांचे बिल थकीत असून त्यांना चोरुन वीज वापरल्या प्रकरणी १८००० रुपये बिलाची आकारणी करण्यात आली. माधवराव नागोराव भगत यांच्याकडे दोन वीज जोडण्यांची एकूण १,२४,१८० रुपयांची थकबाकी असून त्यांना वीज चोरीचे ४२००० रुपयांचे बिल आकारण्यात आले आहे. तर इंगोले संभाजी लक्ष्मण यांच्याकडेही एक लाख ७१० रुपयांची थकबाकी असून त्यांना २८००० रुपयांचे वीज चोरीचे बिल आकारण्यात आले आहे.



हदगावः- हिंगोली जिल्ह्याचे भूमिपुत्र नवनिर्वाचित राज्यसभा खासदार रामराव वडकुते यांचे स्वागत व अभिनंदन करताना भाजपा हदगाव पश्चिम मंडळाचे अध्यक्ष सूर्यकांत हनवते यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते.

# जिवंत काडतूस विक्री करण्यासाठी आलेल्या दोघांना ग्रामीण पोलिसांकडून अटक



**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १२ मार्च-**

नांदेडच्या ग्रामीण पोलिसांनी काल रात्री दहा वाजता झरी खदानीजवळ जिवंत काडतूस विक्री करण्याच्या उद्देशाने आलेल्या दोन आरोपींना ताब्यात घेवून त्यांच्याकडून ३६ जिवंत काडतूसे जप्त करण्यात आली.

ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व त्यांच्या सहकाऱ्यांना मिळालेल्या माहितीनुसार काही इसम झरी खदानीजवळ संशयितरित्या फिरत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी त्याठिकाणी छापा टाकला. आरोपींची अंगझडती घेतली असता त्यांच्याकडे ३६ जिवंत काडतुसे जे विक्री करण्यासाठी त्यांनी नांदेडमध्ये आणले होते. ती जप्त करण्यात आली. एक लाख आठ हजार रुपयांचा मुद्देमाल आहे. यातील आरोपी शौनक शिंदे रा.विष्णुपुरी, जावेद महंमद शेख रा.विष्णुपुरी व आनंद उर्फ चिन्नू सरदार यादव रा.वजिराबाद असे आरोपींची नावे आहेत. त्यापैकी दोघांना अटक करण्यात आली असून, एक जण तेथून पळून जाण्यात यशस्वी झाला. पोलीस उपअधीक्षक प्रशांत शिंदे, पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, व्यंकट कुसूमे व त्यांच्या सहकाऱ्यांनी हि कामगिरी यशस्वी केली.

# खुशी सेवाभावी संस्थेचा स्मार्ट उपक्रम; बबलू टेकाळे यांच्या पुढाकाराने स्मार्ट कार्ड नोंदणीला उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. १२ मार्च-**

शहरातील खुशी सेवाभावी संस्था ही संस्था विविध समाजोपयोगी उपक्रमांमुळे नागरिकांच्या सेवेत सदैव तत्पर असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. संस्थेचे प्रमुख कार्यवाह तसेच नगरसेवक बबलू (एकनाथ) टेकाळे यांच्या पुढाकारातून नागरिकांच्या सोयीसाठी स्मार्ट कार्ड नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने ज्येष्ठ नागरिक, अमृत ज्येष्ठ, दिव्यांग तसेच महिलांसाठी एनसीएमसी (स्मार्ट कार्ड) नोंदणी सक्तीची केल्यानंतर अनेकांना नोंदणी प्रक्रियेसाठी अडचणींचा सामना करावा लागत होता. नागरिकांची ही गैरसोय दूर करण्यासाठी आणि त्यांना ताटकळत बसावे लागू नये या हेतूने खुशी सेवाभावी संस्थेच्या वतीने टेकाळे गल्ली परिसरात ८ व ९ मार्च रोजी विशेष नोंदणी शिबिर आयोजित करण्यात आले. या दोन दिवसांच्या शिबिरात मोठ्या प्रमाणात



नागरिकांनी सहभाग नोंदवून स्मार्ट कार्डसाठी नावनोंदणी केली. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिलां व दिव्यांगांना या शिबिराचा मोठा फायदा झाला. नागरिकांनी संस्थेच्या या उपक्रमाचे कौतुक करत समाधान व्यक्त केले.

यावेळी नगरसेवक बबलू टेकाळे यांनी सांगितले की, नागरिकांची सोय लक्षात घेऊन ही नोंदणी मोहीम लवकरच देगलूर शहरातील प्रत्येक प्रभागात राबविण्याचा मानस आहे, ज्यामुळे अधिकाधिक नागरिकांना या सुविधेचा लाभ घेता येईल. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी खुशी सेवाभावी संस्थेचे कार्यकर्ते नितीन दुप्पेवार, सचिन आडेपवार, नितीन जाधव, कपिल टेकाळे, निलेश पोकलवार, साई रणवीरकर, व्यंकटेश पिसारे, आकाश मुजळगेकर, शुभम आडेपवार, दत्तू पोकलवार व सुनील रेनगुंटवार यांनी विशेष परिश्रम घेतले. या समाजाभिमुख उपक्रमांमुळे खुशी सेवाभावी संस्था आणि नगरसेवक बबलू टेकाळे यांचे कार्य नागरिकांमध्ये विशेष चर्चेचा विषय ठरत आहे.

# स्वारातीम विद्यापीठ, परीसरातील साफसफाईकडे दुर्लक्ष

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १२ मार्च-**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथील प्रशासकीय इमारतीमध्ये गेल्या अनेक वर्षापासून परीक्षा विभागातील शौचालय व डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्र समोरील दिवंग व्यक्तीचे शौचालय नादुरुस्त असून येथील साफसफाई व पाणीपुरवठा सुद्धा नियमित नसल्याचे दिसून येते्. याकडे संबंधित विभाग प्रमुखांनीही दुरुस्तीची मागणी केली नसली तरी विद्यापीठ प्रशासनाने सदरील बाबीकडे लक्ष देणे गरजेचे आहे. तेव्हा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी याकडे लक्ष देने गरजेचे आहे.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथील प्रशासकीय इमारतीतील काही विभागात शौचालयाची अवस्था सार्वजनिक शौचालयांच्या अवस्थेप्रमाणे झाली आहे. येथील लघुसंखेच्या प्लस बेसिनला एका नळाला पाणी येतो तर दोन नळांना पाणी येत नसते. शौचालयाच्या बाहेरील बाजूस थंड पाण्यासाठी फ्रीज ठेवले आहे ते भंगारात जमा झाले आहेत. त्यांची दुरावस्था झालेली




आहे .त्यांची जागा बदलणे गरजेचे आहे. त्यांच्याकडे ही लक्ष दिले जात नसल्याचे दिसून येते. येथील काही शौचालयात बाहेरून बादली भरून पाणी आत न्यावे लागते कारण आतील नळास पाणी नसते. ज्या ठिकाणी पाण्याची आवश्यकता नाही. त्या ठिकाणी दिवसभर पाण्याची व्यर्थ नासाडी होते. याकडे विद्यापीठातील संबंधित अधिकाऱ्यांचे लक्ष नसल्याचे दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यसन केंद्रासमोरील दिव्यांगाचे शौचालय हे महानगरपालिकेच्या सार्वजनिक शौचालय पेक्षाही वाईट परिस्थिती आहे्. याकडे गेल्या पाच ते सात वर्षापासूनह ही परिस्थिती आहे. दिव्यांग व्यक्तींना जगाने पाणी नळाचे घ्यावे लागते तर कधी कधी बाहेरून जग भरून आत न्यावे लागते. ही सत्य परिस्थिती आहे . त्या ठिकाणी त्यांना उपयोगी अशा नळ व पाणी नाही याकडे विद्यापीठ प्रशासनाचे दुर्लक्ष दिसून येते. येथील अधिकारी व कर्मचारी आपापल्या केबिनमधील सुविधा तेवढ्याच व्यवस्थित करून घेत असतात बाकी बाबींकडे कोणाचेही लक्षण असल्याचे दिसून येते. विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीमध्ये व परिसरात साफसफाईचा केवळ बोजवारा दिसून येतो. या गुत्तेदारांना विद्यापीठ फुकटपोसत आहे्. की काय अशी चर्चा विद्यापीठातील कर्मचाऱ्यातून होत आहे. खरंतर विद्यापीठापासून जवळ असलेल्या एसजीजीएस कॉलेज मधील मुख्य इमारत व शौचालयाची साफसफाई विद्यापीठांतील संबंधित सुपरवायझर व अधिकारी यांनी पाहून घ्यावी तेव्हा समजेल की साफसफाई काय असते. दरवर्षी विद्यापीठाचा अर्थसंकल्प कोट्यावधीचा असूनही या विद्यापीठाची दूर अवस्था आहे. तेव्हा याकडे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर व कुलसचिव डी डी पवार यांनी लक्ष घालून विद्यापीठ इमारत व परिसरातील स्वच्छतेचा प्रश्न मार्गी लावतील असे अपेक्षा आहे.


## नगर परिषद कंधार जि. नांदेड

### जाहीर निविदा नपकं/पापु/२०२६/६६६०

मुख्याधिकारी नगर परिषद कंधार जि. नांदेड हे पाणी पुरवठा विभाग अंतर्गत कंधार नगर परिषद कंधार करिता पाणीपुरवठा व स्वच्छता विभगात वार्षिक कामे करणे बाबत व टैंकर खरेदी करणे या कामासाठी शासनाचे योग्य त्या वर्गातून नोंदणीकृत कंत्राटदार जे पुर्व अर्हता अटी पुर्ण करतील अशा ठेकेदारांकडुन फक्त ऑफलाईन पध्दतीने निविदा मागवित आहेत. या निविदेच्या पुर्व अर्हता अटी व सविस्तर निविदा सुचना तसेच यापुढील सर्व सूचना पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग नगर परिषद कंधार येथे दि.१३/०३/२०२६ ते दि.२०/०३/२०२६ पर्यंत पाहता येतील. येथे नमूद कोणतीही निविदा कुठल्याही कार्यालयीन टप्प्यावर कोणतेही कारण न देता स्वीकारणे अथवा नाकारणे, आवश्यकतेनुसार फेर बदल, मुदतवाढ ई. करण्याचा पूर्ण हक्क मुख्याधिकारी, नगरपरिषद कंधार यांनी राखून ठेवलेला आहे.

- स्वा.-
(संदीप भोळे)
मुख्याधिकारी
नगर परिषद कंधार

## बीडमध्ये चोरट्यांचा धुमाकूळ; दोन महिलांना भरदिवसा लुटले

**तभा वृत्तसेवा**

**बीड** | बीड जिल्ह्यातील नेकनूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत तीन अज्ञात चोरट्यांनी दोन महिलांना लुटल्याची धक्कादायक घटना समोर आली असून यामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. मांजरसुंबा आणि धोत्रा शिवारात या घटना घडल्या. काळसर रंगाच्या दुचाकीवरून आलेल्या तीन लुटारूंनी दोन महिलांचे तोंड दाबून त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली आणि त्यांच्या गळ्यातील सुमारे ५४ हजार ६५० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने हिसकावून नेले. याप्रकरणी दिलेल्या फिर्यादीवरून नेकनूर पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलीस उपनिरीक्षक पद्माकर आहेर या प्रकरणाचा अधिक तपास करत असून लुटारूंना जेरबंद करण्यासाठी पोलिसांनी हालचाली गतिमान केल्या आहेत. घडलेल्या या लुटमारीमुळे ग्रामीण भागातील महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

# शेतकऱ्यांचे प्रश्न कधी सुटणार ? : खा.रजनीताई पाटील

## खा.रजनीताई पाटील यांचा सरकारवर हल्लाबोल

**तभा वृत्तसेवा**

**केज दि ११(प्रतिनिधी)** | ग्रामीण भागातील जनता बेरोजगारी,महागाईने होरपळून निघत आहे.शेतकरी संकटाशी लढत आहेत ग्रामीण विकास मंत्रालयाने घोषणा केलेला अर्थसंकल्प कुचकामी आहे. घोषणा आणि वस्तुस्थिती यामध्ये खूप मोठे अंतर आहे. यामुळे शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार आहेत काय?असा घणाघात काँग्रेसच्या खा.रजनीताई अशोकराव पाटील यांनी राज्यसभेत केला.




अर्थसंकल्पात ४% वाढ केल्यामुळे ग्रामीण भारताचे स्वप्न पूर्ण होणार आहे का ?

गाव हा भारताचा आत्मा आहे गाव विकसित झाले नाहीत तर विकासाचा दावा हा पोकळ आहे. विकासाचा पाऊल उचलल्याचा सरकार दावा करत असले तरी प्रत्यक्ष वस्तुस्थिती वेगळी आहे. या वाढीव अर्थसंकल्पाने शेतमजूर ,शेतकरी, बेरोजगार यांचे प्रश्न सुटणार आहेत काय असा सवाल उपस्थित केला. महात्मा गांधी रोजगार हमी योजनेचे नाव बदलून जी रामजी केले मात्र हा कायदा रोजगार उपलब्ध करून देणार आहे काय असा प्रश्न उपस्थित केला. ग्रामीण जनतेसाठी आवश्यक असणाऱ्या योजनांमध्ये निधीत वाढ होण्याऐवजी कमी होत आहे ही बाब गंभीर असल्याचा निर्वाळा दिला.

# परळी वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखडा आता 300 कोटींचा होणार - देवेंद्र फडणवीस

## धनंजय मुंडे यांनी केलेली मागणी फडणवीसांनी केली पूर्ण!

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई (प्रतिनिधी)** | परळी येथील पाचवे ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथ मंदिर व परिसराचा विकासासाठी धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नातून मंजूर करण्यात आलेल्या श्री वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्याच्या सुधारित ३०० कोटींच्या प्रस्तावास शिखर समितीच्या माध्यमातून मान्यता देण्यात येणार असल्याचे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत अर्थसंकल्पीय चर्चेच्या उत्तरादरम्यान जाहीर केले.

प्रभू वैद्यनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत विविध कामे सुरू आहेत. या आराखड्यातील रक्कमेत वाढ करून या अर्थसंकल्पीय वर्षात वाढीव निधी देण्याची विनंती आ. धनंजय मुंडे यांनी तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री स्व. अजितदादा पवार व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केली होती. अजित दादानी या आराखड्यात वाढ करण्याची सूचना केली होती, असा उल्लेखही देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात केला.

दरम्यान या विकास आराखड्यातून एक भव्य भक्त निवास उभारण्यात आले असून, त्याचे काम अंतिम टप्प्यात आहे, त्याचबरोबर दर्शन मंडपाच्या चौथ्या मजल्याचे काम सुरू आहे, तर दुसरीकडे प्रवेश द्वारकडील दगडी पायऱ्या, डोंगर तुकाई स्थानाचा विकास, दगडी प्रवेशद्वार, यांसह विविध कामे सुरू आहेत. या कामांची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी स्व. अजितदादा काही दिवसांपूर्वी परळीत आले तेव्हा वाढीव निधी सह विविध कामांच्या टप्प्यांची चर्चा झाली होती. आज याबाबत मुख्यमंत्री महोदय यांनी अधिकृत घोषणा केल्याने, धनंजय मुंडे यांनी स्व. अजितदादा यांचे कृतज्ञतापूर्वक स्मरण करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहेत. वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकासाच्या कामाला आता आणखी गती मिळणार आहे.

# बीड - परळी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल

**तभा वृत्तसेवा**

**बीड** | जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ (DPDC) अंतर्गत १७ कोटी रुपये आणि माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांच्या स्थानिक विकास निधीतून २ कोटी रुपये अशा एकूण १९ कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचा शुभारंभ शारदा नगर येथील हनुमान मंदिर समोरील नियोजित सभागृहाच्या कामापासून करण्यात आला.

यावेळी परळी नगरीच्या नगराध्यक्षा सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे सर,पाणीपुरवठा सभापती सौ.जयश्रीताई गित्ते, महादेव रोडे यांच्यासह नगरसेवक,नागरिक बंधू भगिनी तसेच नगरपरिषदेच्या बांधकाम विभागातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी बोलताना नगराध्यक्षा सौ. पद्मश्री धर्माधिकारी यांनी सांगितले की, परळी शहराचा सर्वांगीण व शाश्वत विकास हेच नगरपरिषदेचे ध्येय आहे. हाती घेतलेल्या प्रत्येक विकास कामाचा



दर्जा उत्कृष्ट राहावा, कामे वेळेत पूर्ण व्हावीत आणि नागरिकांना त्याचा प्रत्यक्ष लाभ मिळावा यासाठी प्रशासन व लोकप्रतिनिधी कटिबद्ध आहेत. परळी शहर अधिक सुशोभित, आधुनिक आणि नागरिकांसाठी सुविधा संपन्न करण्याच्या दिशेने ही विकासकामे निश्चितच महत्त्वाची ठरणार आहेत.

# बीड एएचटीयू पथकाची मोठी कारवाई: वाघोलीतून अल्पवयीन मुलीची सुटका, आरोपीला फिल्मी स्टाईलने घेतले ताब्यात

## कर्नाटक आणि छत्रपती संभाजीनगरमध्ये गुंगारा दिल्यानंतर पुण्यात तांत्रिक तपासाच्या आधारे बसवला सापळा

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई** | बीड जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयांतर्गत असलेल्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष (AHTU) शाखेने एक धाडसी मोहीम फत्ते केली आहे. माजलगाव शहर पोलीस ठाण्यात नोंद असलेल्या अपहरण प्रकरणातील एका अल्पवयीन पीडित मुलीची पुणे जिल्ह्यातील वाघोली येथून सुटका करण्यात आली असून, आरोपीला अत्यंत कौशल्याने ताब्यात घेण्यात आले आहे. या गुन्ह्याचा तपास सुरुवातीला कठीण होता, मात्र तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त बातमीदारांच्या मदतीने पोलिसांनी आरोपीचा माग काढला.



पोलीस उपनिरीक्षक पल्लवी जाधव यांनी या गुन्ह्याची फाईल हाती घेतल्यानंतर तपासाला वेग दिला. एएचटीयूचे पथक सुरुवातीला तपासासाठी कर्नाटकला रवाना झाले होते, तिथे दोन दिवस शोध घेऊनही यश आले नाही. त्यानंतर पथकाने छत्रपती संभाजीनगरमध्ये दोन वेळा शोधमोहीम राबवली, परंतु तिथेही पीडित मुलगी आणि आरोपी मिळून आले नाहीत. अखेर तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपी पुण्याच्या वाघोली भागात असल्याची खात्री पटली. ९ मार्च २०२६ रोजी पोलिसांचे पथक पुण्यात पोहोचले आणि स्थानिक पोलिसांच्या मदतीने शोध सुरू केला.

१० मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास वाघोली येथील एका कंपनीबाहेर दबा धरून बसलेल्या पोलिसांना आरोपी आपल्या मित्राच्या मोटारसायकलवर बसून निघताना दिसला. एएचटीयूचे पोलीस हवालदार प्रदीप येवले आणि अशोक शिंदे यांनी एका स्थानिक पोलिसाची बुलेट घेऊन आरोपीचा ४ ते ५ किलोमीटर पाठलाग केला. आरोपी एका बँकेत शिरला असता, हवालदार प्रदीप येवले यांनीही बँकेत प्रवेश केला आणि त्याच्या शेजारी जाऊन बसले. इतर कर्मचाऱ्यांना बोलावून आरोपीला शिताफीने ताब्यात घेतले. त्यानंतर वाघोली येथील भाडाळे वस्तीतून पीडित मुलीची सुटका करण्यात आली. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत आणि अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने यशस्वी केली.

# बचत गट महिला मेळावा व किशोरवयीन मुलींसाठी मार्गदर्शन शिबीर

**तभा वृत्तसेवा**

**बीड** | नगर परिषद परळी वैजनाथ महिला व बालकल्याण समितीच्या वतीने सभापती अंजली माळी यांच्या पुढाकारातून बचत गट महिला मेळावा व किशोरवयीन मुलींसाठी मार्गदर्शन शिबीर,रक्त तपासणी शिबीर संपन्न झाले.

यावेळी नगराध्यक्षा पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांनी उपस्थित महिलांशी संवाद साधताना सांगितले की, महिला सक्षमीकरणासाठी बचत गटांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. महिलांनी शिक्षण, आरोग्य आणि स्वावलंबनाला प्राधान्य देत समाजात सक्रिय सहभाग घ्यावा. तसेच किशोरवयीन मुलींनी आत्मविश्वासाने पुढे येऊन स्वतःचे भविष्य घडवावे,



असेही त्यांनी आवाहन केले.

महिला व किशोरवयीन मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी अशा मार्गदर्शनपर उपक्रमांची गरज असून बचत गटांच्या माध्यमातून महिला स्वावलंबी होत

समाजाच्या प्रगतीत मोलाचे योगदान देत आहेत, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

या कार्यक्रमास डॉ.सौ शालिनी कराड, उमा समशेट्टी, सरला उपाध्याय, अंबिका परदेशी, सुजाता मगर यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नगर परिषद कर्मचारी व उपजिल्हा रुग्णालय परळी यांनी परिश्रम घेतले.

# हॉटेलवर छापा, घरगुती सिलिंडर जप्त, गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**

**बीड** | हॉटेलमध्ये व्यावसायिक सिलेंडर ऐवजी घरगुती सिलेंडर वापरले जात असल्याची जिल्हा पुरवठा विभागाला जाग आली आहे.. बीड शहरातील जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील तीन हॉटेलवर धाड



टाकून घरगुती सिलेंडर जप्त करण्यात आले आहेत. व्यावसायिक गॅस सिलेंडरचा तुटवडा निर्माण झाल्यानंतर हॉटेल व्यावसायिक हे हॉटेलमध्ये घरगुती गॅसचा वापर केला जात असल्याची बातमी जिल्हाधिकारी यांनी पुरवठा विभागाला सांगून कारवाई केली.. या कारवाईमुळे बीड जिल्ह्यात खळबळ उडाली असून हॉटेलमध्ये घरगुती सिलेंडर वापरणाऱ्या रॅकेटचा परदा पाश झाला आहे..

अमेरिका-इस्त्रायल व इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर व्यावसायिक गॅसचे वितरण बंद झाले आहे. असे असताना बीड शहरातील जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील हॉटेलमध्ये घरगुती गॅस सिलिंडर वापरले जात असल्याची माहिती बीड तहसील कार्यालयातील अधिकाऱ्यांना मिळाली. त्यानुसार संबंधित तिन्ही हॉटेलवर छापा टाकला. यावेळी अधिकारी व कर्मचाऱ्यांना या हॉटेलमध्ये घरगुती सिलिंडर आढळून आले. सदरील सिलिंडर जप्त करण्यात आले आहेत.

# परिषदेकडून माजी कुलगुरू डॉ जनार्दन वाघमारे यांना श्रद्धांजली

**तभा वृत्तसेवा**

**केज दि ११(प्रतिनिधी)** | केज येथे मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने माजी कुलगुरू दिवंगत जनार्दन वाघमारे श्रद्धांजली पर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम माझी कुलगुरू जनार्दनजी वाघमारे यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या कार्यक्रमात माजी कुलगुरू जनार्दनजी वाघमारे यांच्या पुस्तकाचे इंग्रजी भाषेत रूपांतर करून त्यांचे विचार प्रकाशित करणारे प्रा. डॉ. सुनील राऊत यांनी वाघमारे सरांच्या जीवन चरित्रावर विस्तारित स्वरूपात मांडणी केली . सोबतच मराठवाडा साहित्य परिषद शाखेच्या वतीने या कार्यक्रमात जागतिक महिला दिन साजरा केला. महिलांचे सद्यस्थिती सामाजिक वास्तव , दाहकता



व भविष्यकालीन समस्या या विषयावर जेष्ठ कवियत्री सौ सीमाताई गुंड यांनी आपले मत प्रखरपणे मांडले. मराठवाडा साहित्य परिषदेचे सक्रिय सदस्य सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे व्यक्तिमत्व प्राचार्य डॉ. हनुमंत सौदागर यांची नुकतीच शाश्वत विकास परिषद नवी दिल्ली येथील प्रशिक्षणासाठी निवड झाल्याबद्दल सन्मान करण्यात आला . शाश्वत विकासावर बोलत असताना प्राचार्य डॉ सौदागर यांनी पर्यावरणातील जैविक अजैविक घटक परस्परांवर अवलंबून आणि गरजेचे आहेत यातील एकाचाही नाश झाला तरी त्याचा परिणाम भविष्यामध्ये दुसऱ्या घटकावर होऊ शकतो, यासाठी मानवाच्या शाश्वत विकासासाठी हे दोन्ही घटक अबाधित संरक्षित राहणे गरजेचे आहे याबद्दल विचार मांडले . कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.डॉ नवनाथ काशीद , अध्यक्ष मराठवाडा साहित्य परिषद शाखा केज यांनी पर्यावरण संवर्धनासाठी जैविक घटकाचे संवर्धन गरजेचे आहे सोबतच भविष्यकालीन महिला सबलीकरण धोरणावर अध्यक्ष समारोपात आपले मत मांडले .

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान शिबिर लिंबागणेश येथे उत्साहात संपन्न

## नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद ; शेकडो लाभार्थ्यांना विविध प्रमाणपत्रांचे वाटप

**तभा वृत्तसेवा**

**बीड** | राज्य शासनाच्या महसूल व वन विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महा राजस्व अभियान टप्पा – १ अंतर्गत लिंबागणेश येथे १ मार्च बुधवारी आयोजित करण्यात आलेले महाराजस्व समाधान शिबिर नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात आणि उत्साही वातावरणात संपन्न झाले . लिंबागणेश येथील भालचंद्र गणपती देवस्थान सभामंडपात आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरामध्ये शेतकरी , ग्रामस्थ , महिला बचत गट , विद्यार्थी तसेच विविध सामाजिक घटकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शासनाच्या विविध सेवांचा लाभ घेतला .

राज्य शासनाने महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख , पारदर्शक आणि गतिमान करण्याच्या उद्देशाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने हे महाराजस्व अभियान सुरू केले आहे . नागरिकांना महसूल विभागाच्या विविध सेवा त्यांच्या गावातच उपलब्ध करून देणे , प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करणे तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती तळागाळापर्यंत पोहोचवणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे . लिंबागणेश येथे आयोजित शिबिराने या उद्दिष्टांना प्रत्यक्ष स्वरूप दिले असल्याचे चित्र पाहायला मिळाले .

या कार्यक्रमाचे आयोजन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते . कार्यक्रमास अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , उपजिल्हाधिकारी ( सामान्य प्रशासन ) शैलेश सूर्यवंशी , उपविभागीय अधिकारी कविता जाधव , तहसीलदार चंद्रकांत शेळके यांची प्रमुख उपस्थिती लाभली . प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीमुळे या शिबिराला विशेष महत्त्व प्राप्त झाले .

कार्यक्रमास राजेंद्र मस्के , बळीराम गवते , डॉ . गणेश ढवळे , गोरखनाथ सिंगर तसेच महसूल विभागातील अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते . यामध्ये निवासी नायब तहसीलदार सुहास हजारे , नायब तहसीलदार प्रशांत जाधवर , निवडणूक नायब तहसीलदार सुरेंद्र डोके , नायब तहसीलदार अण्णासाहेब वंजारे , पुरवठा निरीक्षक प्रशांत सुपेकर , उपाधीक्षक भूमि अभिलेख अनिल शिवणकर , आरोग्य विभागाचे आरोग्य निरीक्षक अशोक लोखंडे , राज्य परिवहन महामंडळाचे पंकज गोरे , पुरुषोत्तम आंधळे , महादेव चौरे , दादासाहेब शेळके तसेच बीड तालुक्यातील सर्व महसूल मंडळ अधिकारी , ग्राम महसूल अधिकारी , महसूल सेवक आणि तहसील कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते .

लिंबागणेश महसूल मंडळातील २२ गावचे सरपंच , उपसरपंच , पोलीस पाटील , ग्रामपंचायत सदस्य , माजी जिल्हा परिषद सदस्य , माजी पंचायत समिती सदस्य तसेच महिला बचत गट , शेतकरी गट , विद्यार्थी आणि शेतकरी बांधव मोठ्या संख्येने या शिबिरात सहभागी झाले . नागरिकांच्या मोठ्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला लोकाभिमुख स्वरूप प्राप्त झाले .

या शिबिराच्या माध्यमातून विविध विभागांचे माहितीपर स्टॉल्स उभारण्यात आले होते



. महसूल विभागाशी संबंधित जमीन नोंदणी , खातेफोड , वारस नोंद , सातबारा उतारे , विविध दाखले व प्रमाणपत्रे तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती नागरिकांना देण्यात आली . नागरिकांनी आपल्या अडचणी मांडल्या आणि संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांना आवश्यक मार्गदर्शन केले.

शिबिरामध्ये महसूल विभागाच्या विविध सेवांचा प्रत्यक्ष लाभ नागरिकांना देण्यात आला . यामध्ये जिवंत सातबारा ( मयत खातेदार कमी करणे ) , डिजिटल सातबारा वाटप , वारस फेरफार , वर्ग – १ ते वर्ग – २ रूपांतर , ई – पिक पाहणी , ॲग्रीस्टॅक नोंदणी , ई – वसुली पावती , सेवामित्र प्रमाणपत्र , प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र , पानंद रस्ते योजना , रस्त्यांच्या नोंदी सातबारा उताऱ्यावर घेणे , ई – केवायसी प्रक्रिया , आधार कॅम्प , ई – शिधापत्रिका वाटप , लक्ष्मी मुक्ती योजना लाभ , रक्तदान शिबिर , अभिलेख दुरुस्ती , मोफत आरोग्य तपासणी , घरकुल मंजुरी आदेश , गायरान मंजुरी आदेश तसेच मागेल त्याला शेततळे योजना याबाबत नागरिकांना सविस्तर माहिती देण्यात आली .

या शिबिरामध्ये मोठ्या प्रमाणावर विविध सेवा नागरिकांना देण्यात आल्या . त्यामध्ये २७६० डिजिटल सातबारा उताऱ्यांचे वाटप करण्यात आले . तसेच २१० डिजिटल शिधापत्रिकांचे वाटप करण्यात आले . महसूल विभागाशी संबंधित ६० फेरफार प्रकरणांचा निपटारा करण्यात आला . विविध योजनांअंतर्गत २७२ प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले . याशिवाय १३४ मोफत बस पासचे वितरण करण्यात आले . १८१ आयुष्यमान भारत कार्डचे वाटप करण्यात आले . तसेच २२२ नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली .

संजय गांधी निराधार योजना आणि श्रावण बाळ योजना लाभार्थ्यांसाठी या शिबिरात विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती . लाभार्थ्यांचे हयात प्रमाणपत्र ऑनलाईन करून देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्यामुळे अनेक वृद्ध नागरिकांना मोठा दिलासा मिळाला .

या शिबिरामुळे महसूल विभागाच्या सेवा नागरिकांच्या दारी उपलब्ध झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले . अनेक शेतकरी आणि ग्रामस्थांनी प्रशासनाशी थेट संवाद साधत आपल्या समस्या मांडल्या . अधिकाऱ्यांनी त्या समस्यांवर मार्गदर्शन करून काही प्रकरणे जागेवरच निकाली काढली . त्यामुळे नागरिकांना तालुका कार्यालयाच्या वारंवार फेऱ्या मारण्याची गरज भासली नाही . यावेळी बोलताना तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी नमूद केले की महाराष्ट्र शासनामार्फत ही अत्यंत महत्त्वाची योजना नागरिकांसाठी सुरू करण्यात आलेली आहे . प्रशासनाकडून नागरिकांच्या सर्व समस्यांचे निराकरण करण्यात येईल . कोणीही सर्वसामान्य नागरिक मला कधीही फोनवर बोलू शकता आणि समस्येचे निराकरण करू शकता .

कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी नागरिकांना शासनाच्या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले . प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक मजबूत होण्यासाठी अशा शिबिरांचे मोठे महत्त्व असल्याचे त्यांनी सांगितले . छत्रपती शिवाजी महाराजांच्या लोकाभिमुख प्रशासनाच्या विचारांप्रमाणे शासनाच्या सेवा थेट नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या अभियानातून होत असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले . या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी मंडळ अधिकारी पंडित नायकवाडे तसेच ग्राम महसूल अधिकारी गणपत पोतदार , शिवराम येवले , शेख गफूर , नारायण दराडे , प्रमोद कोळपकर , अश्विनी डोळस तसेच महसूल सेवक बाबासाहेब बिरलिंगे आणि ललित काकडे यांनी विशेष परिश्रम घेतले .

एकूणच छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत आयोजित करण्यात आलेले हे शिबिर प्रशासनाच्या लोकाभिमुख कार्यपद्धतीचे प्रभावी उदाहरण ठरले . नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद , विविध विभागांचा समन्वय आणि प्रशासनाची तत्परता यामुळे हे शिबिर यशस्वीपणे पार पडले . शासनाच्या योजना तळागाळापर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने अशा प्रकारची शिबिरे महत्त्वाची भूमिका बजावत असल्याची भावना उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली .

बीड विभागीय कार्यालय : आदर्शनगर गणपती मंदिरासमोर पांगरी रोड, बीड मो.९४०३२६४९३०, E-Mail - jagannathdeshmukh2020@gmail.com